वर्ष 11 वे

व्यक्तिमत्व विकास

नवीन शिक्षण पद्धतीचे फायदे - तोटे

विशेष अंक 2026

* संपादक *

श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

...विशेष आभार...

- प्रेरणास्थान -
श्री. विठ्ठल आप्पा कोळी.
-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

-: अथिती संपादक :-
- श्रीमती गोसावी / पुरी एस.टी.
एम.ए.एम.एड.(सेट)
(गुणवंत शिक्षका पुरस्कार प्राप्त)

व्यक्तिमत्व विकास
Personality Development

वर्ष : 11 वे

स्वागत मूल्य : 300/- ई-अंक
-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

साप्ताहिक
व्यक्तिमत्व विकास
-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

विशेष अंक 2026
नवीन शिक्षण पद्धत विशेष अंक
-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

संपादक -
श्री. मंगेश विठ्ठल कोळी.
-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

अक्षर जुळणी -
कवितासागर फीचर्स, जयसिंगपूर
-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

विशेष सहाय्य -
सौ. माधुरी कोळी.
-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-:-

या अंकात प्रसिद्ध मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

...अंतरंग...

- एक दृष्टिक्षेप राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020/ श्रीमती गोसावी-पुरी एस.टी.
- शिक्षण पद्धत: फायदे तोटे / स्वाती प्रशांत गुरव
- बंडूचे 'स्मार्ट' कारनामे / सौ. सानिका सचिन पाटील
- नव-विचार नवीन प्रणाली / श्रीमती नीला पाटणकर
- स्पर्धा की शिक्षण? / गायत्री लाड
- फायदे - तोटे आणि अंमलबजावणी / डॉ. सौरभ माधवराव जाधव
- यश, अपयश आणि पुढील दिशा ! / डॉ. फकिरा भगवान राजगुरू
- विज्ञान- तंत्रज्ञानाचे युग / सौ.प्रज्ञा घोडके
- नवीन शैक्षणिक धोरणाची पायमल्ली / अंकुश शिंगाडे
- एक वैचारिक आणि शैक्षणिक क्रांती / कोठेकर योगिता संजय
- साध्य / सौ गंधाली अरगडे
- शैक्षणिक धोरण / सौ. दिप्ती गोगटे
- गुरुकिल्ली / नरेंद्र अ. वाकोडे
- नवीन शिक्षण पद्धती : फायदे की तोटे? / सौ. सुचिता बागडे-खाडे
- एक विचार / राधिका भंडारकर
- एक वरदान / डॉ रोहित तळवलकर
- नवी पध्दती / हेमंत मुसरीफ
- नवीन शैक्षणिक धोरण / सुरेखा हरपले
- माझिया शाळेत / संजय मधुकर अरबट
- नवी पध्दती .. / गुरय्या रे. स्वामी
- नवीन शिक्षण पद्धत / महेश रामनाथ वैजापूरकर
- नवे तंत्र नवी दिशा / दत्तात्रय गणपतराव इंगळे
- फायदे अन तोटे / सौ. स्नेहा मुसरीफ
- आजची शिक्षण व्यवस्था / सौ. विद्या प्रल्हाद पाटील
- शिक्षण एक प्रक्रिया / सौ. विजया भांगे
- बदललेली शिक्षण / कु.कशमीरा उल्हास गुप्ते
- दोन पिढ्यांचा संवाद / अनघा कुलकर्णी
- शिक्षणाची गंगा / मधुकर निलेगावकर
- खाली डोके वर पाय / ॲड. विलास कांतिलाल मोरे
- दोन मुलं, एक गाव / प्रणित थळे
- दोन दशकांतील बदल / आमीन सय्यद
- शिक्षण पध्दती विषमता जोपासणारी? / - किशोरी शंकर पाटील
- इंग्रजी शाळा / ज्योती प्रशांत सिनफळ

संपादकीय

मला सांगण्यास मनस्वी आनंद होतो आहे. **"नवीन शिक्षण पद्धतीचे फायदे - तोटे"** या विशेष अंकामध्ये सर्व साहित्यिकांचे मी स्वागत करतो. प्रत्येक वर्षी नवनवीन विषयांची सदरे दिवाळी अंक तसेच विशेष अंकामध्ये **व्यक्तिमत्त्व विकास टीम** मार्फत प्रसिद्ध केले जातात. यावेळी सुद्धा असाच प्रयत्न आहे.

प्राचीन काळी गुरु हा सर्वेसर्वा आणि केंद्रस्थानी गुरुच, "गुरु सांगेल ती पूर्व दिशा" असे गणित होते. आज गुरु म्हणून आपण आई-वडील, बहिण-भाऊ, मित्र, नातेवाईक, मग ती नाती रक्ताची नसतील परंतु माणुसकीची आहेत. आज ह्या आधुनिकतेच्या आणि नवीन तंत्रज्ञान यांची सांगड जर घातली तर **नवीन शैक्षणिक धोरणनुसार विद्यार्थ्यांनी, पालकांनी गुरुजणांनी कोणते बदल करावेत त्यानंतर त्याचा कशा पद्धतीने फायदा होऊ शकेल** हा केंद्रबिंदु मानून हा अंक प्रसिद्ध करत आहे.

अंशत: शिक्षण व्यवस्थेमध्ये कोणते बदल करावेत किंवा नवीन शिक्षण पद्धतीचे जे धोरण आखलेले आहे. त्यामधील चांगले बदल काय आहेत याची सर्व माहिती या अंकामध्ये सर्व लेखकांनी आपल्या परीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आज सर्वच स्तरावर मोठ्या प्रमाणात ऑनलाइन शिक्षण पद्धती प्रभावी ठरते आहे. यामुळे प्राथमिक स्तरावर शिक्षणाच्या मोठ्या समस्या उदभव आहेत. लहान मुले-मुली या सोशल मिडीयाच्या मायाजाळात अडकून बसलेली आपणास दिसत आहे. ० ते ५ वयोगटातील बालके सर्वसाधारणपणे दिवसातील ३ ते ४ तासांचा वेळ हा सोशल मिडीयाचा वापर करताना दिसतात. याचा परिणाम शारीरिक, बौद्धिक, मानसिकतेवर होत आहे. या बालकांच्या वरती शैक्षणिक संस्कार करत असताना पालक म्हणून आपण कोठे कमी पडत आहोत हेच उमगत नाही. वस्तू आपल्यासाठी आहेत की आपण त्याच्यासाठी आहोत हे समजत नाही.

आज कोणत्याही स्तरावरील विद्यार्थी असो त्यांच्यावर योग्य, सुसज्ज, सक्षम, शाश्वत शैक्षणिक संस्कार कशा पद्धतीने मिळतील यासाठी अंकामध्ये काही उपाययोजना, भूतकाळातील चुका, भविष्यात येणाऱ्या अडचणी यावर सर्व साहित्यिकांनी आपल्यापरीने उत्तम, सोप्या आणि सहज समजू शकेल अशा शब्दांचा वापर करून सुंदर लेखन केले आहे. मी त्यांचा सदैव ऋणी राहीन. सर्व साहित्यिकांनी स्वत:चे दर्जेदार साहित्य पाठवून अंकाची शोभा वाढविली आहे. याबद्दल मी सर्व साहित्यिकांचे मनापासून आभार मानतो.

- संपादक

श्री. मंगेश विठ्ठल कोळी.
मो.9028713820

एक दृष्टिक्षेप
राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020

कोणत्याही राष्ट्राची प्रगती घडवून आणायची असेल तर, त्या राष्ट्रांमध्ये असणाऱ्या मनुष्यबळाचा महत्त्वपूर्ण उपयोग करून घेता यायला हवा. जर राष्ट्रातील नागरिक सक्षम असतील तर ते राष्ट्र नेहमीच प्रगतीपथावर असते. राष्ट्राला जर प्रगतीपथावर न्यायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. या उद्देशानेच प्रत्येक राष्ट्र आपापले शैक्षणिक धोरण ठरवत असते. त्याप्रमाणेच भारताने सुद्धा विकसित राष्ट्र होण्यासाठीचे प्रयत्न सुरु केले आहेत. शिक्षणामध्ये अमुलाग्र बदल घडून आणण्यासाठी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 ची आखणी करण्यात आली आहे.

प्रत्येक देशासमोर वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या असतात. आपल्या राष्ट्रासमोर देखील बेरोजगारी, भ्रष्टाचार, पर्यावरण संरक्षण, दहशतवाद, स्त्रियांच्या समस्या, बालमजुरी, बालगुन्हेगारी शहरीकरण, जागतिकीकरण अशा प्रकारच्या समस्या आहेत. प्रत्येक समस्येला उत्तर हे असतेच फक्त ते डोळे उघडे ठेवून शोधणे गरजेचे असते. समस्या सोडविण्यासाठी शिक्षणाशिवाय तरोणोपाय नाही हे सिद्ध झाले आहे. भारतामध्ये 1968, 1986 आणि 1992 मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे आजतागायत कार्यरत होती. परंतु तब्बल 34 वर्षानंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अमुलाग्र असा बदल करण्यात आला आहे. देशातील नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक,भौतिक आणि शैक्षणिक गरजा कालानुरुप बदलत गेल्या. त्यानुसारच प्रत्येक देशाचे शैक्षणिक धोरण हे वेगळे असणे गरजेचे असल्याकारणाने भारत देशाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आखले आहे. त्याचा मुख्य उद्देश भविष्यातील आव्हानांना सामोरे जाणे आणि येणाऱ्या संधीचा उपयोग करून घेऊन राष्ट्रातील नागरिकांना कुशल बनवणे हा आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 यात प्रशासन, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि व्यवस्थापन सर्वांच्या भूमिका विशद करण्यात आल्या आहेत. डॉ. के. कस्तुरीरंगण यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने पूर्व प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत तसेच व्यावसायिक शिक्षणापर्यंत विस्तृतपणे अनेक गोष्टींचा विचार करून,या धोरणाचा आराखडा तयार केला आहे. या धोरणानुसार शिक्षण अधिक अनुभवात्मक,सर्वसामावेशक, एकात्मिक, जिज्ञासू, संशोधन केंद्रित, लवचिक आणि अर्थातच आनंददायक होण्यासाठी अध्यापन शास्त्र उत्क्रांत होण्याची गरज आहे असे सांगितले आहे. या नवीन शैक्षणिक धोरणाने विद्यार्थी देशाच्या, राज्याच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात असतील, तरी त्यांना दर्जेदार शिक्षण पुरवणे अपेक्षित आहे. उपेक्षित,वंचित व अल्प प्रतिनिधित्व असलेल्या घटकांवर विशेष लक्ष केंद्रित केले गेले आहे. सर्वांना सहजशिक्षण, समता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण, उत्तरदायित्व या पाच मूलभूत स्तंभावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आधारित आहे.

शालेय शिक्षणाची ५+३+३+४ अशी नवीन संरचना असेल,शिवाय या शैक्षणिक धोरणात, कौशल्ये शिक्षणास प्रोत्साहन, घोकंपट्टी आधारित शिक्षण कमी करण्यास,अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्रात बदल करणे व त्यासाठी शालेय शिक्षणाचा आराखडा व राष्ट्रीय शिक्षक - प्रशिक्षण अभ्यास आराखडा 2009 मध्ये बदल करण्यात आला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे 21 व्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. या धोरणामध्ये शिक्षकाची भूमिका बदलणार

आहे. सर्वात प्रथम शिक्षकाला सर्वगुणसंपन्न व्हावे लागेल. शिक्षकाची भूमिका मार्गदर्शक, दिशादर्शक, समुपदेशक, समन्वयक नेतृत्व अशी असणार आहे. प्रत्येक शिक्षकाला तंत्रस्नेही व्हावं लागणार आहे. शाश्वत विकासासाठी आणि शालेय महाविद्यालय दोन्ही शिक्षण अधिक समग्र,लवचिक व अनुशासित आणि 21 व्या शतकाच्या गरजेनुसार अनुकूल आणि प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या क्षमतांचा विकास करून एक परिवर्तनशील समाज निर्माण करण्यासाठी उपयोगी पडेल. विद्यार्थ्यांमध्ये असणारी तार्किक वृत्ती,विचार करण्याचे कौशल्ये, समाजाच्या निर्मितीत सहभाग घेणारे कार्यक्षम आणि चांगले योगदान देणारे नागरिक तयार करणे हा महत्त्वाचा उद्देश आहे. या शैक्षणिक धोरणाचे प्रमुख वैशिष्ट्ये,म्हणजे मुक्त शिक्षण प्रणालीचा विचार, औपचारिक आणि अनौपचारिक दोन्ही शिक्षण पद्धतीचा समावेश असलेल्या शिक्षणाच्या अनेक मार्गांची सोय यामध्ये केलेली आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूल आणि स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूल यांनी देऊ केलेले मुक्त आणि दुरुस्त शिक्षण कार्यक्रम या धोरणाद्वारे विस्तारित आणि बळकट केले जातील. विद्यार्थ्यांना घरातील भाषेत किंवा मातृभाषेत शिक्षण घेता येणार आहे. विज्ञानासहित सर्व विषयाची उच्च दर्जाची पाठ्यपुस्तके मातृभाषेत उपलब्ध करून दिली जाणार आहेत. विद्यार्थ्यांना अनुभवा आधारित शिक्षण किंवा कला आणि खेळ यांचे एकात्मिकरण करण्यात आले आहे.कथाकथन आधारित अध्यापन या शैक्षणिक धोरणात महत्त्वाचे मानले गेले आहे. विद्यार्थ्यांनी 'फिटनेस आयुष्यभराचा' दृष्टिकोन म्हणून अंगीकारण्यासाठी 'फिट इंडिया' चळवळीत अभिप्रेत असलेल्या फिटनेसच्या पातळीसह, फिटनेटशी संबंधित जीवन कौशल्य साध्य करण्यासाठी, क्रीडा- एकात्मिक वर्गातील व्यवहारामध्ये समाविष्ट केले गेले आहे. त्याचबरोबर एकविसावे शतक हे तंत्रज्ञानाचा विस्फोट म्हणून ओळखले जाते, म्हणूनच शाळेच्या संपूर्ण कालावधीमध्ये गणित आणि संगणकीय विचार यावर भर दिला गेला आहे.त्याचबरोबर पायाभूत स्तरावर कोडी आणि खेळ यांचा नियमित वापर तसेच, विविध नाविन्यपूर्ण पद्धती वापरण्यात येणार आहेत. जेणेकरून गणितीय विचार अधिक मजेदार आणि गुंतवून ठेवणारा होईल.

प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या आवडीनुसार अभ्यासक्रम निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे. सुतारकाम, इलेक्ट्रिकचे काम, धातू काम,बागकाम, कुंभारकाम यासारख्या महत्त्वपूर्ण व्यवसाय कलांचा प्रत्यक्ष अनुभव मिळण्यासाठी हे शैक्षणिक धोरण उपयोगी पडणार आहे. इयत्ता सहावी ते आठवी दरम्यान कधीतरी सर्व विद्यार्थी 'दप्तराविना दहा दिवस' या उपक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. यामुळे सामाजिक भावना वृद्धिंगत होण्यास मदत होणार आहे. अशा प्रकारच्या अभ्यासक्रमाची रचना यात केलेली आहे. त्या दहा दिवसांमध्ये हे विद्यार्थी वेगवेगळ्या ठिकाणी भेटी देऊन शाळेबाहेरील उपक्रमांची ओळख करून घेणार आहेत. कृतीयुक्त शिक्षणाला अधिक महत्त्व असेल.संकलित मूल्यमापनाऐवजी आकारिक मूल्यमापन असा बदल करण्यात आला आहे. इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षा मध्ये बदल करण्यात आला असून त्यांची संरचना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचा 360 अंश बहुआयामी विकास घडवून आणण्यासाठी वेगवेगळ्या आकलनीय, भावात्मक आणि क्रियात्मक विकास घडवणे अत्यावश्यक मानले आहे. शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास आणि शिक्षक शिक्षणाचे बदलते स्वरूप यामध्ये देखील बदल करण्यात आला आहे.जे विद्यार्थी एखाद्या क्षेत्रात विशेष रुची आणि क्षमता दाखवितात, त्यांना सामान्य शालेय अभ्यासक्रमाच्या पलीकडे देखील त्या क्षेत्राचा अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. वर्गातील एकाच विषयात विशेष रुची असलेल्या विद्यार्थ्यांना पूरक संवर्धन साहित्य, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देऊन प्रोत्साहित करणे हे शिक्षकाचे लक्ष्य असेल.

या शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षण, बाल्यावस्थेत लाभ, आवडीनुसार शिक्षण, तंत्रज्ञान कुशलता, रोजगारक्षम कौशल्ये विकसन, सोयीनुसार शिक्षण, शिष्यवृत्ती आणि बहुभाषिकत्व अशा प्रकारच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शिक्षण क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या नवीन शिक्षकांसाठी गुणवंत व्यक्तीस संधी, रोजगाराची संधी, व्यवसायिक विकासाची संधी, आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्यास संधी, नवोपक्रमास वाव आणि संशोधन गुणवत्ता विकास संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देशाचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी आणि भावी पिढी सक्षम बनविण्यासाठी तसेच भविष्यवेधी शिक्षणाच्या दृष्टीने टाकलेले एक पाऊल म्हणावे लागेल प्रत्येक घटकाच्या विकासात हे धोरण नक्कीच पूरक ठरणार आहे.

- श्रीमती गोसावी / पुरी एस.टी.
एम.ए.एम.एड.(सेट)
(गुणवंत शिक्षका पुरस्कार प्राप्त),
सरस्वती विद्यालय व जुनिअर कॉलेज धामणगाव
पाट ता. अकोले जि. अहिल्यानगर
मो.- 9421701087

शिक्षण पद्धत: फायदे तोटे

नवीन शिक्षण पद्धती संकल्पना समोर आल्यानंतर अनेक प्रश्न पालक शिक्षक आणि विद्यार्थ्यांसमोर होते . परंतु जेव्हा या संकल्पनेची उकल झाली तेव्हा सहज आणि सोप वाटू लागलं . नव्या युगानुसार आपण बदललं पाहिजे , हे प्रथम पालकांनी स्वीकारल आहे . सध्या च्या सोशल मिडिया चा वापर आणि त्यातून घरपोच मिळणारी अद्ययावत माहिती यामुळे सर्वांनाच ही नवीन शिक्षण पद्धती उमगली. अर्थातच पालकांना कळल्यावर विद्यार्थ्यांना ही त्याची जाणीव झाली . शाळा महाविद्यालयात त्याबद्दल चे अधिकाधिक ज्ञान घेण्याची उत्सुकता शिक्षकांमध्ये निर्माण झाली त्यासाठी शासनाने ट्रेनिंगही आयोजित केली यामध्ये पारंपारिक शिक्षणाबरोबरच कौशल्यावर आधारित शिक्षण ,तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण यावर विशेष भर होता .त्यामुळे नेहमीच्या साच्यातून शिकवण आणि नवीन तंत्रज्ञान वापरून शिकवण यामध्ये शिक्षकांची कसरत होती .AI सारख्या विषयाला आणि त्या विषयाची इतर विषयांबरोबर सांगड हे पण एक कौशल्य होते आणि हळूहळू हे कौशल्य शिक्षक आत्मसात करत आहेत आणि त्याचा फायदा विद्यार्थ्यांनाही होत आहे .कौशल्यावर आधारित शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या अंगातील कला गुण ओळखून त्यांना आवडत्या क्षेत्रात शिक्षण घेणे सोपं झालं आहे एकाच वेळी विज्ञान आणि कला याचा समतोल साधण सोपं झालं आहे .विविध छंद जोपासणे आणि त्यातून अर्थार्जन करणे यावरही नवीन शिक्षण पद्धतीत योजना केली आहे .

नवीन शिक्षण पद्धतीनुसार आवश्यक बदलासाठी आवश्यक सोयी सुविधा असं गरजेचं आहे. गाव खेड्यात वाड्या वस्तीवरील शाळा महाविद्यालय यामध्ये शिक्षण घेताना इंटरनेटची सुविधा, लाईटची सुविधा ,अद्यावत तंत्रज्ञान, समाज माध्यमांची पोहोच या सर्वांचा नवीन शिक्षण पद्धती नुसार पुरवठा होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांसाठी 'निपूण भारत मिशन', पहिलीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी तीन महिन्यांचा अभ्यासक्रम 'विद्या प्रवेश', शिक्षण अध्यायनासाठीचे 'दीक्षा' हे ॲप आणि शिक्षकांसाठी 'निष्ठा' हा शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम सरकारकडून राबविले जात आहेत.

डिजिटल शिक्षण , मातृभाषा शिक्षण , व्यवहारिक शिक्षण हे महत्वाचे फायदे तर योग्य आवश्यक सुविधांचा अभाव हा तोटा याचा सर्वांगीण विचार करून विद्यार्थ्यांचं सर्वांगीण विकासाचा हेतू साध्य करणं सोप जाईल .

स्वाती प्रशांत गुरव
M.Sc.M.Sc.DSM
कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय आणि
ज्युनिअर कॉलेज भुईंज, सातारा.
मो.8459950806

बंडूचे 'स्मार्ट' कारनामे

बंडू आठवीत. त्याच्या शाळेत 'नवीन शिक्षण पद्धती' आली आणि वर्गात पोरांपेक्षा टॅबच जास्त चमकायला लागले. बाई म्हणाल्या, "आजपासून पुस्तक कमी, प्रोजेक्ट जास्त." बंडूला हायसे वाटले. कारण पाठांतर म्हणजे त्याचा जन्मजात शत्रू.

फायद्याची बाजू सुरू झाली....

सायन्सचा तास. बाईने VR गॉगल दिला. बंडूने तो लावला आणि थेट ज्वालामुखीच्या आत पोहोचला. लाव्हा उसळताना बघून तो किंचाळलाच, "आई गं!" पण पृथ्वीचा गाभा काय असतो ते कायमचे डोक्यात बसले.

कोडिंगच्या तासाला त्याने 'शेळी-गवत-वाघ'चा गेम बनवला. सरांनी शाबासकी दिली. ज्या बंडूला 'ब' लिहिता येईना, तो आता ॲप बनवतो म्हणून आख्ख्या गावात बातमी झाली.

इतिहासाच्या प्रोजेक्टसाठी त्याने आजोबांची मुलाखत घेतली. 'आझाद हिंद सेने'तले त्यांचे किस्से ऐकून त्याने पॉडकास्ट बनवले. 200 लाईक मिळाले. बंडूला समजले, मार्कांपेक्षा स्किल भारी.

.....पण तोट्याची ट्यूब पेटली

गणिताची ऑनलाइन टेस्ट होती. बंडूने हुशारी केली. टॅब बाजूला ठेवून आईच्या फोनवर ChatGPT ला प्रश्न टाकले. सगळे बरोबर. रिझल्ट आला: 100 पैकी 100. बाईने कौतुक केले. दुसऱ्या दिवशी फळ्यावर तेच गणित सोडवायला सांगितले. बंडूचा चेहरा बघण्यासारखा झाला. कॉपीचे बिंग फुटले.

पुढच्या आठवड्यात लाईट गेले. नेटवर्क गायब. मीनाच्या घरचा टॅब चार दिवस बंद. तिचा अभ्यास बुडाला. ती रडत बाईंकडे आली. बंडूचे डोळेही लाल. कारण दिवसभर टॅब बघून रात्री झोपच लागेना. आई ओरडली, "मैदानात खेळायचा की फक्त बोटं फिरवायची?"

शिवाय, नवीन ॲप वापरायचे कसे हे सरांनाच कळेना. ते वैतागून म्हणाले, "ह्यापेक्षा आमचा फळा-खडू बरा."

पालक सभेत बंडू उभा राहिला. म्हणाला, "टॅबमुळे मी ज्वालामुखी बघितला, ॲप बनवले. हे भारी. पण त्यामुळे मी आळशी पण झालो. मीनासारखी मुले मागे पडली. सरांना पण ट्रेनिंग द्या की!"

मुख्याध्यापक हसले. त्यांनी नियम केला: सोम-बुध-शुक्र 'टॅब डे', मंगळ-गुरु-शनि 'फळा डे'. शाळेतच 'चार्जिंग स्टेशन' आणि 'नेटवर्क कट्टा' सुरू केला. बंडूला कॉपीमुळे शून्य मार्क मिळाले, पण 'प्रामाणिकपणाचा प्रोजेक्ट' बनवायची शिक्षा मिळाली. त्याने 'टॅबचे फायदे-तोटे'वरच भन्नाट नाटक बसवले.

आता बंडू दिवसा टॅबवर कोडिंग करतो आणि संध्याकाळी मैदानात कबड्डी. नवीन शिक्षण पद्धती म्हणजे नुसता टॅब नाही, तर डोकं वापरण्याची सवय आहे, हे त्याला कळले.

तात्पर्य: तंत्रज्ञान घोडा आहे, आणि शिस्त त्याचा लगाम. दोन्ही असतील तरच शर्यत जिंकता येते.

सौ. सानिका सचिन पाटील
लालबाग, मुंबई
मो.7021186163

नव-विचार नवीन प्रणाली

सध्याच्या आधुनिक नवनिर्मित तांत्रिक युगातील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करता कांही गोष्टी खटकतात. या आढळून आलेल्या त्रुटी दूर करून, कसे प्रगती पथावर जाता येईल हे प्रथम पहावे लागेल. हीच या वैचारिक लेखाची मध्यवर्ती मूळ कल्पना आहे.

पूर्वी गुरुच स्थान हे प्रबळ होत. गुरु पौर्णिमेला गुरुचे स्मरण करून,गुरु चरणी नतमस्तक होण्याचा हा दिवस असे. आजन्म आठवणींत राहणारे गुरुतुल्य असे हे व्यक्तिमत्त्व मानले जाते.

गुरु म्हणजे गृह्य रूप ! गुरु अज्ञानाचा अंध:कार नाहीसा करून, ज्ञानरूपी प्रकाशाच्या वाटेकडे घेऊन जाणारा दुवा असतो. गुरुचे आज्ञापालन करणे,ही सर्वोत्कृष्ट गुरुसेवा आहे. असे म्हटले जाते. हे शिष्याचे श्रद्धास्थान आता यंत्रमानवाने घेतले आहे. हा काळाचा अगाध महिमा आहे. गुरुची संकल्पना मोडीत आली असून, येथूनच नवविचारांना कलाटणी मिळून नवतंत्रज्ञान उफाळून वर आले. व नवीन शिक्षण पद्धतीचे मूळ रुजले जाऊन अंमलात आणण्यास सुरुवात झाली.

माणूस हा विकसनशील मनोवृत्तीचा आहे. नव नवीन शोध लावून स्वत:ची प्रगती करण्यास तो नेहमी तत्पर असतो. गरज ही शोधाची जननी असते. या उक्ती प्रमाणे कमी वेळात जास्त काम करण्याची कुवत नवं तंत्रज्ञान वापरून मानवाने उपलब्ध करून, माणसाची चिंता दूर केली आहे. या चिकाटीला त्रिवार वंदन !

अशा अनेकविध सुविधांनी कामाचा झपाटा वाढला. कालगती प्रमाणे, याचा परिणाम माणसाला माणसा पेक्षा यंत्र जवळची वाटू लागली. मातीच्या गोळ्याला आकार देण्याचे कार्य गुरु ऐवजी नव तंत्रज्ञाना कडून अवगत होऊ लागले. त्याचे आता सुबक घडे बनलेले दिसत आहेत. शिष्यांना यंत्रगुरु मार्फत ज्ञानार्जन मिळू लागले.

गुरु रूपाने नवीन शिक्षण पद्धतीचे आवाहन निष्ठेने पार पाडणे क्रमप्राप्त आहे.अर्थात त्याचे फायदे ठळक दृष्टीपथास येऊ लागलेत यात काही गैर नाही. फायदा आहे तेथे थोड्याफार फरकाने तोटे हे असणारच. फायद्या-तोट्याचे गणित करून आपल्याला जगाच्या मागे न पडता काळा बरोबर चालणे उचीत आहे.

गुरुची शिष्यावर असलेली मर्जी आता सहजगत्या यंत्राकडून मिळू लागली. व नवीन शिक्षण प्रणाली उदयास आली. व गुरुची आवश्यकता वाटेनाशी झाली.

यंत्रावर मिळणाऱ्या ज्ञानाकडे कल वाढीस लागली. नकळत शिष्याची बौद्धिक भूक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भागविली जाऊ लागली. आधुनिक काळातील युवावर्ग ती आत्मसात करून आपली बौद्धिक पातळी वाढवू लागले. प्रत्येक गोष्ट इंटरनेट वरून प्राप्त होऊ लागली. अचूक व समर्पक उत्तराची ज णू चढाओढ लागून प्रश्नांची सरबत्ती सुरु झाली. व त्यातूनच अपेक्षांची मांदियाळी निर्माण झाली. माणूस आत्मविश्वास पूर्वक विचार मंथन करून काम उरकू लागला. दिशादर्शक गुरू, घरच्या घरी आरामात मिळाल्याने घरीच काम करणे सोयीस्कर वाटू लागले.

नव तरुणात विव्दत्तेचा कस लागून, पुढील पिढी आत्मनिर्भर होऊ लागली. प्रत्यक्ष गुरुजनां पेक्षा नव तंत्रज्ञानावर अटळ विश्वास बसू लागला. मोबाईल किंवा लॅपटॉपची एक कळ दाबली की अनेक पर्याय व जगभराचेच नव्हे तर अंतराळातील देखील ज्ञान संपादन करता येऊ लागले. हा एक अदभूत चमत्कार करणारा कलाविष्कारच म्हणावा लागेल. उत्सुकते पोटी कैक संशोधन वीर निष्ठेने कार्यरत होवून संशोधक झाले. कुठल्याही प्रश्नाचे अचूक समर्थन इंटरनेट वरून मिळू लागले. व त्याची बिनचूक उत्तर समोर येऊ लागली.

गुरुचे मानवाच्या जीवनात असणारे अनन्या साधारण महत्व नवीन शिक्षण पद्धतीने आत्मसात केले.

आकडेमोड मुखोद्गत नकरता आपसुक एका सेकंदाच्या अवधीत संगणक, कॅलक्यूलेटर प्राप्त होऊ लागले. वेळेची बचत होऊन, कामाने वेग घेतला. कमी वेळात जास्त कामाने जागा घेतली.

मनुष्यप्राणी जन्मत:च बुद्धीजीवी व जिद्दी आहे. सध्याचे तंत्रज्ञान हे सुध्दा आपले निर्जीव मदतनीस म्हणजे गुरुच आहेत. हे समजून त्याचा योग्य तो सन्मान राखला पाहिजे. माणसाची मनोभावना कुणाचा तरी आदर्श ठेवून जगण्याची असते.

बहुतांशी व्यक्तीमत्व विकासाची जडणघडण ही गुरु-शिष्य या पारंपरिक आदर्श नाते संबंधानातून झालेली आढळून येते. तेथे गुरु-शिष्याचे प्रेमाचे बंध होतात. पण सध्याची ही वस्तुस्थिती नाही. जग क्षणा क्षणाला पुढे पुढे धावत असल्याचे निदर्शनास येत आहे. नवं शिक्षण पद्धती तांत्रिक युगातील नवतंत्रज्ञानाचा गुरु झालाय हे समाजाचे चित्र आहे.व्यक्तिमत्त्व विकासासाला तंत्रज्ञानातर्फे नवा वाटाड्या मिळाला.

आजकालच्या धकाधकीच्या, तणावपूर्ण, वेगवान जीवनशैलीचे तंत्रज्ञान हे हृदय आहे. जलदगतीने गुगलबाबा कडून मिळणारे अचूक उत्तर, मानवाला

जास्त नजीकच व उपयुक्त वाटते. त्यामुळे सजीव गुरूचे रूप आपोआपच कालबाह्य होऊन, विद्यार्जनाचे काम जास्त सुलभ झाले आहे. पुढील पिठी त्यात जीव ओतून एकरूप झालेली दिसत आहे.

कालानुरूप जगाच्या बरोबर राहणे क्रमप्राप्त आहे. तेच मानव देश-विदेशात करत आहे.केव्हाही उपलब्ध असणारा सल्लागार कुणाला नकोसा वाटेल? ही माणसाची मनस्थिती झाली आहे.

कोविड काळात दुर्गम भागातील विद्यार्थ्यी ज्यांना शालेय शिक्षण घेणे अवघड होते. त्यांना घर बसल्या संगणका व्दारे शिक्षण घेण्याचा चांगला पर्याय मिळाला. ग्रामीण भागातील विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ शकतात. तंत्रज्ञानाने जरी आपले जीवन सुकर केले, तरी त्याचे नकारात्मक परिणामही आहेत. केवळ वैयक्तिक जीवनावर नाही तर अत्याधिक वापर मानसिक शारीरिक, सामाजिक क्षेत्रावर प्रभाव टाकत आहे.

धोरणात्मक समतोलाने आपण त्याचा फायदा घेऊ शकतो. जेणेकरून मानवी कल्याणासाठी तो उपयुक्त ठरू शकेल.

पेरावे तसे उगवते. विश्वशक्तीचे हे संशोधन एकरूप एकाग्र होऊन, संपूर्ण सफल होताना दिसत आहे. अशी फलद्रुप झालेली शक्ती निरनिराळ्या रूपात अनुभवास येत आहे. त्यातूनच नवतंत्र ज्ञानाच्या रूपाने जन्मास घातलेला आविष्कार लोकांच्या समोर साकार झाला आहे.

नवीन शिक्षण पद्धती दैवत समजून शिष्याचा पुढील भवितव्याचा वाटाड्या झाला आहे. हे गृहीत धरून मनातून त्याची आज आनंदाने पाद्य पुजा होत आहे. हे पाहून पुढील भविष्यात आपले भवितव्य उज्ज्वल खास प्रेरणादायी असणार आहे याची खात्री वाटते.

उत्पत्ती, लय या स्थितीतून माणूस जात असतो. यातून मुक्तता मिळण्यासाठी विचारांची जोड माणसाला हवीहवीशी वाटते. म्हणूनच माणूस स्वतः ला घडविण्याच्या शोधात सतत असतो.

दृष्टिकोन बदलला की तत्त्व बदलतात. विचार संकल्पना यात तफावत पडून, यांत्रिकीकरणाचे गणित घट्ट पाळेमुळे रूजवायला कारणीभूत ठरतात. नवीन उत्पतीची क्रांती होवून, उरली-सुरली संकल्पना पूर्ण करायला गुगलबाबा हजर असतातच.

नवं शिक्षण पद्धतीने योग्य वेळी योग्य दिशा मिळून धैर्याने तोंड देण्याचे बळ मिळावे व नितळ, स्वावलंबी मूर्ती तयार व्हावी.हा खरी अंतरीक हेतू आहे. कोवळ्या वयात मत परिवर्तन होणे महत्त्वाचे असते व ते होत आहे असे वाटते. कारण पुढील पिढी जोमाने उंच भरारी घेताना दिसत आहे.

या पार्श्वभूमीवर आजच्या यांत्रिकिकरणाच्या जगतात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे तंत्रज्ञान पाठीशी असल्याचा आधार वाटतो. युवापिढीत परिवर्तन होऊन, स्वतःचे विचार मांडण्याची प्रगल्भता आली आहे.

गती आणि कार्यक्षमतेचा विचार करता, थोडक्यात काय इंटरनेट व नवीन शिक्षण पद्धती हीच शिक्षणाची गुरूतुल्य आधारस्तंभ झाली आहे.

शिक्षणाचा खेड्या-पाड्यापासून ते शहरापर्यंत झालेला बदल सर्वांचा चांगला फायदा करता झाला आहे.

मानवाने ही केलेली क्रांती नावाजण्या जोगी आहे. इंटरनेटने ज्ञानपिपासू माणसाची उणीव भरून काढली आहे. ओघा-ओघाने आलेच की इंटरनेटमुळे नवीन शिक्षण पद्धती उजळून निघून गतिमान झाली आहे. हे ठळक दिसत आहे. आधुनिक काळातील शिक्षण पद्धतीचे स्थान बळकट झाले आहे असे म्हणावेसे वाटते म्हणजेच फायद्याचे झाले आहे.

हा मानवाचा शिक्षण क्षेत्रात झालेला कायापालट समृद्धीच्या यश शिखराकडे नेईल, असा मागोवा घेतल्यावर निष्कर्ष निघतो.

श्रीमती नीला पाटणकर,
शिकागो अमेरिका
मो. +1 (847) 840-3286

स्पर्धा की शिक्षण?

एका 'गुणावंत' स्वप्नाची गोष्ट

"आई, मला ९२.४० टक्के मिळाले!" – सुजयने उत्साहाने घरात पाय ठेवत रिझल्टची प्रिंट आजीच्या हातात दिली. घरात आनंदाचे वातावरण होते. तेवढ्यात सुजयचे बाबा ऑफिसमधून आले. त्यांनी रिझल्ट पाहिला, चेहऱ्यावर हसू आणण्याचा प्रयत्न केला, पण त्यात एक सुप्त चिंता लपलेली होती.

त्यांनी सुजयच्या पाठीवर थाप मारली आणि म्हणाले, "छान सुजय! पण शेजारच्या देशपांड्यांच्या अद्वैतने ९६% मारलेत. आता चांगल्या कॉलेजला ॲडमिशन मिळणं अवघड होईल रे. कट-ऑफ खूप वर जातो. स्पर्धा कठीण आहे!"

सुजयच्या चेहऱ्यावरचा आनंद एका क्षणात उडाला. ६५% मिळवूनही पास झालेल्या त्याच्या मित्राला समाज आधीच 'कमी टक्के पडलेला' मानत होता, पण आज ९२% मिळवूनही सुजयला स्वतःचा आनंद साजरा करता येत नव्हता. कारण ८५% पेक्षा जास्त मिळवणाराच फक्त 'हुशार' आणि त्याखालील सगळे 'सामान्य', हा अदृश्य निकष त्याच्या घरातही पोहोचला होता.

मातृभाषेचे पंख आणि परकीय भाषेचे ओझे

सुजय हा गावातकडच्या, मातृभाषेच्या शाळेत शिकलेला मुलगा. विज्ञानाचे प्रयोग असोत की गणिताची कोडी... मराठीत शिकताना त्याच्या संकल्पना अगदी स्पष्ट होत्या. तो आत्मविश्वासाने आणि आनंदाने तासन् तास नवनवीन गोष्टी शिकायचा.

पण खरी गोची झाली १० वी नंतर! अकरावी सायन्सला गेल्यावर अचानक सगळं शिक्षण इंग्रजीतून सुरू झालं. ज्या सुजयला वनस्पतींमधील 'प्रकाशसंश्लेषण' अगदी सहज समजायचं, त्याला आता 'Photosynthesis' चे स्पेलिंग आणि व्याख्या पाठ करताना तासन् तास घालवावे लागत होते. ज्या वयात त्याने विषयाचे सखोल ज्ञान आनंदाने घ्यायला हवे होते, त्या वयात त्याचा जास्तीत जास्त वेळ इंग्रजी शब्दांचे अर्थ डिक्शनरीत शोधण्यात आणि ते घोकण्यात जाऊ लागला.

आपल्याला जर मुलांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि आनंद टिकवून ठेवायचा असेल, तर प्राथमिक शिक्षणानंतर पुढचे शिक्षणही त्यांच्या सोयीच्या, ओळखीच्या भाषेत मिळणे गरजेचे आहे, हे सुजयच्या रोजच्या संघर्षातून जाणवत होते.

स्पर्धा नेमकी कशाची आणि कोणाशी?

कॉलेजच्या पहिल्याच दिवशी सुजयने प्राध्यापकांना विचारले, "सर, या विषयातून मला नक्की काय नवीन शिकायला मिळेल?"

प्राध्यापक हसले आणि म्हणाले, "सुजय, इथे काय शिकायला मिळेल यापेक्षा या कॉलेजचा रेकॉर्ड बघ. इथून मुलं थेट मोठ्या स्पर्धा परीक्षांमध्ये आणि नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवतात. तुला फक्त परीक्षेच्या तयारीवर आणि मार्कांवर लक्ष केंद्रित करायचे आहे."

सुजय चक्रावून गेला. स्पर्धा करायची नेमकी कशाची आणि कोणाशी, याचा अर्थच त्याला समजत नव्हता. इथे शिकण्यासाठी किंवा ज्ञान मिळवण्यासाठी स्पर्धा नव्हतीच, तर स्पर्धा होती फक्त कुठेतरी 'प्रवेश' मिळवण्यासाठी! या गळेकापू स्पर्धेतून उद्या प्रवेश तर मिळेल, पण "तिथे खरंच किती शिकायला मिळाले आणि त्याचा पुढे आयुष्यात किती उपयोग होणार?" याचे उत्तर देण्यास केवळ वेळच समर्थ होता.

याच मारामारीत सुजय पूर्णपणे बदलला. तो आता 'ज्ञानार्थी' राहिला नव्हता, तर फक्त एक 'परीक्षार्थी' झाला होता. केवळ जास्तीत जास्त गुण मिळवण्याच्या नादात तो कुटुंबातील नातेसंबंधांना मुकत गेला आणि स्वत:मधील चित्रकलेची, गिटार वाजवण्याची उपजत कलाकौशल्यांना पणाला लावून फक्त एक मेकॅनिकल रोबोट बनत चालला होता.

आशेचा किरण: नवीन शैक्षणिक धोरणाचे (NEP) फायदे

सुजयसारख्या लाखो विद्यार्थ्यांची हीच व्यथा ओळखून सरकारने 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' (NEP) आणले आहे. सुजय जेव्हा या धोरणाचा अभ्यास करतो, तेव्हा त्याला त्याचे करिअर बदलणारे अनेक फायदे स्पष्टपणे दिसतात:

• **पॅटर्न बदलला (५+३+३+४ पद्धत):** आता जुनी १०+२ पद्धत बंद होऊन मुलांच्या वयानुसार शिक्षणाचे टप्पे ठरवले गेले आहेत. यात सुरुवातीची वर्ष खेळण्यातून शिकण्यावर भर असल्यामुळे मुलांवर अभ्यासाचे ओझे नसेल.

• **आर्ट्स-सायन्सची भिंत ढासळली (Flexibility):** सुजयला फिजिक्स शिकता शिकता जर गिटार वाजवणे किंवा चित्रकला शिकायची असेल, तर तो मुख्य विषय म्हणून ते निवडू शकतो. सायन्सच्या मुलाने संगीत शिकले तर त्याचे मार्क कुठेही वाया जाणार नाहीत.

• **पाठांतराला सुट्टी, कौशल्यांना महत्त्व:** आता परीक्षा फक्त 'कोणी किती घोकंपट्टी केली' यावर गुण देणार नाही, तर विद्यार्थ्याला त्या विषयाचे प्रात्यक्षिक (Practical) ज्ञान किती आहे, त्याचे विश्लेषण करण्याची क्षमता किती आहे, यावर मूल्यमापन केले जाईल. त्यामुळे सुजय सारखा विद्यार्थी 'परीक्षार्थी' न राहता 'ज्ञानार्थी' बनेल.

• **मल्टीपल एंट्री आणि एक्झिट (शिक्षण वाया जाणार नाही):** जर एखाद्या विद्यार्थ्याला पैशांच्या अडचणीमुळे किंवा इतर कारणांमुळे कॉलेजचे दुसरे वर्ष झाल्यावर शिक्षण सोडावे लागले, तर त्याचे वर्ष वाया जाणार नाही. त्याला दोन वर्षांचा 'डिप्लोमा' मिळेल आणि परिस्थिती सुधारल्यावर तो थेट तिसऱ्या वर्षाला पुन्हा प्रवेश घेऊ शकेल.

• **मातृभाषेतून शिक्षणाचा पाया:** प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिकण्याची सोय केल्यामुळे मुलांचा शिक्षणातील आनंद आणि आत्मविश्वास कायम राहील.

चिंतेची बाजू: धोरणातील आव्हाने आणि तोटे

हे धोरण सुजयला कागदावर खूप सुंदर वाटले, पण जसा त्याने सखोल विचार केला, तसे या धोरणातील काही तोटे आणि अंमलबजावणीतील मोठ्या अडचणी त्याच्या समोर आल्या:

• **१० वी नंतरच्या इंग्रजीची दरी तशीच**: प्राथमिक शिक्षण मातृभाषेत देण्याचे ठरवले असले, तरी १० वी नंतरच्या उच्च शिक्षणात (उदा. मेडिकल, इंजिनिअरिंग) अजूनही इंग्रजीचाच वरचश्मा आहे. त्यामुळे सुरुवातीला मातृभाषेत शिकलेल्या सुजयसारख्या ग्रामीण भागातील मुलाला पुढे अचानक इंग्रजीच्या मोठ्या आव्हानाचा सामना करावाच लागेल.

• **डिजिटल दरी आणि पायाभूत सुविधांचा अभाव:** या धोरणात डिजिटल शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानावर खूप भर दिला आहे. परंतु, आपल्या देशातील ग्रामीण भागातील शाळांची अवस्था पाहता, तिथे अजूनही वीज, संगणक आणि इंटरनेट पोहोचलेले नाही. त्यामुळे शहरातल्या आणि गावातल्या मुलांमधील शैक्षणिक दरी अजून वाढण्याची भीती आहे.

• **शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा मोठा प्रश्न:** जुन्या पद्धतीने वर्षानुवर्षे शिकवणाऱ्या शिक्षकांना अचानक या नवीन, कौशल्यांवर आधारित पद्धतीनुसार शिकवणे कसे जमणार? त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी लागणारी मोठी यंत्रणा आणि वेळ आपल्याकडे उपलब्ध आहे का, हा मोठा यक्षप्रश्न आहे.

• **खर्चिक शिक्षण आणि अंमलबजावणीचा संभ्रम:** नवीन प्रयोगशाळा, संगीत-कलेचे साहित्य, व्यावसायिक शिक्षणाचे कोर्सेस यामुळे शिक्षण अधिक महाग होण्याची शक्यता आहे, जी सर्वसामान्य पालकांच्या खिशाला परवडणारी नसेल. तसेच प्रत्येक राज्याची भाषा आणि परिस्थिती वेगळी असल्याने हे धोरण देशभर सारख्याच पद्धतीने लागू करणे अत्यंत गुंतागुंतीचे आहे.

निष्कर्ष

सुजयची ही गोष्ट आजच्या प्रत्येक घरातील विद्यार्थ्यांची आणि पालकांची कहाणी आहे. नवीन शैक्षणिक धोरण नक्कीच एक उत्तम विचार आणि नवा दृष्टिकोन घेऊन आले आहे, यात शंका नाही. त्याचे फायदे आपल्या शिक्षण व्यवस्थेला सुधारेल, पण त्यातील त्रुटी आणि तोटे दूर करण्याचे मोठे आव्हान सरकार आणि समाजासमोर आहे.

शेवटी, जोपर्यंत पालक आणि समाज म्हणून आपण स्वत: "स्पर्धा नेमकी कोणाशी आणि कशासाठी?" या मानसिकतेतून बाहेर पडत नाही, तोपर्यंत कोणतेही धोरण १००% यशस्वी होऊ शकत नाही. सुजयला फक्त 'मार्क्स' मिळवण्याचे मशीन बनवण्यापेक्षा, त्याला त्याच्या सोयीच्या भाषेतून, आनंदाने आणि कौशल्याने समृद्ध माणूस बनवणे, हेच खऱ्या शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे!

- गायत्री लाड
शालेय समुपदेशक
मो.9960828880

फायदे - तोटे आणि अंमलबजावणी

शिक्षण ही समाजाच्या प्रगतीची मूलभूत शक्ती मानली जाते. बदलत्या काळानुसार समाज, विज्ञान, तंत्रज्ञान आणि जीवनपद्धतीत मोठे बदल होत गेले तसे शिक्षण व्यवस्थेमध्येही बदल होणे आवश्यक बनले. पारंपरिक शिक्षण पद्धती ही मुख्यतः पाठांतर, गुण आणि परीक्षाभोवती फिरणारी होती; मात्र आजची नवीन शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारी आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP2020) मुळे भारतीय शिक्षण व्यवस्थेला नवी दिशा मिळाली असून शिक्षण अधिक अनुभवाधारित, कौशल्यकेंद्रित आणि तंत्रज्ञानाशी सांगड घालणारे बनवण्याचा प्रयत्न सुरु झाला आहे.

नवीन शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील माहिती देण्यावर भर न देता त्यांना विचार करायला, प्रश्न विचारायला आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिकायला प्रोत्साहन दिले जाणार आहे. प्रकल्पाधारित अध्ययन, समूहचर्चा, प्रयोग, सादरीकरण, ऑनलाइन शिक्षण आणि कौशल्याधारित अभ्यासक्रम यांमुळे विद्यार्थ्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. त्यामुळे शिक्षण अधिक रंजक, जिवंत आणि व्यवहार्य बनेल यात शंका नाही. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून त्यांची कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलताही विकसित होईलच.

तंत्रज्ञानाचा वापर हे नवीन शिक्षण पद्धतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. स्मार्ट क्लासरूम, डिजिटल लायब्ररी, ऑनलाइन वर्ग, शैक्षणिक ॲप्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे शिक्षण अधिक सुलभ झाले आहे. इंटरनेटमुळे जगभरातील माहिती काही क्षणांत उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारत आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आता मोठ्या शहरांतील शिक्षणसुविधांचा लाभ घेता येत आहे. कोरोनाच्या काळात ऑनलाइन शिक्षणाने शिक्षणाची प्रक्रिया अखंडित ठेवली, हे आधुनिक शिक्षण पद्धतीचे महत्त्व अधोरेखित करणारे उदाहरण ठरले. परंतु याच काळात ज्यांनी शिक्षण घेतले त्यांच्यात दिसलेले बदल विचार करण्यास प्रवृत्त करणारे आहेत, हे तेवढेच खरे.

नवीन शिक्षण पद्धतीमध्ये कौशल्यविकासाला विशेष महत्त्व दिले जात आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवीधर बनवण्यापेक्षा त्यांना रोजगारक्षम बनवण्यावर भर दिला जात आहे. व्यावसायिक शिक्षण, इंटर्नशिप, प्रयोगशाळा प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभव यांमुळे विद्यार्थी स्वावलंबी बनत आहेत. आजच्या स्पर्धात्मक जगात केवळ गुण नव्हे, तर कौशल्य आणि व्यक्तिमत्व महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे ही शिक्षण पद्धती काळाची गरज बनली आहे.

मात्र, या शिक्षण पद्धतीचे काही तोटेही आहेत. तंत्रज्ञानाचा अतिरेक विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इंटरनेटवर अधिक अवलंबून बनवत आहे. सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स आणि डिजिटल मनोरंजन यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष अभ्यासापासून विचलित होत आहे. वाचनाची सवय कमी होत असून स्वतंत्र चिंतनाची क्षमता कमी होण्याची भीती व्यक्त केली जाते. काही वेळा विद्यार्थी माहिती गोळा करतात; पण तिचा सखोल अभ्यास करण्याकडे दुर्लक्ष होते.

ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक विषमता हीदेखील मोठी समस्या आहे. शहरांमध्ये डिजिटल सुविधा सहज उपलब्ध असल्या तरी ग्रामीण भागात अजूनही इंटरनेट, संगणक, प्रशिक्षित शिक्षक आणि आर्थिक साधनांची कमतरता आहे. त्यामुळे नवीन शिक्षण पद्धतीची अंमलबजावणी सर्व स्तरांवर समानपणे होताना दिसणार नाही. आधुनिक शिक्षणाची फळे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्यासाठी शासन आणि समाज या दोघांनीही एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

नवीन शिक्षण पद्धतीची अंमलबजावणी ही केवळ धोरण जाहीर करून पूर्ण होत नाही. त्यासाठी सक्षम शिक्षक, अद्ययावत अभ्यासक्रम, तांत्रिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित वातावरण आवश्यक असते. राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये प्राथमिक स्तरापासून कौशल्याधारित आणि बहुभाषिक शिक्षणावर भर देण्यात आला आहे. तसेच ५+३+३+४ ही नवीन शैक्षणिक रचना लागू करण्यात आली आहे. मात्र, या बदलांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण, ग्रामीण भागातील सुविधा, डिजिटल साक्षरता आणि आर्थिक नियोजन यांवर अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

शासनाने शिक्षण क्षेत्रात अनेक सुधारणा सुरु केल्या असल्या तरी त्यांची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी समोर येतात. काही शाळांमध्ये तांत्रिक साधनांची कमतरता आहे, तर काही ठिकाणी प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध नाहीत. अनेक पालक आणि विद्यार्थी अजूनही पारंपरिक शिक्षण पद्धतीशी मानसिकदृष्ट्या

जोडलेले आहेत. त्यामुळे नवीन बदल स्वीकारण्यासाठी जनजागृती आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक ठरते.

शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून समाज घडविण्याची प्रक्रिया आहे. आधुनिक शिक्षणाने विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्य आणि संधी दिल्या पाहिजेत; पण त्याचबरोबर नैतिक मूल्ये, संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीवही विकसित केली पाहिजे. तंत्रज्ञान आणि संस्कार, आधुनिकता आणि मानवता यांचा समतोल राखणारी शिक्षण व्यवस्था निर्माण करणे ही आजची खरी गरज आहे.

आधीची शिक्षणपद्धती चांगली का नवीन चांगली यावर वाद विवाद करणे मी टाळेल, कारण इथे माझे वैक्तिक मत नं देता केवळ NEP2020 चे फायदे तोटे सांगणे हे विषयाला अनुसरून लिहिणे योग्य राहील. नवीन शिक्षण पद्धती ही निश्चितच भविष्याभिमुख आणि परिवर्तनशील आहे. ती विद्यार्थ्यांना अधिक सक्षम, जागरूक आणि स्पर्धात्मक बनवते. मात्र, तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन, शिक्षक, पालक आणि समाज या सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. योग्य नियोजन, समान संधी आणि मूल्याधारित शिक्षण यांच्या माध्यमातूनच नवीन शिक्षण पद्धती भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रभावी ठरू शकते.

(लेखक सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्य क्षेत्रात सक्रिय कार्यरत आहेत. ते आपुलकी चॅरिटेबल ट्रस्ट, नांदेडचे सचिव तसेच सायास पब्लिकेशनचे प्रोप्रायटर म्हणून कार्य पाहत आहेत. 'कुळवाडी दिवाळी' या दिवाळी अंकाचे कार्यकारी संपादक व प्रकाशक म्हणूनही त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'शोध प्रज्ञावंतांचा' गुणवत्ता शोध परीक्षेचे संयोजक म्हणून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ताविकासासाठी ते सातत्याने कार्यरत असून अनुसया राघोजी जाधव स्मृती साहित्य पुरस्काराचे सहसंयोजक म्हणून साहित्य क्षेत्रातही मोलाचे योगदान देत आहेत.)

– डॉ. सौरभ माधवराव जाधव
BAMS (Ayu.), BA (Psychology), CCH (Mumbai), CSVD (Pune)
०६, कुळवाडी, साई नगरी, काबरा नगरजवळ, तरोडा पोस्ट ऑफिस, वाडी (बु.), नांदेड
भ्र. ९६५७४७८८४४

यश, अपयश आणि पुढील दिशा !

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) हे भारताच्या शिक्षण क्षेत्रातील एक ऐतिहासिक आणि दूरदृष्टी असलेले धोरण आहे. स्वातंत्र्यानंतर शिक्षण व्यवस्थेत सर्वात मोठा बदल घडवणारे हे धोरण २९ जुलै २०२० रोजी जाहीर झाले. १९८६ च्या जुन्या धोरणाची जागा घेत, हे धोरण शिक्षणाला अधिक समावेशक, लवचिक, कौशल्य-केंद्रित आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे वळवते. आज, धोरण जाहीर झाल्यापासून सहा वर्षे उलटली आहेत. या काळात काही क्षेत्रांत ठोस प्रगती दिसली आहे, तर काही ठिकाणी अपेक्षित यश मिळालेले नाही.

NEP 2020 चे मूलभूत उद्दिष्ट शिक्षण व्यवस्थेला २१व्या शतकातील गरजेनुसार तयार करणे आहे. यात शिक्षण अधिक लवचिक, बहुविषयक आणि व्यावहारिक बनवणे, विद्यार्थ्यांवर परीक्षांचा अनावश्यक तणाव कमी करणे आणि मातृभाषेतून शिक्षण देणे यांचा समावेश आहे.

शाळा शिक्षणाची रचना बदलून जुनी १०+२ पद्धत सोडून नवीन ५+३+३+४ रचना आणली आहे. यात बालवयातील पाया मजबूत करणे (Foundational Stage), तयारीचा टप्पा (Preparatory), मध्यम टप्पा (Middle) आणि माध्यमिक टप्पा (Secondary) यांचा समावेश आहे. मातृभाषा किंवा स्थानिक भाषेत शिक्षण देण्यावर भर दिला आहे, ज्यामुळे लहान वयात ज्ञान ग्रहण करणे सोपे होते. विद्यार्थ्यांना कोणत्याही विषयांचे मिश्रण निवडण्याची स्वातंत्र्य मिळते .

उच्च शिक्षणातही मोठे बदल आहेत. विद्यार्थ्यांना प्रवेश आणि बाहेर पडण्याची अनेक संधी (Multiple Entry-Exit) मिळतात. एक वर्ष पूर्ण केल्यास प्रमाणपत्र, दोन वर्षांसाठी डिप्लोमा आणि पूर्ण पदवीसाठी डिग्री मिळू शकते. शिक्षकांसाठी सतत व्यावसायिक विकास (Continuous Professional Development) अनिवार्य करण्यात आला आहे. भारतीय ज्ञान प्रणाली (Indian Knowledge Systems), तंत्रज्ञान आणि कौशल्य विकास यांना महत्त्व दिले आहे.सर्वांना उपलब्धता, समानता, गुणवत्ता, परवडणारीता आणि उत्तरदायित्व ही या धोरणाची प्रमुख पाच स्तंभ आहेत.

हे धोरण केवळ कागदावरचे नाही, तर शिक्षण प्रक्रियेत मूलभूत बदल घडवणारे आहे. विद्यार्थ्यांना परीक्षा-केंद्रित नव्हे तर कौशल्य-केंद्रित आणि अनुभव-आधारित शिक्षण मिळावे, हा यामागचा मुख्य हेतू आहे.

धोरण अमलात आल्यापासून काही क्षेत्रांत स्पष्ट सुधारणा दिसत आहेत. बालवयातील पाया मजबूत करण्यासाठी NIPUN Bharat सारखी मोहीम राबवली गेली. यामुळे लहान मुलांमध्ये वाचन, लेखन आणि गणितातील मूलभूत कौशल्ये विकसित होण्यास मदत झाली. अनेक शाळांत अनुभव-आधारित शिकवणी (Experiential Learning) वाढली आहे. मुलं केवळ पुस्तकी ज्ञान घेण्याऐवजी प्रकल्प, खेळ आणि क्रियांद्वारे शिकत आहेत.

बहुविषयक शिक्षणाची सुरुवात झाली आहे. अनेक महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना विविध विषयांचे संयोजन निवडता येत आहे. यामुळे विद्यार्थ्यांची रुची आणि क्षमता लक्षात घेऊन त्यांचा विकास होत आहे. व्यावसायिक शिक्षण (Vocational Education) शाळा स्तरावर सुरू झाले आहे. इयत्ता सहावीपासून मुलांना कौशल्य प्रशिक्षण मिळत आहे, ज्यामुळे शाळा सोडल्यानंतरही रोजगार मिळणे सोपे होत आहे.

शिक्षक विकास कार्यक्रमांमुळे अनेक शिक्षक नवीन पद्धतींशी परिचित झाले आहेत. सतत प्रशिक्षण, कार्यशाळा आणि डिजिटल साधनांचा वापर वाढला आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म्स (जसे DIKSHA, SWAYAM) चा विस्तार झाला, ज्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण उपलब्ध होत आहे.

महाराष्ट्रात धोरणाची अंमलबजावणी वेगाने होत आहे. नवीन अभ्यासक्रम इयत्ता पहिलीपासून सुरू झाला आहे आणि तो हळूहळू इतर वर्गांमध्ये विस्तारित होत आहे. उच्च शिक्षणात चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाची सुरुवात झाली आहे. शिक्षकांसाठी अनिवार्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जात आहेत. PM SHRI शाळा, राज्य स्तरावरील अभ्यासक्रम फ्रेमवर्क यांसारख्या उपक्रमांमुळे महाराष्ट्र इतर राज्यांच्या तुलनेत चांगली प्रगती करत आहे.

समावेशकतेच्या दृष्टीनेही प्रगती आहे. गरीब, ग्रामीण, दिव्यांग आणि दुर्लक्षित घटकांसाठी विशेष तरतुदी केल्या गेल्या आहेत. मातृभाषेत शिक्षणामुळे अनेक विद्यार्थ्यांना अभ्यास समजणे सोपे झाले आहे. एकूणच, धोरणाने शिक्षणाच्या दिशेला योग्य वळण

दिले आहे आणि काही ठिकाणी दृश्य बदल घडवले आहेत.

धोरणाची कल्पना उत्कृष्ट असली तरी अंमलबजावणीत अनेक अडचणी येत आहेत. मुख्य समस्या म्हणजे संसाधनांची कमतरता. पायाभूत सुविधा, शिक्षक नियुक्ती आणि प्रशिक्षण यासाठी अपुरा निधी उपलब्ध होत आहे. यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील फरक अधिक स्पष्ट दिसतो.

शिक्षक तयारी ही मोठी आव्हान आहे. बहुतेक शिक्षक नवीन पद्धती – अनुभव-आधारित शिकवणी, सतत मूल्यमापन – यासाठी पूर्ण तयार नाहीत. ग्रामीण भागात प्रशिक्षणाची सोय मर्यादित आहे. डिजिटल साधनांचा वापर वाढला तरी इंटरनेट, डिव्हाइसेस आणि स्मार्ट क्लासरूम्सची कमतरता ग्रामीण भागात जाणवते. यामुळे डिजिटल विभाजन (Digital Divide) निर्माण झाले आहे.

राज्य आणि केंद्र सरकार यांच्यात समन्वय कमी पडतो. काही राज्यांत भाषा धोरणावरून विरोध व्यक्त केला जातो. महाराष्ट्रात मराठीला प्राधान्य दिले जात असले तरी इतर भाषांचा समावेश कसा करावा याबाबत चर्चा सुरू आहे.

मूल्यमापन पद्धती अद्याप पूर्ण विकसित झालेली नाही. बोर्ड परीक्षांचा तणाव पूर्णपणे कमी झालेला नाही. उच्च शिक्षणात Multiple Entry-Exit सारखी व्यवस्था काही संस्थांतच प्रभावीपणे लागू झाली आहे. खासगी संस्था जलद बदल घडवतात, तर सरकारी शाळा आणि महाविद्यालये मागे पडतात.

ग्रामीण-शहरी आणि सार्वजनिक-खासगी असमानता ही मोठी समस्या आहे. अनेक विद्यार्थी शाळा सोडण्याचे प्रमाण अद्याप जास्त आहे. धोरणाची अंमलबजावणी असमान असल्याने अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. हे अपयश धोरणाच्या कल्पनेत नव्हे तर अमलात येण्याच्या पद्धतीत आहे.

महाराष्ट्राने NEP 2020 ची अंमलबजावणी सक्रियपणे केली आहे. नवीन अभ्यासक्रम हळूहळू लागू होत आहे. शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम नियमित चालू आहेत. उच्च शिक्षणात नवीन अभ्यासक्रम आणि लवचिक पद्धती आणल्या जात आहेत. तरीही, ग्रामीण भागात पायाभूत सुविधा आणि शिक्षकांच्या तयारीत अजून बरीच कामे बाकी आहेत. राज्य सरकारने टास्क फोर्स नेमून आणि अभ्यासक्रम फ्रेमवर्क तयार करून प्रगती केली आहे, पण पूर्ण यशासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील.

NEP 2020 च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पुढील दिशा स्पष्ट करणे गरजेचे आहे:शिक्षणावर अपुरा खर्च टाळून पायाभूत सुविधा मजबूत करणे आवश्यक आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी समन्वयाने काम करावे.शिक्षकांसाठी नियमित, व्यावहारिक आणि सतत प्रशिक्षण देणे. नवीन पद्धती शिकवण्यासाठी मार्गदर्शन आणि साधने उपलब्ध करणे. ग्रामीण भागात इंटरनेट आणि डिव्हाइसेस उपलब्ध करणे. डिजिटल शिक्षणाला पूरक बनवणे.सर्व राज्यांत एकसमान प्रगतीसाठी स्पष्ट रोडमॅप तयार करणे. स्थानिक गरजेनुसार लवचिकता ठेवणे. Competency-based मूल्यमापन पूर्णपणे लागू करणे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारे अहवाल तयार करणे.

खासगी क्षेत्राचे कौशल्य आणि सरकारी क्षेत्राची व्यापकता यांचा उपयोग करणे.१०-१५ वर्षांच्या दृष्टीकोनातून प्रगतीचे पुनरावलोकन करणे आणि आवश्यक बदल करणे.

भविष्यात NEP 2020 हे केवळ धोरण न राहता प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारे साधन बनले पाहिजे. यासाठी सर्व स्तरांवर – सरकार, शिक्षक, पालक आणि समाज – सहकार्य आवश्यक आहे.

NEP 2020 हे भारतीय शिक्षणाच्या भविष्याचे स्वप्न आहे. त्यातील यश दर्शवते की दिशा बरोबर आहे, तर अपयश सूचित करतात की अमलात अधिक मेहनत आणि समन्वय गरजेचा आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात हे धोरण यशस्वी झाले तर पुढची पिढी अधिक कौशल्यपूर्ण, सर्जनशील आणि आत्मविश्वासपूर्ण होईल.

शिक्षण हे केवळ ज्ञान देणे नव्हे तर व्यक्तिमत्त्व घडवणे आहे. NEP 2020 ही त्या दिशेने एक महत्त्वाची पावले आहे. आता या धोरणाला प्रत्यक्ष यश मिळवून देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. भविष्यातील भारत ज्ञान-आधारित आणि समृद्ध समाज बनवण्यासाठी हे धोरण योग्य दिशेने नेणे गरजेचे आहे.

डॉ. फकिरा भगवान राजगुरु
देऊळगाव माळी
मो. 9130131628

विज्ञान- तंत्रज्ञानाचे युग

आजचे युग विज्ञान- तंत्रज्ञानाचे युग मानले जाते. काळानुसार शिक्षण क्षेत्रातही मोठे बदल होत आहेत. पूर्वी फळा, खडू आणि पाठांतर यांवर आधारित असलेली शिक्षणपद्धती आता डिजिटल, कौशल्याधारित आणि विद्यार्थी-केंद्रित झाली आहे. ऑनलाईन वर्ग, स्मार्ट बोर्ड, प्रकल्पाधारित अध्ययन, कृतीतून शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या गोष्टींनी शिक्षणाचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. या नवीन शिक्षण पद्धतीचे अनेक फायदे असले, तरी काही तोटेही जाणवतात.

नवीन शिक्षण पद्धतीचा सर्वात मोठा फायदा म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला मिळणारे प्रोत्साहन. पूर्वी फक्त गुण आणि पाठांतराला महत्त्व दिले जात होते; परंतु आता विद्यार्थ्यांची विचारशक्ती, सर्जनशीलता, संवादकौशल्य, समस्या सोडवण्याची क्षमता यांनाही महत्त्व दिले जाते. त्यामुळे विद्यार्थी केवळ परीक्षार्थी न राहता जीवनार्थी बनू लागतो.

डिजिटल साधनांमुळे शिक्षण अधिक रंजक आणि सोपे झाले आहे. व्हिडिओ, चित्रफिती, प्रयोग, प्रेझेंटेशन यांच्या मदतीने कठीण विषय सहज समजतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही ऑनलाईन माध्यमातून मोठ्या शिक्षकांचे मार्गदर्शन मिळू लागले आहे. तसेच विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार विषय निवडण्याचे स्वातंत्र्यही वाढले आहे.

मात्र, या शिक्षणपद्धतीचे काही तोटेही आहेत. तंत्रज्ञानावर वाढते अवलंबित्व विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इंटरनेटच्या आहारी नेत आहे. अभ्यासापेक्षा सोशल मीडियाकडे अधिक आकर्षण वाढत आहे. ऑनलाईन शिक्षणामुळे प्रत्यक्ष शिक्षक- विद्यार्थी संवाद कमी झाला आहे. त्यामुळे संस्कार, शिस्त आणि भावनिक नाते यांवर परिणाम होताना दिसतो.

ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी डिजिटल साधने उपलब्ध नसणे हीदेखील मोठी समस्या आहे. सर्व विद्यार्थ्यांकडे मोबाईल, संगणक किंवा चांगले इंटरनेट असेलच असे नाही. त्यामुळे शिक्षणातील समानता धोक्यात येऊ शकते. याशिवाय, काही विद्यार्थी इंटरनेटवर उपलब्ध तयार माहितीवर अवलंबून राहतात, त्यामुळे स्वअभ्यासाची सवय कमी होत आहे.

एकंदरीत, नवीन शिक्षण पद्धती ही काळाची गरज आहे. तिच्या मदतीने शिक्षण अधिक आधुनिक, उपयुक्त आणि प्रभावी बनत आहे. मात्र, तंत्रज्ञानाचा योग्य वापर, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांमधील नैतिक मूल्ये टिकवून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. जुन्या मूल्यांची शिदोरी आणि नव्या तंत्रज्ञानाची जोड यांचा समतोल साधला, तरच शिक्षण खऱ्या अर्थाने उज्ज्वल भविष्य घडवू शकेल.

सौ.प्रज्ञा घोडके
चिंचवड, पुणे
मो.9604557689

नवीन शैक्षणिक धोरणाची पायमल्ली

आज शिक्षणाचे सार्वत्रीकीकरण करणे सुरु केले जात आहे.प्रत्येक मुल शिकले पाहिजे यासाठी शिक्षणाचे धोरण राबविले जात आहे.त्यासाठी केंद्रच नाही तर राज्यसरकारही प्रयत्न करीत आहे.सरकारने त्यासाठी आपले पाऊल उचलले आहे.सरकारला वाटत आहे की आपण जे पाऊल उचलले, ते कायद्यानुसार बरोबर आहे.

भारतीय जनता पार्टी सन २०१४ ला सत्तेवर बसल्यानंतर २०१६ मध्ये त्यांनी जुन्या शिक्षणाला बाजुला सारुन नवीन आराखडा तयार केला.त्यानुसार मोदी साहेबांनी एका वेगळ्याच शिक्षणावर भर दिला. ते म्हणजे स्कील डेव्हलपमेंट अर्थात कौशल्य शिक्षण. त्यानुसार विद्यार्थ्यात काही उपजत सुप्त गुण असतात.त्या गुणात वाढ करणे.ह्याच मुद्याला काग्रेस सरकारमध्येही सुरुवात झाली होती.पण ते सगळं कागदावर होतं.पण सत्तेत आलेल्या भाजपानं ते कृतीत उतरवीत डीजीटल शिक्षणावर भर दिला.त्यानुसार देशातील भाजप समर्थीत ज्या संस्था होत्या.त्यांची मदत घेतली.त्या संस्था म्हणजे मद्रास आय आय टी,हैद्राबाद विद्यापीठ आणि जे एन यु विद्यार्थी संघटना.अभाविपलाही मागे टाकुन ह्या हालचाली.त्यानुसार नवीन शैक्षणिक धोरणावर विचारविमर्श करण्यात आला.पण यातुन साध्य तर काहीच झालं नाही.उलट राष्ट्रवाद,देशभक्ती,मुल्ये ह्या गोष्टी कालबाह्य व्हायला लागल्या.तसेच अशैक्षणिक वादच जास्त वाढले.

शिक्षणाला हवं तर राजकारणापासुन दूरच ठेवायला हवं.हस्तक्षेप नकोच.कारण शिक्षण वेगळं राजकारण वेगळं.राजकारणात न शिकलेल्या व्यक्तीलाही प्रतिनिधित्व मिळतं.शिक्षणाचं तसं नाही.शिक्षणाचे धोरण ठरवितांना खुप शिकणा-या विचारवंतांची गरज आहे.राजकारण्यांची गरज नाही.मात्र ते लागु करतांना सरकारने जरुर विचार करावा.तिथे मात्र सरकारची मदत घेता येईल.पण महत्वाचं म्हणजे नवीन शैक्षणिक धोरणात सरकारने ढवळाढवळ केल्यामुळे संगळा शिक्षणात गोंधळ निर्माण झाला आहे.सरकार दररोज जी आर काढतात.चर्चा घडवुन आणतात.तो जी आर काही कामाचा नसेल तर दुस-या दिवशी रद्द करतात.काय चालले हे!एकदा काढलेला जी आर रद्द करण्याची वेळ यावी यासारखं शिक्षणाचं दुर्भाग्य नाही.

आजही उच्चशिक्षण शिकत असतांना देशातील एकुण विद्यार्थ्यांपैकी फक्त वीस टक्केच मुले उच्च शिक्षण घेतात.त्यातही मुली आणि अनुसूचित जाती जनजातीची संख्या कमी आहे.कोठारी आयोगाने शिक्षणावर सहा टक्के रक्कम खर्च करा.ही शिफारस केली असतांना व तो मसुदा मंजुर झाला असतांनाही प्रत्यक्ष रुपात फक्त ३.६६ टक्के रक्कम तेवढीच खर्च केली जाते.प्रार्थमिक शिक्षण हे सर्वांसाठी मोफत म्हटलं आहे.पण प्रत्यक्षात ते मोफत नाहीच.आजही शिक्षण श्रीमंतांची मक्तेदारी बनलेली आहे.सर्व शाळेत आजही विद्यार्थ्यात भेदभावाचे वातावरण आहे. जातीयवादाला खतपाणी मिळत आहे.ज्यांच्याजवळ जास्त पैसा ती मुले कॉन्व्हेंटमध्ये,ज्यांचेजवळ पैसा नाही ती मुले सरकारी शाळेत.शिवाय हा एस सी,हा एस टी हा भेदाभेद.ही मुलगी हा पुरुष हाही भेदाभेद. अनुसूचित जाती जमातींना शिक्षणाच्या सोयी.तसेच सावित्रीबाई च्या नावाने पाचवीपासुन मुलींना सोयी देणे ह्या गोष्टी भेदभाव निर्माण करीत नाहीत काय?कशाला हवे संस्कार देणा-या अशा शाळेमधुन वरील प्रकारचे शिक्षणाचे प्रयोग.खरं सांगायचे म्हणजे शाळेत तरी विद्यार्थ्यांना अशी स्वापत्नपणाची वागणुक मिळू नये. सर्व विद्यार्थ्यांना अगदी बालवयापासुन समान लेखावे. जेणेकरुन पुढे जावुन या विद्यार्थ्यात भेदभावाची भावना निर्माण होणार नाही.एकीकडे गरीब शिकला पाहिजे असं सरकारच म्हणतं तर दुसरीकडे कॉन्व्हेंटच्या मान्यता सरकारच वाटप करतं.ह्या गोष्टीला काय म्हणावे.ते कळणारं कोडं आहे.

२०१६ च्या शैक्षणिक धोरणानुसार संगणकीय शिक्षणावर भर दिला.प्रत्येक शाळेत संगणक असावा हे

ठरवलं गेलं.त्यानुसार विद्यार्थांना प्रगत ज्ञान तर येईल. व्यतिरीक्त विद्यार्थ्यात असलेली सुप्त शक्ती वाढुन या विद्यार्थातुन तंत्रज्ञ घडतील.हा मोदी साहेबांचा उद्देश. उद्देश रास्त.मग संगणक कोणी पुरवायचे?हा प्रश्न जनमाणसात निर्माण झाला.कारण शाळा ह्या संगणक घेण्यासाठी पुरेशा सबळ नाहीत.मग यातुन मार्ग काढला गेला की संगणक लोकसहभागातुन मिळवायचा.तसेच हे कार्य शिक्षकांनी करायचं.

उच्च शिक्षण घेतलेला शिक्षक.त्याचेवर शाळा सुधारण्यासाठी नव्हे तर डीजीटल बनविण्यासाठी अशी भीक मागायची पाळी.....कोणी आणली तर सरकारनं.अशा प्रकारे शिक्षणाचीच पायमल्ली होत आहे.स्वाभिमानी असलेला माझा शिक्षकबंधु याच गोष्टीने निदान नोकरी टिकविण्यासाठी लाचार बनलेला आहे.

देशाचं भवितव्य आमचा शिक्षकच घडवतो. विद्यार्थ्यांना कसे घडवायचे याचा पुर्णपणे विचार करतो.तो आपल्या विद्यार्थ्यांना आपल्या मुलांपेक्षाही जास्त जपतो.त्यांच्या भावना जपतो.नव्हे तर संस्कार करतो.पण सरकार त्यांची कदर करीत नाही.अजुनही प्राथमिक शिक्षणाच्या निधीत वाढ नाही.२० टक्केपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करा असे आदेश निघत आहेत.गुन्हे सरकार करीत आहे.शिक्षा मात्र आमच्या शिक्षकांना भोगाव्या लागत आहेत. काही खाजगी शाळांची तर चांदीच झाली आहे.त्यांनी लोकसहभागातुन वर्गणी गोळा करा या मुद्यावर जास्त जोर दिला आहे.त्यासाठी ते शिक्षकांना मानसिक त्रास देतात.जी रक्कम पालकांकडून किंवा संस्थेकडून मिळते.त्यात पारदर्शकताही नाही.हिशोब कोणी विचारत नाही.शिवाय काही शाळा तर पावत्या देत नाही.काही शाळा ह्या पावत्या देतात.पण पुर्ण रक्कम लिहीत नाहीत.कमी बिलाच्या देतात.मात्र अजुनही सुज्ञ न झालेला पालक आपल्या मुलांचं नुकसान होईल म्हणुन गप्प बसत आहे.हिशोब न मागता..... मग काही पैसा शाळेला लावायचा आणि काही पैसा घशात घालायचा.असा दैनिक उपक्रम.अशी अवस्था सरकारी शाळेतही आहे.शिक्षकांसारखा इमानदार व्यक्तीही सरकारी शाळेत शाळा सहायता निधीच्या नावावर शिक्षक पैसे गोळा करुन परस्पर वाचलेला पैसा हा आपपापसात वाटुन घेतात.हे प्रकार भरपुर शाळेत आजही सुरु आहेत.

सन २००० मध्ये सरकारने शैक्षणिक धोरण राबवुन पहिलीपासुन इंग्रजी आणलेला असतांनाही विद्यार्थ्यांनी कॉन्व्हेंटकडे आपला मोर्चा वळवला.सरकारी शाळा ओस पडणे सुरु झाले आहे.तर कॉन्व्हेटमध्ये विद्यार्थ्यांना बसायलाही जागा सापडत नाही.नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्या घडू नये म्हणून शिक्षणाचीच हत्या केली आहे.अर्थात विद्यार्थ्यांची परिक्षाच घेणे बंद केले.काहीही झाले तरी चालेल. पण आम्ही नापास करणार नाही.अन् विद्यार्थी अप्रगत राहिल्यास त्याची दोन महिण्याने चाचणी घेवुन त्याला पदोन्नती देवु.तसे देणे सुरु आहे.मग ती दहावी बारावी का असेना.पण जो विद्यार्थी आतापर्यंत नाही शिकला. तो विद्यार्थी खरंच दोन महिण्यात शिकुन परीक्षा देवुन प्रगत होवु शकेल काय?याचा विचार कोणीही करीत नाही.

राधाकृष्णन, मुदलियार,कोठारी आयोग आले. देशाला विकासाच्या टप्प्यावर नेण्यासाठी त्यांनी आपआपल्या शिफारशी केल्या.त्यानुसार धोरणंही ठरले.पुर्वी सुरु असलेल्या राधाकृष्णन,मुदलियार आयोगाच्या धोरणात कोठारीच्या धोरणाने बदल करीत कार्यानुभव हा विषय स्वतंत्र न शिकवता तो इतर विषयांतर्गत शिकवावा हे १९६४ ला ठरलं.तर १९८६ ला सर्व ६ते१४ वयोगटातील सर्व मुले शिकली पाहिजे.त्यांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे.तसेच प्रौढ शिक्षणावरही भर देण्यात आला.त्यानंतर १९९५ ला क्षमताधिष्ठीत शिक्षण,२००० मधील इंग्रजी धोरण,२००५ मधील नापास न करण्याचं धोरण.२००९ मधील पदोन्नती देण्याचं धोरण नव्हे तर २०१६ मधील कौशल्य अर्थात डीजीटल शिक्षणाचं धोरण.ही सगळी शिक्षणावरची धोरणं आली.पण त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत.उलट वाढ झाली.विद्यार्थी नापास होत असल्याने जी नापासपणाचे दुःख पचवायची ताकद होती.त्या ताकदीने कठीण प्रसंगाचाही त्यांना सामना करता यायचा.पण आता ती ताकद उरली नाही. हलक्याश्या हळव्या प्रसंगाचेही हे विद्यार्थी दुःख सहन करु शकत नाहीत आत्महत्या करतात.याला नवीन शैक्षणिक धोरणाचा परिपाक समजायचा की परिणाम समजायचा ते कळत नाही.शिक्षणाच्या कक्षा रुंदावत असतांना सरकारला नेमके कोणते निर्णय घ्यावे ते सुचत नाही.आम्हाला आम्ही नेमकं कसं वागावं ते कळत नाही.म्हणुन आमचं शिक्षणाचं धोरण नेहमी फसत आहे.यावर सखोल विचार करण्याची गरज आज निर्माण झाली आहे.यात दुमत नाही.

- अंकुश शिंगाडे
१२२ बी गजानन नगर भरतवाडा कळमना मार्केट रोड नागपुर
मो. ९३७३३५९४५०

एक वैचारिक आणि शैक्षणिक क्रांती

शिक्षण ही मानवी जीवनाच्या प्रगतीची पायाभरणी असते. काळानुसार समाजात आणि तंत्रज्ञानात बदल होत गेले, तशी शिक्षण पद्धतीत बदल करणे ही काळाची गरज बनली होती. भारताने स्वीकारलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे केवळ जुन्या नियमावलीत केलेला बदल नसून, ती एक मोठी शैक्षणिक क्रांती आहे. या पद्धतीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्याला केवळ पदवीधर बनवणे हा नसून, त्याला एक जबाबदार, कौशल्यपूर्ण आणि सक्षम नागरिक बनवणे हा आहे. पारंपारिक शिक्षण पद्धतीत अनेकदा पाठांतरावर आणि गुणांच्या शर्यतीवर अधिक भर दिला जात होता, परंतु नवीन पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. जुन्या '१०+२' या साच्याला छेद देऊन '५+३+३+४' हा नवा शैक्षणिक आराखडा स्वीकारण्यात आला आहे, ज्यामुळे बालकाच्या सुरुवातीच्या विकासापासून ते उच्च शिक्षणापर्यंत एक सुसूत्रता निर्माण झाली आहे.

अत्यंत प्रगत आणि लवचिक अशी नवीन शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये आहेत. सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे शिक्षणाचे माध्यम. प्राथमिक स्तरावर शक्यतो पाचवीपर्यंत शिक्षण मातृभाषेतून देण्यावर भर दिला गेला आहे, कारण यामुळे मुलांच्या मूलभूत संकल्पना अधिक स्पष्ट होतात. तसेच, माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना विषय निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे. आता कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांमधील भिंती पाडण्यात आल्या आहेत. एखादा विद्यार्थी गणितासोबत संगीत किंवा भौतिकशास्त्रासोबत अर्थशास्त्र शिकू शकतो. या बहुविद्याशाखीय दृष्टिकोनामुळे विद्यार्थ्यांच्या आवडीला वाव मिळतो आणि त्यांच्यातील सर्जनशीलता वाढीस लागते. सहावीपासूनच व्यावसायिक शिक्षणाची आणि कोडिंगची ओळख करून दिली जाणार आहे, जेणेकरून शालेय शिक्षण पूर्ण करताना विद्यार्थ्यांच्या हातात एखादे तरी कौशल्य असेल.

जशा प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतात, तशाच या पद्धतीचे काही फायदे आणि आव्हानेही आहेत. फायद्यांचा विचार केला तर, ही पद्धत घोकंपट्टीच्या संस्कृतीला पूर्णपणे आळा घालते. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे केवळ वर्षाच्या शेवटी होणाऱ्या एका परीक्षेवर अवलंबून न राहता, त्यांच्या वर्षभरातील कामगिरीवर आणि कौशल्यांवर आधारित आहे. यामुळे परीक्षेचे ओझे आणि मानसिक ताण कमी होण्यास मदत होईल.

कौशल्यावर आधारित शिक्षणामुळे भविष्यात रोजगाराच्या संधी वाढतील आणि भारतीय विद्यार्थी जागतिक स्तरावर स्पर्धेत टिकू शकतील. मात्र, या पद्धतीची अंमलबजावणी करणे हे मोठे आव्हान आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये अद्यापही डिजिटल सुविधांचा अभाव आहे. नवीन अभ्यासक्रम शिकवण्यासाठी प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता आहे तसेच, उच्च स्तरावरील बदलांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी आणि पायाभूत सोयीसुविधांची गरज आहे, जी पूर्ण करणे ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे.

शिक्षकाची भूमिका या संपूर्ण शैक्षणिक प्रवासात सर्वात महत्त्वाची ठरते. नवीन पद्धतीत शिक्षक हा केवळ पुस्तकातील मजकूर वाचून दाखवणारा घटक न राहता, तो एक मार्गदर्शक आणि सुलभक बनणार आहे. शिक्षकांना आता स्वतःला तंत्रज्ञानाशी जोडून घ्यावे लागेल आणि सतत अपडेट राहावे लागेल. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती आणि आवड वेगळी असते, हे ओळखून शिक्षकांना आपले अध्यापन कौशल्य बदलावे लागेल. मुलांमध्ये प्रश्न विचारण्याची प्रवृत्ती वाढवणे आणि त्यांच्यातील तर्कसंगत विचारांना चालना देणे ही शिक्षकांची मुख्य जबाबदारी असेल.

विद्यार्थ्यांची भूमिका देखील आता अधिक सक्रिय होणार आहे. विद्यार्थ्यांनी केवळ वर्गात शांत बसून ऐकण्याऐवजी, विविध प्रकल्पांमध्ये सहभागी होणे, प्रश्न विचारणे आणि स्वतःहून नवनवीन गोष्टी शिकण्याची तयारी ठेवणे अपेक्षित आहे. ही पद्धत विद्यार्थ्यांना 'काय शिकावे' यापेक्षा 'कसे शिकावे' हे शिकवणार आहे. त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारे विचारांना सकारात्मक दिशेला नेणारे सुसंस्कृतपणा आणणारे आणि विशेष म्हणजे एक जबाबदार नागरिक तयार होण्यासाठी आवश्यक असे उपक्रम प्रत्येक शाळेतून राबविले जाणे आवश्यक आहे जेणे करून बदलेल्या अभ्यासक्रमाची उहिष्टे साध्य होऊ शकतील

पालक हा या शिक्षण पद्धतीचा तिसरा महत्त्वाचा स्तंभ आहे. आजवर पालक केवळ आपल्या मुलांच्या गुणांच्या टक्केवारीवर लक्ष केंद्रित करत असत. मात्र, आता पालकांना आपली मानसिकता बदलावी लागेल. मुलांच्या आवडीच्या विषयांना त्यांनी महत्त्व दिले पाहिजे. केवळ इंजिनिअर किंवा डॉक्टर बनण्याच्या पारंपरिक स्वप्नांच्या पलीकडे जाऊन, मुलांमध्ये असलेली कला

आणि कौशल्ये ओळखून त्यांना प्रोत्साहन देणे ही पालकांची भूमिका असेल. शाळा आणि घर यांच्यातील संवाद वाढणे गरजेचे आहे तरच नवीन धोरणाचे उद्दिष्ट साध्य होईल.

शेवटी, नवीन शिक्षण पद्धती ही भारताला पुन्हा एकदा 'विश्वगुरू' बनवण्याच्या दिशेने टाकलेले एक आश्वासक पाऊल आहे. जर शिक्षक, विद्यार्थी आणि पालक या तिघांनीही सकारात्मक दृष्टिकोन ठेवून या बदलांचा स्वीकार केला, तर येणारी पिढी ही केवळ साक्षर नसून खऱ्या अर्थाने सुशिक्षित आणि स्वावलंबी असेल. या पद्धतीमुळे भारतीय शिक्षण व्यवस्था अधिक लवचिक, समावेशक आणि जागतिक दर्जाची होईल यात शंका नाही.

कोठेकर योगिता संजय
उपक्रमशील शिक्षिका लेखिका कवयित्री
शिवभूमी विद्यालय निगडी .
9890147859

साध्य

नव्या जुन्याचा घालून संगम
शिक्षण व्हावे स्वयंपूर्ण

घडावी त्यानी उत्तम लेकरे
सुंदर आयुष्य होवो त्यांचे सारे

चांगली माणसे चांगली मने ह्याची व्हावी मुख्य मशागत
असो कोणतीही पद्धती साध्य हे असावे अवगत

सर्वांगीण विकास होऊन त्यांनी न्यावे जगाला पुढे
मानवतेला साऱ्या उपयोग होऊन नवे जग त्यांच्या मुळे घडे

करताना उत्तम प्रगती मनही रहावे निरोगी आनंदी
सुखी जीवनाचा पाया उभारून त्यांना जगता येवो स्वच्छंदी

नव्या जुन्याचा नको काथ्याकूट
साध्यासाठी व्हावी एकजूट

एकत्र मिळून उत्तम समाज घडवू
जगाला नव्या उंचीवर नेऊ

सौ गंधाली अरगडे
पुणे
मो. 8806438873

शैक्षणिक धोरण

शिक्षण अत्यंत महत्त्वाचे
त्याने समाज घडतो
पाया असेल भक्कम
तरच कळस चढतो

नवीन शैक्षणिक धोरण
जेव्हा जाहीर झाले
माध्यमांतून बरेच काही
आमच्या कानावर पडले

घोकंपट्टी नाही चालणार
आता आकलनावर भर
शिक्षणाची समान संधी
नसेल कुठला अडसर

विषय निवडीचे स्वातंत्र्य
खर्च साधनांचा होईल कमी
कला - क्रीडा सर्वांगीण विकास
रोजगाराची असेल हमी

अंमलबजावणी कशी होणार
मनात प्रश्न येतात अनेक
शिक्षणाचा उंचावेल का दर्जा
साध्य होईल का हेतू नेक

संभ्रम सगळा व्हावा दूर
पाऊल पडावे योग्य दिशेने
व्हावा विकसित भारत
पाहत आहेत सर्व आशेने

सौ. दिप्ती गोगटे
ठाणे
मो.9967327478

गुरुकिल्ली

नवीन शिक्षणपद्धती
फायद्याची आहे
शिक्षणाचा अधिकार
भाषा कायद्याची आहे

सर्वांनी शिक्षण घ्यावे
भूमिका महत्वाची आहे
पण परीक्षा न घेणे
पद्धत चुकीची आहे

प्रॅक्टिकलचे वीस गुण
योजना फुकाची आहे
विनाकारण गुण वाढविणे
गोष्ट दुःखाची आहे

तसेच चुकीची पद्धत
टॉप फाईव्हची आहे
टक्केवारी वाढते
विनाकारणची आहे

पहिल्या वर्गापासून
हिंदी सक्ती बिनाकामाची आहे
मराठी,इंग्रजी भाषा
सक्ती कामाची आहे

दप्तराचे ओझे,ताण,विषय
कमी करणे गरजेची आहे
मुलांना मर्यादा
बौद्धिक क्षमतेची आहे

ऑनलाईन शिक्षण
परीक्षा बुद्धीची आहे
आधुनिक तंत्रज्ञान
गुरुकिल्ली ज्ञानाची आहे

वरेंद्र अ. वाकोडे
जळगाव जामोद
मो. ९४२१४६५८५४

नवीन शिक्षण पद्धती : फायदे की तोटे?

परीक्षा संपल्या आणि उन्हाळी सुट्ट्या लागल्या. गावी जाण्याची तयारी सुरू झाली. मोठा मुलगा सी.एस.चे शिक्षण घेत आहे. त्यानेही त्याची तयारी सुरू केली, कपड्यांपेक्षा आधी लॅपटॉप, मोबाईल, चार्जर, पॉवर बँक आणि इतर डिजिटल साधनांची बॅग भरली. ते पाहून आम्ही हसत होतो.

गावी गेल्यावर तो जेमतेम एक दिवस घरात थांबला; बाकी वेळ बाहेरच असायचा. कारण एकच, नेटवर्क! ते पाहून मनात प्रश्न पडला, "नवीन शिक्षण पद्धती खरंच फायद्याची आहे की तोट्याची?"

त्याच्याशी याबद्दल संवाद साधायचे ठरवले. संध्याकाळी परेश घरी आला. जेवण झाल्यावर आम्ही शतपावलीसाठी बाहेर पडलो आणि मी विषयाला हात घातला.

"काय रे, कसा चाललाय अभ्यास? काही नवीन अनुभव?" मी विचारले.

तो म्हणाला,

"आई, सध्या खूप चिडचिड होत आहे. मुंबईला असतो तर व्यवस्थित अभ्यास करता आला असता."

मी आश्चर्याने विचारले, "का बरं?"

तो म्हणाला,

आता बघ, लाईट नाही, नेटवर्क नाही कसा अभ्यास होणार?

"नवीन शिक्षण पद्धतीचे अनेक फायदे आहेत. विद्यार्थ्यांच्या आवडी, क्षमता आणि गतीनुसार शिकवले जाते, त्यामुळे अभ्यास समजायला सोपा जातो. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे स्मार्ट क्लास, ऑनलाइन शिक्षण, व्हिडिओ, प्रेझेंटेशन यांमुळे शिकणे रंजक होते. माहितीही पटकन मिळते.

फक्त पाठांतरावर भर न देता प्रत्यक्ष कृती, प्रकल्प आणि प्रयोगांवर भर दिला जातो. त्यामुळे आमच्यात विविध कौशल्ये विकसित होतात. प्रश्न विचारण्याची आणि नवीन कल्पना मांडण्याची संधी मिळते. संवादकौशल्य, तंत्रज्ञानाचा वापर आणि टीमवर्क यांसारख्या गोष्टी शिकायला मिळतात. त्यामुळे स्पर्धात्मक जगासाठी आम्ही तयार होतो."

मी मध्येच त्याला थांबवत विचारले,

"मग तू तर या नवीन शिक्षण पद्धतीत शिकतो आहेस, तरी चिडचिड का होते?"

त्यावर तो म्हणाला,

"आई, गावी आल्यापासून या शिक्षण पद्धतीत शिकताना खूप अडथळे येत आहेत. माझ्या मित्रांशी चर्चा केली तेव्हा हे ही लक्षात आले की या पद्धतीचे काही तोटेही आहेत.

ही शिक्षण पद्धती मोबाईल आणि इंटरनेटवर खूप अवलंबून आहे. पण आपल्या गावात नेटवर्क नीट नाही, रेंज नाही आणि लोडशेडिंगही असते. त्यामुळे रोज घरापासून दूर नेटवर्क मिळेल अशा ठिकाणी जावे लागते. गावातील अनेक शिक्षकांना डिजिटल साधनांचे पुरेसे प्रशिक्षण नसल्याने सर्व माहिती विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाही. तसेच शहर असो वा गाव, मुलांमधील शिस्त आणि हस्ताक्षर या गोष्टींकडे दुर्लक्ष होत आहे.

डिजिटल साधने, इंटरनेट आणि इतर उपकरणांसाठी मोठा खर्च करावा लागतो आणि तो सर्वांनाच परवडणारा नसतो. शहरांमध्ये या पद्धतीचे फायदे अधिक दिसतात; पण गावांकडे अजूनही काही प्रमाणात दुर्लक्ष होत आहे.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे संस्कार आणि नैतिक मूल्ये ऑनलाइन शिकवता येत नाहीत. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील प्रत्यक्ष संवाद कमी झाला आहे. पूर्वी शिक्षक विद्यार्थ्यांच्या स्वभावानुसार आणि क्षमतेनुसार मार्गदर्शन करत असत; ते आता कमी होत चालले आहे."

त्याचे बोलणे ऐकून मी म्हणाले,

"तू अगदी बरोबर बोलतो आहेस. तंत्रज्ञान माहिती देऊ शकते, पण भावना समजून घेण्यासाठी माणूसच हवा. नैतिक मूल्ये आणि संस्कार या केवळ वाचून आत्मसात होणाऱ्या गोष्टी नाहीत.

डिजिटल साधनांचा वापर किती आणि कसा करावा याचे योग्य ज्ञान नसल्यास विद्यार्थी भरकटण्याची शक्यता वाढते. आज माहिती एका क्लिकवर उपलब्ध आहे; ज्ञान मिळते, पण त्याची किंमत कमी होत चालली आहे. तरीही प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. नवीन शिक्षण पद्धतीचे फायदे स्वीकारताना तिच्या मर्यादाही लक्षात घ्यायला हव्यात. आधुनिकता आणि संस्कार यांचा समतोल राखला, तरच शिक्षण खऱ्या अर्थाने परिपूर्ण होईल."

सौ. सुचिता बागडे-खाडे
कवयित्री/लेखिका/व्याख्याती
मो. ९५९४१६८९५६

एक विचार

नुकतेच दहावी-बारावीचे वेगवेगळे बोर्ड्स जसे की cbse, hsc icse याचे निकाल जाहीर करण्यात आले सगळ्याच निकालांची सरासरी ९०% हूनही जास्त असणे ही अत्यंत समाधानाची बाब आहे. शिवाय उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये अनेकांना शंभर टक्के गुण पडल्याचे वाचूनही खूप कौतुक आणि नवलाईचे वाटले.

एकीकडे हे असे चित्र असताना त्याच वेळी पेपरफुटी सारखी हीन घटनाही जनतेला अनुभवावी लागली. त्या संदर्भात शासनाने पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय घेतल्यामुळे जवळजवळ २२ लाख विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले. त्यात प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची होत असलेली घुसमट आणि गळचेपी पाहून मन अक्षरशः हळहळत आहे. या अनैतिक घटनेमागचे सूत्रधार कोण यांचा तपास होईल त्यांना शिक्षाही होईल पण तेवढ्यावरच या प्रकरणाची सांगता होणे हे कितपत न्याय्य आहे हा प्रश्न मात्र गंभीरपणे अस्तित्वात राहील. यासाठीच आजची शिक्षण पद्धती, विद्यार्थ्यांची मानसिकता त्यांचे शिक्षणानंतरचे भविष्य त्यामुळे निर्माण होणारे कट टू कट स्पर्धात्मक वातावरण याचा सखोल विचार करणे अत्यंत आवश्यक वाटतं.

शैक्षणिक क्षेत्रातला भ्रष्टाचार, अनैतिक व्यवहार, पेपरफुटी सारख्या गंभीर आणि हिणकस घटना आणि या सर्वांच्या केंद्रस्थानी असलेली नवी राष्ट्रीय शिक्षण पद्धती २०२०(एन इ पी) याचा परस्परात्मक आणि घटनात्मक विचार आणि फेर विचारही व्हायला हवा. वास्तविक नवीन शिक्षण पद्धती ही बदलत्या काळानुसार! आवश्यकतेनुसार आखली गेली आहे. त्याची पायाभूत संकल्पना ही नक्कीच सकारात्मक आहे. अधुनिक अध्यापन पद्धतीत पाठांतरावर भर न देता ही शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर आणि जीवन जगत असताना जरूर असणाऱ्या व्यावहारिक कौशल्यांचा पाठपुरावा करते. या तंत्रज्ञानाचा वापर प्रायोगिकतेतून शिक्षण, लवचिकता, बदल, आवडीनिवडी, क्षमता या मुख्य बाबींसाठी केलेला आहे त्यामुळे आजच्या डिजिटल युगात यशस्वी होण्यासाठी ही शिक्षण पद्धती विद्यार्थ्याला प्रोत्साहित करते.

आजच्या विद्यार्थ्यांसाठी शिकणं हे अधिक सोपं आणि आकर्षक बनविण्याचा प्रयत्नही यात दिसून येतो. पूर्वीच्या बेंचेस, खडू, डस्टर, फळा इतकेच नव्हे तर विद्यार्थी ज्या ठिकाणी बसून अध्यापन करत ती जागाही अपुऱ्या सुविधांची, अप्रसन्न अशी असली तरी त्याची दखल घेण्याची कशासाठी जरुरी आहे या विचारातूनही आजची नवी शिक्षण पद्धती बाहेर पडली आहे. अद्ययावत क्लासरूम्स हा सुद्धा एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा नव्या शिक्षण पद्धतीत समाविष्ट केला गेला आहे.

अनेक लर्निंग ॲप्स च्या माध्यमातून आजचा विद्यार्थी कुठूनही ऑनलाइन पद्धतीने शिकू शकतो. पुस्तकी ज्ञानाव्यतिरिक्त विविध उपक्रमाद्वारे, मॉडेल्स आणि फिल्डवर्कच्या प्रत्यक्ष अनुभवातून शिकवले जाते. प्रश्नोत्तरात्मक संवादातून,विविध शैक्षणिक खेळ, कोडी या माध्यमातून शिक्षण मनोरंजक केले जाते.

विषय निवडण्याचे स्वातंत्र्यही या शिक्षण पद्धतीत आहे त्यामुळे पारंपरिक चौकट(कॉमर्स,कला,विज्ञान) मोडून विद्यार्थी आपल्या आवडीनिवडीनुसार पात्रतेनुसार क्षमतेनुसार शिक्षण क्षेत्र निवडू शकतो. कौशल्याधारित

प्रशिक्षणामुळे भविष्यात रोजगाराच्याही संधी वाढल्या आहेत. शिवाय या शिक्षण पद्धतीतला अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्राथमिक शिक्षण (इयत्ता पाचवी पर्यंत) मातृभाषेतून किंवा स्थानिक भाषेतून देण्यावर भर असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मूलभूत संकल्पना, वैचारिक स्पष्टता अधिक भक्कम होऊ शकतात.

या शिक्षण पद्धतीमुळे प्रौढांसाठीच्या शिक्षणातही अद्भुत क्रांती झाली आहे. व्हिडिओ, पॉडकास्ट, संवादात्मक अभ्यास या माध्यमातून प्रौढांनाही डिजिटल जगासाठी तयार केलं जात आहे.गेमिफिकेशन या संकल्पनेमुळे प्रौढांच्याच नव्हे तर एकंदरच सर्वांसाठी हे शिक्षण केवळ मनोरंजकच नव्हे तर प्रगती आणि यश प्रेरणा, व्यस्तता वाढवतात.

नवीन शिक्षण पद्धतीत *सहयोग शिक्षण* हेही एक टीमवर्क आणि सामूहिक, सामाजिक कौशल्यविकास प्रोत्साहित करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. यामुळे एक गतिशील, कृतिशील आणि परस्पर संवादी वातावरण निर्माण होऊन आत्मविश्वास बळावतो.

मात्र प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतातच. नवीन राष्ट्रीय शिक्षण पद्धती (एन.इ.पी)यानुसार अतिशय प्रभावी अशी शैक्षणिक क्रांती झाली असे मानले आणि त्यातून होणाऱ्या लाभांचा, फायद्यांचा विचार केला तरी त्या पद्धती अंतर्गत जी आव्हाने आहेत किंवा त्या दृष्टीने त्यात त्रुटी राहिल्यात, उणीवा दिसतात- याचाही विचार केला जावा असे निश्चितपणे वाटते.

शिक्षण अधिक स्पर्धात्मक झाल्यामुळे आणि कामगिरी आणि गुणप्राप्तीवर भर दिला गेल्यामुळे विद्यार्थ्यांवरचा मानसिक दबाव वाढत आहे. व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकासावर भर दिला असल्यामुळे संस्कृती, मानवता, सामाजिक मूल्ये, लोककला या विषयांकडे दुर्लक्ष होऊन पुढील पिढी अधिक संकुचित, आत्मकेंद्री आणि केवळ यांत्रिक, व्यवहारी बनण्याची शक्यता वाढत आहे. त्यातूनच पुढे हिंसा, गुन्हेगारी, लाचखाऊपणा, पेपरफुटी सारखे नकारात्मक मार्ग सर्रास वापरले जात आहेत.

डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये अत्यंत असमतोल आहे. समाजातील ही प्रचलित दरी अधिकाधिक रुंद होत आहे. डिजिटल उपकरणे, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, आवश्यक संसाधने सर्वत्र समान प्रमाणात उपलब्ध नाहीत. या असंतुलनामुळे आर्थिक दृष्ट्या, भौगोलिक दृष्ट्या ही दुर्बळ असलेले विद्यार्थी उपेक्षित राहू शकतात आणि त्यामुळे शैक्षणिक विषमता रुंदावू शकते. मानकीकरण म्हणजेच *सर्वांसाठी एकच शैक्षणिक पद्धत* अवलंबिल्यामुळे प्रादेशिक आणि सांस्कृतिक विविधतेकडे दुर्लक्ष होऊ शकते.

नवीन शिक्षण पद्धतीमुळे शिक्षकांच्याही भूमिका बदललेल्या आहेत. केवळ माहिती देणे अथवा सिलॅबस प्रमाणे शिकवणे न राहता मेंटॉर, मोटिवेटर, एक सुविधादाता या नव्या भूमिका त्यांना पार पाडाव्या लागत आहेत.

शिक्षकांनी वर्गात केवळ घोकमपट्टीचेच नव्हे तर प्रायोगिकतेचे अनुकूल वातावरण करणे आवश्यक ठरत आहे. डिजिटल साधनांचा त्यांना उपयोग करावा लागतो. प्रत्येक विद्यार्थ्यांची वैयक्तिक क्षमता जाणून मार्गदर्शन करावे लागते. सर्वांकष मूल्यमापनासाठी वर्षभर सातत्याने परीक्षाही घ्याव्या लागतात आणि यासाठी शिक्षकांचेही प्रशिक्षण तितकेच महत्त्वाचे आहे. ते कितपत साध्य होत आहे हा कळीचा मुद्दा आहे. शिवाय या शिक्षण पद्धतीतला चिंताजनक घटक हा आहे की अंमलबजावणीसाठीचे भक्कम धोरणच नाही. आराखडा नाही. संस्था, शिक्षण आणि विद्यार्थी यांच्या मनात प्रचंड संभ्रम, गोंधळ आहे. योजना सुस्पष्ट नसेल तर संभाव्य फायदे निरर्थक आहेत.

नवीन शिक्षण धोरण २०२०(एनईपी) याचा उद्देश शिक्षण व्यवसाय व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवणे हा जरी असला तरी त्यातून मिळणारे फायदे आणि होत असलेले तोटे यांची सखोल चिकित्सा करून, परीक्षण, मूल्यांकन करून सर्वसमावेशकता, सर्वांसाठी सर्वांगीण विकासासाठी समान संधी मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रभावी अंमलबजावणीचा भक्कम अजून आराखडा असायला हवा तरच या शिक्षण पद्धतीतले धक्कादायक खड्डे हळूहळू बुजायला मदत होईल.आणि नवीन शिक्षणपद्धतीला नेमका आकार मिळू शकेल.

– राधिका भंडारकर
मो.9421523669

एक वरदान

अविद्या आहे दु:खाचे मूळ
ज्ञान मिळवणे आहे मूलभूत गरज
ज्ञान प्राप्तीने नष्ट होते अविद्या समूळ
प्रगल्भता येऊन वाढते समज

आजच्या काळात उरले नाही पुस्तकी शिक्षण
पुस्तकी शिक्षणाला मिळाली आहे कौशल्याची जोड
ज्ञान मिळवायला अनेक आहेत साधन
स्वाध्यायाला नाही कशाची तोड

आधुनिक शिक्षणामुळे उघडते प्रगतीचे दार
आर्थिक स्थैर्य आल्याने मिळतात संधी
निर्णय क्षमतेमुळे आत्मविश्वास वाढतो फार
शिक्षण बनवते विद्यार्थ्यांना स्वावलंबी

ई व्यख्यानांमुळे विद्यार्थ्यांचा वाचतो वेळ
इतर देशातील विद्यर्थ्यांचे समजतात विचार
संस्कृती आणि विज्ञान याचा घालता येतो मेळ
इंटरनेटमुळे अभ्यासाचा कमी होतो भार

शिक्षण बनवते अजाण व्यक्तीला सुजाण
जागरूकता वाढून सुधारते जीवनमान
ई शिक्षणा चे महत्त्व जाण
आधुनिक शिक्षण आहे एक वरदान

डॉ रोहित तळवलकर
मो.9821211863

नवी पध्दती

स गुण दोष स्विकारे
शिक्षण पध्दती नवी
वाहत्या वा-यासोबत
हवा बदलायला हवी

अभ्यासपूर्णआरेखन
ती बाजू डावी उजवी
संशोधित नवीनबीज
सकसबुध्दीत रूजवी

तल्लख चपळ तत्पर
पिढी स्पर्धात्मक नवी
बदलावा अपेक्षा करी
चौकस नजर मानवी

संगणक गतिमान युग
अटळ असे धावाधावी
स्वातंत्र्य प्रिय पिढी ही
आवड न् निवडपहावी

उपयोगात ये कौशल्य
नावाला पदवी नसावी
क्षमतामोजणे सुशक्य
प्रयोगशीलता असावी

तंत्रज्ञान पर्यायशोधतो
सं शोधन मदत घ्यावी
प्रवाह कायम बदलता
नाव पैलतीरावरन्यावी

प्रखर स्पर्धात्मक युगा
लवचिकताअनुसरावी
कुणीही ना रहावे मागे
नाविन्या कास धरावी

- हेमंत मुसरीफ
पुणे
मो.9730306996

नवीन शैक्षणिक धोरण

आधुनिक शिक्षण पद्धती सर्वांगीण विकास होणारी आहे.असे म्हणतात. हे नवीन शैक्षणिक धोरण (NEP 2020)२९ जुलै २०२० रोजी मंजूर केलेले आहे.

हे तिसरे शैक्षणिक धोरण आहे. १०+२ रचनेऐवजी ५+३+३+४ अशी रचना करण्यात आली. जेणेकरून विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा ताण कमी पडेल. विज्ञान शिकणारा मुलगा कला किंवा वाणिज्य शाखेतील विषय आवडीनुसार घेऊ शकतो.

वार्षिक परीक्षेची गरज नाही. पंरतु सतत अभ्यास यामुळे मूल्यमापनावर भर, त्यामुळे मुलांमध्ये चढाओढ वाढेल. त्यामुळे सतत डोक्यावर टांगती तलवारअसे वाटू शकते. इयत्ता ३ री,५वी व ८वीत मूल्यमापन परीक्षा, हे ठीक आहे. ई-लर्निंग आणि डिजिटल साधनांचा भर जसे संगणक, इंटरनेट सुविधा सर्व शाळांमध्ये ग्रामीण व शहरी भागात उपलब्ध न झाल्यास त्या शाळांमधील मुले मागे राहू शकतात. सततच्या अभ्यासामुळे तसेच श्रेणी पद्धतीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व पालकांना काहीसे कठीण होईल असे वाटते. सणवार, नातेवाईक एकत्र येणे यावर बधंन येऊ शकतात. तसेच आता एकत्र कुटुंब पद्धती संपुष्टात आली आहे. (न्यूक्लिअर फॅमिलीत राहणे पसंत करतात)आई,वडील मुले एवढेच. त्यामुळे चर्चा, वादविवाद कमी झालेत. शेजाऱ्यांशी ओळख, देवाणघेवाण कमी झालेत. त्यामुळे पुढची पिढी अशीच मोठी होईल असे ध्यानात येत आहे. त्यामुळे सतत अभ्यास, सतत काम त्यामुळे विकृती तर वाढणार नाही. मोकळे डोके केव्हा राहणार हा प्रश्न भेडसावू शकतो. आपण कुणाला वेळ द्यायला हवा का, हे कळणारच नाही ना. मी, माझा अभ्यास, माझा वेळ, शिस्तबद्ध आयुष्य कसे संपले. हे नंतर उत्तरार्धात कळेल. अभ्यास सतत त्यामुळे तु अभ्यास कर फक्त, घरात लक्ष देऊ नको. त्यामुळे व्यवहारिक व घरगुती कामाची सवय व मेहनत कमी करण्याची सवय लागू शकते. फक्त मेंदू काम संगणकावर करून घेईल.

आतातर काय परीक्षा संपते न संपते.निकाल लागतो. पुढच्या वर्गाच्या अभ्यासाची पुस्तके हातात पडतात, शाळा सुरूच परत १ महिनाभर, नंतर सुट्टया. निकालानंतर किती जणांना(विद्यार्थ्यांना) आनंद होत असेल कळणे कठीणच. जगासोबत धावत चला. एव्हढेच शिकतो आहे. असेच बिंबवत आहोत.

व्यावसायिक शिक्षक प्रत्येक शाळेची गरज होईल. कारण खेळ, चित्रकला, कथा, संगीत, तसेच मानसिक, शारीरिक विकासाकडे लक्ष द्यावयाचे आहे. त्यात बागकाम, उद्योजकतेकडे लक्ष केंद्रित करणे. प्रकल्प, संशोधन यातून अनुभव विद्यार्थ्यांना येईल. आवडीनुसार विषय निवडणे, हे एक चांगलेच आहे.

५ वर्ष = प्राथमिक शिक्षण बालवाडी ३ वर्ष, १ली इयत्ता, २री इयत्ता.

३ वर्ष = इयत्ता ३री ते ५वी ३ वर्ष = इयता ६वी ते ८वी

४ वर्ष = इयत्ता ९वी ते १२वी

वार्षिक परीक्षेची गरज नाही. त्यामुळे मुलांना आनंद होईल. वर्षभराच्या अभ्यासाची गरज नाही. १०वी व बारावीचा ताण नाही. ६वी पासून व्यावसायिक शिक्षण, त्यामुळे व्यावसायिक शिक्षक असणे आवश्यक होईल. याची अमंलबजावणी कितपत होईल आणि त्याचा दर्जा सांभाळणे जास्त गरजेचे वाटते.

शाळा सोडणाऱ्या मुलांसाठी पुन्हा शिक्षणात आणणे.हे आधीच्या धोरणात होतेच. विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी समावेशक शिक्षण हे सुद्धा सुरू होतेच काही शाळांमध्ये. आहार, आरोग्य तपासणी हे सुद्धा अमंलात होतेच. प्रायमरी शाळेत, तसेच बालवाडीत चालूच होते.

उच्च शिक्षणातील तरतुद दिसते ती म्हणजे दरवर्षी बाहेर पडतांना प्रमाणपत्र, २वर्षानंतर डिप्लोमा, ३ते ४ वर्षानंतर पदवी. विज्ञानासोबत कला आणि वाणिज्य विषय निवड हे एक चांगलेच आहे.

उच्च शिक्षण संस्थासाठी भारतामध्ये एकच नियामक संस्था तयार करण्याची तरतूद. शिक्षक प्रशिक्षण व संशोधन यासाठी वेगळे प्रावधान, राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठान स्थापनेचा प्रस्ताव सादर करणे. उच्च शिक्षणात २०३५ पर्यंत विद्यार्थ्यांचे प्रमाण ५०%वाढविण्याचे ठरले आहे.

मातृभाषेतून किंवा प्रादेशिक भाषेतून किमान ५वी पर्यंत, शक्य झाल्यास ८वी पर्यंत तीन भाषा पद्धती नवीन धोरणात आहे. तसेही ८ पासून ३ भाषा होत्याच. मातृभाषा, राष्ट्रभाषा किंवा संस्कृत आणि इंग्रजी. १ ली पासून दोन भाषा काही शाळेत हिंदी आणि इंग्रजी, काही शाळेत मराठी आणि इंग्रजी होत्याच.

भारतामध्ये अनेक भाषा आहेत, अधिकृत २२ स्पष्ट करण्यात आल्या. भारतासारख्या भाषिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण देशात मातृभाषेच्या सुचनांची अंमलबजावणी करणे, आव्हाने निर्माण करू शकतात. अनेक भाषा बोलल्या जाणाऱ्या राज्यांमध्ये हे धोरण राबवतांना अनेक समस्यां येऊ शकतात.

आता इंग्रजी किंवा इतर परकीय भाषाही घेता येईल. हा नवा पर्याय अस्तित्वात आला. चांगलेच आहे, दुसऱ्या देशातून येण्याऱ्याला चांगली संधी किंवा एखादवेळेस आवड म्हणून घेऊ शकतात.

शिक्षण लवचिक, परंतु विद्यार्थी पूर्णपणे सतत मूल्यांकन असल्यामुळे अभ्यासात व्यस्त राहील. प्रत्येक विषयाचे शिक्षक ग्रामीण शाळेत ठेवणे कितपत शक्य होईल, हे सांगू शकत नाही. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागात दरी वाढू शकते. शिक्षक भरतीविषयी निश्चित अशी कार्यप्रणाली नाही. शिक्षकांच्या जागा भरल्या जात नाही. त्यामुळे आधीच कमतरता, कंत्राटी पद्धतीने(contract basis job)शिक्षक घेतात,दरवर्षी बदलतात. त्यामुळे मुलांसमोर प्रत्येक वेळेस नवीन शिक्षक तयार होतो. खेळीमेळीचे वातावरण व्हायला वेळ लागतो. दरवर्षी शाळा बदलणार म्हणून त्या शिक्षकाला किती विद्यार्थ्यांशी मनाने आत्मियता असते. ते सांगू शकत नाही.

सुरेखा हरपले
मो. 9405138545

माझिया शाळेत

माझिया ग शाळेत
ज्ञानालयी पारिजात
कालीदासाचे शब्दसुर
भिरभिरती मनमनात
माझिया ग गावात
नादब्रम्हाचा भैरव सुर
कर्मविराची अखंड ज्योत
गुणगुणती या मंदीरात
माझिया अंगाईत
राष्ट्रधर्माचा पयस
ओवी अभंग गात
शाळेच्या पटांगणात
माझिया मेळाव्यात
बोल संताचे रसाळ
ज्ञानाच्या दरबारात
सोहळा माझ्या शाळेत

-संजय मधुकर अरबट
पसायदान ' सरस्वती नगर , आकोट
जि आकोला -२०१
मो: ९९२२ ८७ ६ २६८

नवी पध्दती ..

भारतातील शिक्षणव्यवस्था आज एका महत्त्वाच्या वळणावर उभी आहे. बदलत्या काळानुसार समाज, अर्थव्यवस्था, विज्ञान, तंत्रज्ञान आणि जागतिक स्पर्धा यांचे स्वरूप झपाट्याने बदलत असताना शिक्षणव्यवस्थेनेही बदलणे अपरिहार्य बनले होते. म्हणूनच केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण लागू केले. या धोरणाचे समर्थक त्याला "नवभारताची पायाभरणी" म्हणतात, तर टीकाकार त्यामध्ये अनेक विसंगती आणि धोके पाहतात. मात्र एक गोष्ट निश्चित आहे— शिक्षण हा विषय केवळ अभ्यासक्रमाचा नसून राष्ट्राच्या भवितव्याचा आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणाकडे भावनिक किंवा राजकीय नजरेने नव्हे तर चिकित्सक आणि व्यापक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

भारताची जुनी शिक्षणव्यवस्था मोठ्या प्रमाणात परीक्षा, गुण आणि पाठांतर यांवर आधारित होती. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीपेक्षा त्यांच्या स्मरणशक्तीची परीक्षा घेतली जात होती. अनेक विद्यार्थी पदवीधर होत होते; परंतु त्यांच्याकडे रोजगारक्षम कौशल्यांचा अभाव होता. शिक्षण आणि जीवन यांच्यातील संबंध कमकुवत होत चालला होता. अशा परिस्थितीत नवीन शैक्षणिक धोरणाने विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, कौशल्याधारित अभ्यास, मातृभाषा, संशोधन, तंत्रज्ञान आणि बहुविषयक शिक्षण यांवर भर दिला. हा बदल स्वागतार्ह मानावा लागेल.

विशेषतः प्राथमिक शिक्षण मातृभाषेत देण्याचा निर्णय हा मानसशास्त्रीय आणि शैक्षणिक दृष्ट्या योग्य वाटतो. मूल आपल्या भाषेत सहज विचार करू शकते, समजू शकते आणि व्यक्त होऊ शकते. इंग्रजीच्या दडपणामुळे ग्रामीण आणि गरीब विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणारी न्यूनगंडाची भावना कमी होऊ शकते. परंतु दुसरीकडे जागतिक स्पर्धा, उच्च शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात इंग्रजीशी जोडलेल्या आहेत, हेही वास्तव नाकारता येणार नाही. त्यामुळे मातृभाषा आणि जागतिक भाषा यांचा समतोल राखणे हे अत्यंत आवश्यक ठरणार आहे. अन्यथा ग्रामीण विद्यार्थ्यांना पुढे स्पर्धेत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व दिले आहे. हा विचार काळाची गरज आहे. केवळ पदवी हातात असून उपयोग नाही; विद्यार्थ्यांकडे प्रत्यक्ष काम करण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि तांत्रिक कौशल्य असणे आवश्यक आहे. आज भारतात बेरोजगार पदवीधरांची संख्या मोठी आहे. कारण शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी वाढत गेली आहे. उद्योग क्षेत्राला लागणारे कौशल्य आणि महाविद्यालयात दिले जाणारे शिक्षण यांचा संबंध अनेकदा तुटलेला दिसतो. अशा वेळी व्यावसायिक शिक्षण, इंटर्नशिप, तांत्रिक प्रशिक्षण आणि बहुविषयक अभ्यास या गोष्टी विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनवू शकतात.

मात्र कोणतेही धोरण फक्त कागदावर सुंदर दिसून उपयोग नसतो. त्याच्या अंमलबजावणीची क्षमता महत्त्वाची असते. भारतासारख्या विशाल आणि विषमतेने ग्रस्त देशात शिक्षणाचे समान वितरण हे मोठे आव्हान आहे. महानगरातील डिजिटल शाळा आणि ग्रामीण भागातील शिक्षकविरहित शाळा यांच्यात प्रचंड अंतर आहे. नवीन धोरण डिजिटल शिक्षणावर भर देते; परंतु लाखो विद्यार्थ्यांकडे अजूनही स्मार्टफोन, इंटरनेट आणि संगणकाची सुविधा नाही. अनेक गावांमध्ये वीजपुरवठा अनियमित आहे. अशा परिस्थितीत डिजिटल शिक्षण हे काही प्रमाणात सामाजिक विषमता वाढवू शकते.

शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा केंद्रबिंदू असतो. कोणतेही धोरण शिक्षकांशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. परंतु भारतात आज शिक्षकांवर प्रशासकीय कामांचा प्रचंड ताण आहे. अनेक ठिकाणी शिक्षकांची कमतरता आहे. प्रशिक्षणाची व्यवस्था अपुरी आहे. समाजात शिक्षकांचा सन्मान कमी होत चालल्याची भावना निर्माण झाली आहे. नवीन शैक्षणिक धोरण यशस्वी व्हायचे असेल तर शिक्षकांना फक्त आदेश देऊन चालणार नाही; त्यांना सक्षम, प्रशिक्षित आणि सन्मानित करावे लागेल. शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम शिकवणारा कर्मचारी नसून समाजाच्या भविष्याचा शिल्पकार आहे, ही जाणीव शासन आणि समाज दोघांनी ठेवली पाहिजे.

आजच्या शिक्षणव्यवस्थेतील आणखी एक गंभीर समस्या म्हणजे मानसिक ताण. स्पर्धा, गुण, प्रवेश परीक्षा आणि करिअरच्या दडपणामुळे विद्यार्थी मानसिकदृष्ट्या खचत आहेत. कोचिंग संस्कृतीने शिक्षणाचा आनंद हिरावून घेतला आहे. मुलांच्या बालपणावर स्पर्धेचे ओझे टाकले जात आहे. नवीन धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबद्दल बोलते, ही चांगली बाब आहे; परंतु प्रत्यक्षात परीक्षाकेंद्रित मानसिकता बदलली नाही तर धोरणाचा हेतू अपूर्ण राहील.

शिक्षणव्यवस्था ही समाजाचे प्रतिबिंब असते. समाजात विषमता असेल तर ती शिक्षणातही दिसते. आजही ग्रामीण, आदिवासी, दलित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण समान प्रमाणात

पोहोचलेले नाही. मुलींच्या शिक्षणात अनेक सामाजिक अडथळे आहेत. शिक्षणाचा अधिकार कायद्यात आहे; पण गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार प्रत्यक्षात कितपत उपलब्ध आहे, हा प्रश्न विचारावा लागेल. शिक्षणाचे वाढते खासगीकरणही चिंताजनक आहे. मोठ्या फी, महागडी शाळा आणि व्यापारीकरण यामुळे शिक्षण हक्क नसून बाजारातील वस्तू बनत चालले आहे.

विदेशातील शिक्षणव्यवस्थेकडे पाहिले तर अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. फिनलंडमध्ये विद्यार्थ्यांवर कमी ताण असतो. पाठांतरापेक्षा समज, आनंद आणि कौशल्य यांना महत्त्व दिले जाते. जपानमध्ये शिस्त, सामूहिक जबाबदारी आणि नैतिक मूल्ये शिक्षणातून रुजवली जातात. जर्मनीमध्ये व्यावसायिक शिक्षण अत्यंत मजबूत आहे. अमेरिकेत संशोधन आणि नवकल्पनांना प्रोत्साहन दिले जाते. भारताने या देशांकडून प्रेरणा घ्यावी; परंतु अंधानुकरण करू नये. कारण भारताची सामाजिक रचना, लोकसंख्या आणि आर्थिक वास्तव वेगळे आहे.

भारतासाठी योग्य शैक्षणिक धोरण कोणते असावे, हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षण हे केवळ रोजगार मिळवण्यासाठी नसून चांगला नागरिक घडवण्यासाठी असले पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संविधानिक मूल्ये, सामाजिक संवेदनशीलता आणि मानवता विकसित होणे आवश्यक आहे. शिक्षण जर फक्त बाजारपेठेच्या गरजांसाठी वापरले गेले तर समाज यंत्रमानवासारखा होईल; पण मूल्यशिक्षण, विचारशक्ती आणि संवेदनशीलता जपली गेली तरच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत राष्ट्र निर्माण होईल.

विद्यार्थ्यांनीही आपल्या जबाबदाऱ्या समजून घेतल्या पाहिजेत. शिक्षण म्हणजे फक्त नोकरीचा मार्ग नसून स्वतःला घडवण्याची प्रक्रिया आहे, ही जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची हिंमत निर्माण केली पाहिजे. पालकांनी गुणांच्या अतिरेकातून बाहेर पडले पाहिजे. सरकारने शिक्षणासाठी पुरेसा निधी दिला पाहिजे. समाजाने शिक्षणाला प्रतिष्ठा आणि प्राधान्य दिले पाहिजे.

आज भारताला अशी शिक्षणव्यवस्था हवी आहे जी गरीब मुलालाही मोठी स्वप्ने पाहण्याची ताकद देईल, ग्रामीण विद्यार्थ्यालाही जागतिक दर्जाची संधी उपलब्ध करून देईल आणि विज्ञानाबरोबर मानवतेचे धडेही शिकवेल. नवीन शैक्षणिक धोरण ही सुरुवात असू शकते; पण त्या धोरणाला वास्तवात न्याय देण्यासाठी प्रामाणिक राजकीय इच्छाशक्ती, सक्षम शिक्षक, जागरूक समाज आणि जिज्ञासू विद्यार्थी आवश्यक आहेत. अन्यथा धोरणे बदलतील, अभ्यासक्रम बदलतील; पण शिक्षणाची मूळ समस्या तशीच राहील. राष्ट्राचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडते, हे आपण जितक्या लवकर समजून घेऊ तितके भारतासाठी हिताचे ठरेल.

– गुरय्या रे. स्वामी
राज्याध्यक्ष
कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद
कलबुरगी
मो. 9731082929

नवीन शिक्षण पद्धत

समाजात शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. प्रत्येकाला असे वाटत असते की आपल्या मुलांनी खूप शिकून मोठे व्हावे. शिक्षण उत्तमरीत्या घेणे म्हणजेच समाजात नाव कमवणे अशी धारणा असते. सरकारने वेळोवेळी शिक्षण प्रणालीमध्ये अनेक बदल केले आहेत ज्यामुळे आपला देश हा इतर देशांबरोबर योग्य ती सर्वच क्षेत्रात प्रगती करू शकेल. १९व्या शतकात शिक्षक हे होमवर्क, पाठांतर अशा प्रकाराकडे जास्त भर देत असत. त्यावेळी डॉक्टर, वकील किंवा इंजिनियर होण्याकडे बहुतेकांचा कल होता. परंतु २० व्या शतकात हे सर्व चित्र बदलले. संगणक व इंटरनेट दाखल झाले. एका बटनात सर्व जगाची माहिती मिळू लागली. वेगवेगळे सॉफ्टवेअर विकसित होऊ लागले त्यामुळे सरकारला शिक्षण पद्धतीत बदल करणे अनिवार्य झाले.

जुनी शिक्षण पद्धत खूप चांगली व नवीन शिक्षण पद्धत वाईट असे नाही परंतु नवीन शिक्षण पद्धतीचे समाजात खूप वाईट परिणाम दिसून येत आहेत. नवीन शिक्षण पद्धतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाच्या चुकीच्या वापरामुळे झटपट श्रीमंत होण्यासाठी त्याचा अयोग्य वापर करून लवकर मोठे होण्याचे तेही परिश्रमाशिवाय स्वप्न मुले बघत आहेत. सर्वच मुलांची बुद्धी सारखे नसते अशावेळी ज्या मुलांना हे तंत्रज्ञान जमत नाही ती मुलं डिप्रेशन मध्ये जाऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. त्यामुळे शिक्षण हे नेहमीच सर्व समावेशक असले पाहिजे व शक्यतो मातृभाषेतच असले पाहिजे.

नवीन कुठलीही गोष्ट स्वीकारायची म्हटले की त्याचे फायदे व तोटे दोन्ही असतात. तसेच नवीन शिक्षण पद्धतीचे देखील आहे. प्रथम आपण नवीन शिक्षण पद्धतीचे फायदे बघूया :

१) कौशल्याधिष्ठित शिक्षण आहे त्यामुळे आवडीनुसार शिक्षणक्रम निवडता येतो.
२) नवीन तंत्रज्ञानाचा वापर
३) दप्तराचे ओझे कमी. कृतीयुक्त शिक्षण.
४) लहान वयातच अनेक विषय शिकवले जातात.
५) स्वतःच्या पायावर उभे राहण्यास भर दिला जातो.
६) व्यवसायाच्या नवनवीन संधी उपलब्ध केल्या जातात,
७) संशोधनावर भर देऊन इतर देशांच्या स्पर्धेत आपण मागे नाही तर स्वतंत्र आहोत म्हणून नवीन पिढी तयार होते.

असे फायदे आपल्याला सांगता येतील. फायदे जसे आहेत तसेच तोटे देखील आहेत.

१) सर्व मुलांना नवीन पद्धत समजते असे नाही त्यामुळे काही मुले मागे राहतात व त्यांच्यावर दडपण येऊन नैराश्य येतं.
२) नवीन शिक्षण पद्धती अतिशय वेगवान आहे.
३) नवीन शिक्षण पद्धत खर्चिक आहे त्यामुळे सर्वांना त्याची फी व शैक्षणिक सामानासाठी लागणारा खर्च परवडत नाही.
४) श्रीमंत व गरिबांमधील दरी वाढवणारी आहे.
५) शिक्षकांना प्रथम प्रशिक्षण द्यावे लागेल.

आज भारताने शैक्षणिक क्षेत्रात नवीन धोरण अवलंबून खूप प्रगती केली आहे. शिक्षक भरती करताना प्रथम शिक्षकाच्या गुणवत्तेवर भर दिला जातो जेणेकरून तो आपल्या शाळा कॉलेजमधील विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करू शकेल. नवीन शिक्षण पद्धतीमध्ये नवीन उपकरणे व नवीन तंत्रांचा वापर करून मुलांना शिकवले जाते म्हणजेच आधुनिक पद्धतीने शिक्षण दिले जाते. ऑनलाइन शिकवण्यामागे त्यांचे हेतू असा असतो की मुलांना जास्त ओझे वाहने नको. या नवीन आधुनिक तंत्रज्ञान शिक्षण पद्धतीमुळे काही व्यावहारिक तोटे पण आढळून येतात. आर्थिक दृष्ट्या किंवा ग्रामीण भागात इंटरनेटच्या अभावी शिक्षण घेणे कठीण होते म्हणून शिक्षणात एक दरी निर्माण होते. पाठ्यपुस्तके, शिक्षकांचा दर्जा आणि काही वेळा शिक्षक उपलब्ध नसणे या सर्व गोष्टींमुळे नवीन शिक्षण पद्धत अवगत करणे खूप कठीण झाले आहे. नवीन तांत्रिक शिक्षण अतिशय वेगवान असल्यामुळे ज्या मुलांना शिकण्याचा कंटाळा येतो ती मुलं त्याचा गैरफायदा करतात व गुन्हेगारीकडे वळून समाजात जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतात.

नवीन शिक्षण पद्धतीत सरकारने वेळोवेळी अमुलाग्र बदल केले आहेत पण त्या पद्धतीचे अनेक फायदे व तोटे हे निरनिराळ्या कारणांवर अवलंबून आहेत. तंत्रज्ञानाच्या वापराने आधुनिक शिक्षणामुळे परस्परांशी संवाद होत नाहीत.

आजच्या परिस्थितीत शिक्षण हा एक खेळ झाला आहे. पूर्वीच्या काळी एक पद्धत खूप चांगली होती. शिक्षक उच्च पदवीधर प्रामाणिकपणे व ते स्वतः खूप अनुभवी होते आणि विद्यार्थी पण चांगले मन लावून शिकत होते. आज जर जगात आपण पाहिले तर उच्च पदावर काम करणारे कोणी डॉक्टर, इंजिनीयर व अनेक क्षेत्रात असलेले मान्यवर हे त्या काळात मराठी भाषेतून शिक्षण घेतलेले व घडलेले असे विद्यार्थी आहेत.

शेवटी मला असं म्हणायचं आहे की जुनी शिक्षण पद्धत चांगली व नवीन पद्धत चुकीची आहे असा अजिबात

नाही परंतु एकंदरीत समाजात पाहिलं तर ज्याप्रमाणे झटपट श्रीमंत होण्याच्या चुकीच्या मार्गावर मुले पाऊल उचलतात त्याप्रमाणे लवकर शिकून मोठे होण्याचे स्वप्न मुले बघतात. अशावेळी फक्त शिक्षकांची जबाबदारी आहे असं नाही मुलांच्या पालकांनी त्यांच्याकडे लक्ष ठेवायला पाहिजे व योग्य मार्गदर्शन करायला पाहिजे कारण पालक आपल्या मुलांनी चांगलं शिक्षण घेऊन मोठे व्हावे याकरता खूप परिश्रम करत असतात.

शेवटी प्रत्येकाने प्रत्येकाला आवडेल अशा विषयात प्रगती करून नवीन तंत्रज्ञानाचा चांगला वापर करून त्याचा आपल्या देशाला फायदा करून द्यावा असे मला वाटते.

– महेश रामनाथ वैजापूरकर
डोंबिवली
मो. ९३७२२३८८११

नवे तंत्र नवी दिशा (आष्टाक्षरी)

नवे तंत्र नवी दिशा
नव्या युगी नवे ज्ञान,
सामाजिक माध्यमाना
मिळे सगळ्यात मान.

मिळे त्वरित माहिती
जग झाले आता छोटे,
मोबाईल हाती आला
त्यांचे फायदेही मोठे.

मैदानात मुले आता
खेळतच नाही खेळ,
इंटरनेट खाऊ लागले
दुनियेचा सारा वेळ.

चित्रे कागदा वरची
खरोखर हलतात,
विचारता कुणी प्रश्न
उत्तरात बोलतात.

जीवनात मिळणारे
सारे स्वीकारावे ज्ञान,
नव्या सवे जुन्याचाही
करू मिळून सम्मान.

– दत्तात्रय गणपतराव इंगळे
(आलूरकर) सोलापूर.
मो.7588216115

फायदे अन तोटे

आमच्या लहानपणी दररोज संध्याकाळी देवापुढे दिवा लावला की, परवाचा म्हणजे शुभंकरोती पासून ते अनेक लहान मोठी देवाची स्तोत्रे आम्ही वाड्यातील सर्व मुले मिळून मोठ्याने म्हणत असू. किमान तासभर तरी हा कार्यक्रम असायचाच. तो झाल्यानंतर सर्व पाढे एकापेक्षा एक मोठ्या आवाजात म्हणत असू. शाळेत सुद्धा गणिताच्या तासावर सर येण्याच्या आधी किंवा ऑफ तासाला सर्वजण पाढे, कविता जोरजोरात अगदी बेंबीच्या देठापासून ओरडून म्हणत असत. त्यामुळे सर्वांचे पाढे, कविता अगदी तोंडपाठ व्हायच्याच. स्तोत्रे सुद्धा ऐकून, म्हणून पाठ व्हायची.त्यामुळे सर्वांचांच गणिताचा पाया एकदम भक्कम असायचा. केलक्युलेटर किंवा इतर कोणत्याही उपकरणांच्या कुबड्या घेण्याची आवश्यकता नव्हती वाटत. अगदी पावकी, निमकी,दीडकी सुद्धा तोंडपाठ असायची सर्वांची, पुढे व्यवहारात याचा खूप फायदा होत होता.

आता शिक्षण पद्धतीमध्ये अमूलाग्र बदल घडत आहेत. स्वरूप बदलले आहे. संरगणकासारखी अद्ययावत साधने अगदी लहानपणापासूनच मुलांना शाळेत वापरायला शिकवतात. पाठांतराची गरज नाहीच राहिली त्यामुळे आता. या छोट्या यंत्रात सुद्धा सारे विश्व साठवून ठेवण्याची

क्षमता असते. आणि ते इतक्या सहजपणे आणि क्षणार्धात हवी असलेली सगळी माहिती,ज्ञान आपल्यासमोर हजर करते की डोक्यात साठवण्याची गरजच नसते.

गणित सुद्धा वेदिक पद्धतीने अगदीच झटपट, सोप्या पद्धतीने शिकवले जाते की ते शिकतानाही आनंद वाटतो, मजा येते. पूर्वी वर्गांमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष संवाद होत असायचा. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शंका लगेच दूर व्हायच्या आणि शिक्षक व मुलांच्यात एक वेगळेच भावनिक नातेही निर्माण होत होते.

आजच्या काळात शिक्षण क्षेत्रात अनेक नवीन पद्धती वापरल्या जात आहेत. डिजिटल शिक्षण, कृतीआधारित शिक्षण, ऑनलाइन वर्ग, प्रोजेक्ट पद्धती, स्मार्ट क्लासरूम अशा पद्धतींमुळे शिक्षण अधिक आधुनिक झाले आहे. या नवीन शिक्षण पद्धतीचे काही फायदे आणि तोटे सुद्धा आहेत.

नवीन पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या आवडी, क्षमता आणि गतीनुसार शिक्षण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो. मोबाईल, संगणक, प्रोजेक्टर, इंटरनेट यांचा वापर केल्याने शिक्षण अधिक सोपे आणि सहज बनते.

व्यवहारज्ञान वाढते. ज्ञान मिळते. शाळेतून हल्ली खूप नवे नवे प्रोजेक्ट मुलांना करायला लावतात. विविध प्रयोग करतात. शिवाय डिबेटिंग स्पर्धा, विविध स्पर्धा सादरीकरणे यांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो. त्यामुळे केवळ पाठांतर न करता विषय समजून घेण्याची सवय लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांना विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची आणि नवीन कल्पना मांडण्याची संधी मिळते. आता तरी शाळाच नाही,तर विविध विषयांचे ऑनलाईन कोचिंग क्लासेस असतात. या ऑनलाइन शिक्षणामुळे कुठूनही आणि कोणालाही, कधीही, हवे ते शिकता येते.

मध्यंतरी कोरोनाच्या काळात तरी याची खूप मोठी प्रचिती आली सर्वांना.

नवीन शिक्षण पद्धती म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारी अशी एक आधुनिक शिक्षण प्रणाली! या पद्धतीमध्ये केवळ पुस्तकातील ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या विचारशक्ती, कौशल्य, स्मरणशक्ती, सर्जनशीलता, आणि व्यवहारज्ञान वाढवण्याचा प्रयत्न केला जातो. तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण अधिक रंजक आणि परिणामकारक बनवले जाते. पूर्वीच्या शिक्षणपद्धतीत शिक्षकांना केंद्रस्थानी ठेवले जात होते. नवीन पद्धतीत मात्र विद्यार्थ्यांच्या गरजा, आवडी आणि क्षमतांना महत्त्व दिले जाते. प्रत्येक विद्यार्थी वेगळ्या प्रकारे शिकतो हे लक्षात घेऊन शिक्षण दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.

तंत्रज्ञानामुळे शिक्षण आकर्षक बनते. संगणक, इंटरनेट, स्मार्ट बोर्ड, मोबाईल ॲप्स, व्हिडिओ, ॲनिमेशन यांमुळे शिक्षण अधिक सोपे आणि मनोरंजक झाले आहे. कठीण विषय देखील चित्रे आणि व्हिडिओंच्या मदतीने सहज समजतात. विद्यार्थ्यांचा अभ्यासात रस वाढतो. केवळ पाठांतर न करता विषय समजून घेण्याची सवय लागते. व्यवहारज्ञान वाढते. नवीन शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यास, स्वतःचे मत मांडण्यास आणि नवीन कल्पना शोधण्यास प्रोत्साहन देते. त्यामुळे विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती आणि निर्णयक्षमता विकसित होते. आजच्या शिक्षणात संवादकौशल्य, संगणकीय ज्ञान, नेतृत्वगुण, समस्या सोडवण्याची क्षमता अशा अनेक कौशल्यांवर भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थी भविष्यातील स्पर्धेसाठी तयार होतात. आकर्षित करणारी असंख्य डिजिटलं साधने हल्ली असल्यामुळे विद्यार्थी स्वतः त्यांना हवी असलेली माहिती शोधू लागतात. त्यामुळे स्वअभ्यासाची आणि संशोधनाची सवय विकसित होते. नवीन शिक्षण प्रणालीमध्ये मातृभाषा किंवा स्थानिक भाषेत देण्यावर भर दिल्यामुळे संकल्पना समजणे अधिक सोपे होते. नवीन शिक्षण

पद्धतीचे जसे उत्तम फायदे आहेत, तसेच त्याचे काही तोटेसुद्धा आहेत.

नवीन पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी सर्व शिक्षकांना विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता आहे, ज्यासाठी काही कालावधी लागू शकतो.नवीन शिक्षण पद्धतीमध्ये इंटरनेट आणि इलेक्ट्रॉनिक साधनांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. इंटरनेट बंद असल्यास किंवा साधने उपलब्धनसल्यास शिक्षणात अडथळे येऊ शकतात. शहरात आधुनिक सुविधा सहज उपलब्ध असतात परंतु अनेक ग्रामीण भागांत अजूनही इंटरनेट, संगणक किंवा स्मार्टफोनची कमतरता आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळत नाही. त्याशिवाय महत्वाचे म्हणजे मुलांचे पालक बहुतांशी व्यवसायाच्या, नोकरीच्या निमित्ताने दिवसभर घराबाहेर असतात. हल्ली मोबाईल किंवा इंटरनेटवर नवनवीन गेम्स मुलांना आकर्षीत करत असतात. त्यामुळे त्याचा मुलांच्याअभ्यासावर परिणाम होतो.

ऑनलाइन शिक्षण पद्धती मुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष संवाद कमी होतो.त्यामुळे बरेचदा काही प्रश्न,शंका मुलांच्या मनात तशाच राहतात. सर्वांत महत्वाचे म्हणजे सतत मोबाईल किंवा संगणकाच्या स्क्रीनसमोर बसल्यामुळे डोळ्यांचे विकार, डोकेदुखी, मानसिक ताण आणि शारीरिक हालचालींचा अभाव अशा अनेक शारीरिक समस्या निर्माण होऊ शकतात. स्मार्टफोन, संगणक, इंटरनेट, डिजिटल साधने यासाठी खर्च करावा लागतो. सर्व पालकांना हा खर्च परवडेलच असे नाही.

नवीन शिक्षण पद्धती ही काळाची गरज बनली आहे. तंत्रज्ञानामुळे शिक्षण अधिक सोपे, वेगवान आणि प्रभावी झाले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि कौशल्यांना वाव मिळत आहे. मात्र तंत्रज्ञानाचा अतिरेक होता कामा नये. म्हणूनच पारंपरिक शिक्षणातील मूल्ये आणि आधुनिक शिक्षणातील तंत्रज्ञान यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. योग्य नियोजन आणि योग्य वापर केल्यास नवीन शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते. काळानुसार शिक्षण पद्धतीत

बदल हे घडायलाच हवेत ,त्यासाठी नवनवीन प्रयोग करून पहायलाही हवेतच

जुने ते सोने, असा दुराग्रह न धरता हाताची पाचही बोटे कधीच सारखी नसतात हे पालकांनी आधी लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. एखाद्या मुलाला अभ्यासात मुळीच गोडी नसेल, पण तो एखाद्या खेळात किंवा कलेत निपुण असेल तर त्याला ते शिक्षण अवश्य घेऊ द्यावे. त्यातून कोणी मोठा खेळाडू, कोणी गायक,कोणी चित्रकार किंवा मोठा वक्ता,नेता सुद्धा होऊ शकेल. केवळ स्पर्धेसाठी मुलांना हट्टाने मोठ्या पदव्या, त्यातील उच्च शिक्षणातील विशेष प्रावीण्य

मिळवण्यासाठी मागे न लागता मुलांना त्यांच्या आवडीनुसार,त्यांच्या क्षमतेनुसार शिकवावे. तेंव्हाच मुलांनाही त्यातील गोडी वाढेल, आणि खऱ्या अर्थाने छान बदल घडेल, मुलांचा आणि समाजाचा विकास घडेल.

सौ. स्नेहा मुसरीफ,
पुणे.
मो. 9503434424

आजची शिक्षण व्यवस्था

आजची शिक्षण व्यवस्था घरोघरी पोहचलेली आहे. सर्वसमावेशक शिक्षण प्रणाली दिसून येते. भारताच्या नवीन शिक्षण व्यवस्थेला म्हणजेच राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020) ला शिक्षण क्षेत्रातील मोठा बदल मानला जातो. या व्यवस्थेमुळे विद्यार्थीकेंद्रित, कौशल्याधारित आणि अनुभवाधारित शिक्षणावर भर दिला आहे. मात्र प्रत्येक बदलासोबत काही फायदे आणि काही आव्हानेही असतात.

नवीन शिक्षण व्यवस्थेचे फायदे

बदलत्या जगाशी देशातल्या भावी पिढीला जुळवून घेण्यासाठी, त्यांना बदलत्या जगात वावरण्याचे बळ देण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण महत्वाचे आहे. त्या पार्श्वभूमीवर 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' कडे पाहिले पाहिजे.

- **सर्वसमावेशक शिक्षण धोरण** - सर्व सामाजिक आणि आर्थिक स्तर, महिला आणि पुरुषांना शिक्षणाच्या पातळीवर एक समान पातळीवर आणणारे धोरण.
- **5 +3 +3 +4 रचना** - केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरुवातीच्या वयापासूनच योग्य विकासावर लक्ष दिले जाते.
- **पाठांतराऐवजी समजून घेण्यावर भर**

पूर्वीच्या "घोकंपट्टी" विद्यार्थ्यांनी विषय समजून घ्यावा, विचार करावा, प्रश्न विचारावेत याला प्राधान्य दिले आहे. व्यावहारिकतेवर भर दिला आहे.

- **कौशल्याधारित शिक्षण**

गुणापेक्षा रोजच्या जीवनातील कौशल्ये, संवादकौशल्य, तंत्रज्ञान, सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता यांवर भर दिला आहे.

- **मातृभाषेत शिक्षण**

प्राथमिक स्तरावर मातृभाषेत किंवा स्थानिक भाषेत शिक्षण दिल्यास मुलांना विषय समजणे सोपे जाते. आत्मविश्वास वाढतो.

- **विषय निवडीचे स्वातंत्र्य**

लवचिक अभ्यासक्रम आहे.

विज्ञान, कला, वाणिज्य याशिवाय संगीतासोबत गणित किंवा विज्ञानासोबत चित्रकला असे मिश्र शिक्षण घेता येते.

- **व्यावसायिक शिक्षणावर भर**

व्यावसायिक शिक्षण, कोडिंग, इंटर्नशिप आणि हस्तकला यांसारख्या व्यावहारिक कौशल्यांवर विशेष भर

व्यवसायाभिमुख शिक्षण यांचा समावेश केल्याने रोजगाराच्या संधी वाढू शकतात.

- **तंत्रज्ञानाचा वापर**

ऑनलाइन शिक्षण, डिजिटल साधने, स्मार्ट क्लासरूम यामुळे शिक्षण आधुनिक आणि आकर्षक बनत आहे.

- **सर्वांगीण विकास**

खेळ, कला, योग, नैतिक मूल्ये, मानसिक आरोग्य यांनाही महत्त्व दिले जाते. विद्यार्थ्यांचा केवळ बौद्धिक नव्हे तर भावनिक विकासही होतो.

नवीन शिक्षण व्यवस्थेचे तोटे / आव्हाने

- **ग्रामीण भागातील अडचणी**

सर्व शाळांकडे इंटरनेट, संगणक, डिजिटल साधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे शहर-गाव दरी वाढू शकते.

- **शिक्षक प्रशिक्षणाची गरज**

नवीन पद्धती प्रभावीपणे राबवण्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन , प्रशिक्षण आवश्यक आहे.

- **मातृभाषा व इंग्रजीचा समतोल**

मातृभाषेत शिक्षण चांगले असले तरी पुढील उच्च शिक्षण आणि जागतिक स्पर्धेत इंग्रजीचे महत्त्व कायम आहे. त्यामुळे संतुलन आवश्यक आहे.

- **सतत बदलणारी मूल्यांकन पद्धती**

नवीन मूल्यांकन प्रणाली विद्यार्थ्यांसाठी तसेच पालकांसाठी सुरुवातीला गोंधळ निर्माण करू शकते.

- **आर्थिक भार**

नवीन सुविधा, प्रयोगशाळा, तंत्रज्ञान, प्रशिक्षण यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता आहे.

- **सर्व विद्यार्थ्यांना समान लाभ नाही**

खाजगी आणि सरकारी शाळांमधील गुणवत्तेतील फरक अजूनही मोठा आहे.

बहुविद्याशाखीय (Multidisciplinary) पद्धतीमुळे अभ्यासक्रम अधिक गुंतागुंतीचा किंवा लांबलचक वाटू शकतो.

अगणित शाखामुळे पालक- विद्यार्थी गोंधळात पडतात.

नोकरीची संधी मिळेलच असे नाही.

निष्कर्ष--

विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक आणि बहुविद्याशाखीय शिक्षण देणे, शिक्षणाचा दर्जा आणि उपलब्धता सुधारणे, तसेच राष्ट्राच्या आर्थिक वाढ आणि विकासाला हातभार लावू शकेल असा प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे हा आहे.

नवीन शिक्षण व्यवस्था ही केवळ अभ्यासक्रमातील बदल नसून "विद्यार्थी कसा घडवायचा?" व्यक्ती कशी असावी? याचा नवा विचार आहे.

ही व्यवस्था योग्य प्रकारे राबवली गेली तर विद्यार्थ्यांमध्ये स्वक्षमता, आत्मविश्वास, कौशल्य,

सर्जनशीलता आणि रोजगारक्षमता वाढू शकते. मात्र त्यासाठी शिक्षक, पालक, शासन आणि समाज यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

राज्यघटनाच्या तरतूदींचा आणि कर्तव्यांचा शालेय अभ्यासक्रमापासून ते विद्यापीठ स्तरापर्यंतच्या अभ्यासक्रमात करण्यात आल्यामुळे राज्यघटनेचा आदर करणारी भावी पिढी या धोरणातून तयार होईल अशी आशा आहे.

नवीन शिक्षण प्रणाली इतर प्रगत देशांशी स्पर्धा करू लागलीय.आधुनिक शिक्षणाला कलाटणी देणारे ही शिक्षण पद्धती नक्कीच विद्यार्थ्यांना उज्वल भविष्य बनविण्यासाठी कामी पडेल.

"शिक्षण म्हणजे फक्त नोकरी मिळवण्याचे साधन नसून, चांगला माणूस घडवण्याची प्रक्रिया आहे."

ही व्यवस्था योग्य प्रकारे राबवली गेली तर विद्यार्थ्यांमध्ये स्वक्षमता, आत्मविश्वास, कौशल्य, सर्जनशीलता आणि रोजगारक्षमता वाढू शकते. त्यासाठी शिक्षक, पालक, शासन आणि समाज यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आढावा

शिक्षणातून शिस्त व स्वच्छतेला महत्त्व द्यायला हवं.

प्रत्यक्ष संवाद, कुटुंब व्यवस्था हाच निरोगी निकोप स्वाथ्याचा पाया आहे. याची जाणीव करून द्यायला हवी.

शाळांपेक्षा इतर शैक्षणिक व्यवस्था क्लास, अॅकडमी हे बंद करायला हवं. वार्षिक नियोजन सर्वत्र सारखेच पाहिजे.

परीक्षा विभागात पारदर्शकता हवी. किमान शिक्षण तरी भ्रष्टाचार विरहित पाहिजे.

एकंदरीत आजची नवीन शिक्षण व्यवस्था कागदावर अत्यंत सुंदर दिसते; पण प्रत्यक्षात तिचं चित्र मिश्र स्वरूपाचं आहे. काही ठिकाणी ती विद्यार्थ्यांसाठी संधी निर्माण करते, तर काही ठिकाणी ती अजूनही "प्रयोग" अवस्थेत असल्यासारखी वाटते.

थोडक्यात

• माहिती प्रचंड — पण ज्ञान कमी

आज विद्यार्थ्यांकडे इंटरनेट, AI, डिजिटल साधने, ऑनलाइन क्लासेस यांची रेलचेल आहे.

मात्र माहिती मिळते आहे, पण विचार करण्याची क्षमता, संयम, चिंतन, निरीक्षण क्षमता कमी होत आहे.

आज"Google AI उत्तर देतो; पण प्रश्न विचारायला शिकवत नाही."

• गुणांच्या स्पर्धेत व्यक्तिमत्त्व हरवत आहे

नवीन शिक्षण पद्धती "कौशल्य" म्हणते; पण प्रत्यक्षात अनेक पालक, शाळा आणि विद्यार्थी अजूनही गुण, रँक, प्रवेश परीक्षा यांच्याभोवतीच फिरताना दिसतात.

विद्यार्थी शिकतो कमी आणि "परफॉर्म" जास्त करतो.

• तंत्रज्ञान उपयोगी — पण मानवी स्पर्श कमी

ऑनलाइन शिक्षणामुळे शिक्षण घराघरात पोहोचले.

शिक्षक-विद्यार्थी नातं, वर्गातील संवाद, मित्रांसोबतचं शिकणं, चुका करून वाढणं, मैदानी खेळ— हे अनुभव कमी होत आहेत.

आज मुलं स्क्रीनसमोर जास्त आणि निसर्ग, माणसं, अनुभव यांच्यापासून थोडी दूर जात आहेत.

• अभ्यासक्रम आधुनिक — पण जीवनशिक्षण अपुरं

विद्यार्थ्यांना Coding, AI, Robotics शिकवलं जातं;

पण —अपयश पचवणं, नकार पचवणं, नातं जपणं, भावनांचं व्यवस्थापन, संयम, जबाबदारी, समाजभान हे शिकवण्यासाठी शिक्षण व्यवस्था अपुरी पडते.

• शिक्षकांवर वाढता ताण

शिक्षकांना आता फक्त शिकवायचं नसतं — डेटा, पोर्टल, प्रोजेक्ट, ऑनलाइन नोंदी, उपक्रम, प्रशिक्षण यातच शिक्षक गर्क आहे.

कधी कधी "शिक्षक" हा "कागदपत्र व्यवस्थापक" जास्त वाटू लागतो.

शिक्षण व्यवस्था कशी हवी?

• माणूस घडवणारी

फक्त करिअर नव्हे; तर संवेदनशील, विचारशील, जबाबदार, कौटुंबिक, सामाजिक माणूस घडवणारी.

• जीवनाशी जोडलेली

शाळेत शिकलेलं आयुष्यात उपयोगी पडावं —

आर्थिक साक्षरता, मानसिक आरोग्य, संवादकौशल्य, कायदे व नागरिकत्व, शेती, पर्यावरण, घरगुती कौशल्ये

हेही शिक्षणाचा भाग असायला हवे.

• प्रश्न विचारण्याचं स्वातंत्र्य संधी देणारी

विद्यार्थ्याने "का?" विचारला तर तो उद्धट नाही; तर जागरूक आहे — अशी संस्कृती हवी.

• तुलना कमी करणारी

प्रत्येक मूल वेगळं असतं.

मासा झाडावर चढू शकत नाही म्हणून तो कमी बुद्धिमान ठरत नाही.

•शिक्षक केंद्रस्थानी पाहिजेत.

AI, तंत्रज्ञान, स्मार्ट बोर्ड उपयोगी आहेत; पण प्रेरणा देणारा शिक्षक कोणतीही मशीन बनू शकत नाही.

शिकणं म्हणजे भीती, ताण, पैसे मिळविण्याचे, कुटुंबापासून अलिप्त राहण्याचे एकाकी साधन नसून शोध, आनंद आणि अनुभव असावा.

शिक्षणाच्या नावाखाली चालणारे गैरप्रकारास पूर्ण आळा

घातला पाहिजे.

एका बाजूला शिवराज मोटेगावकर shivraj motegavkar प्रकरणामुळे...

समाज किती दिशाहीन होत चालला आहे,

NEET सारख्या देशातील अत्यंत महत्त्वाच्या परीक्षांभोवती निर्माण झालेल्या संशयामुळे हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. RCC क्लासेस आणि त्यासंबंधित तपासामुळे शिक्षण क्षेत्रातील पैशाचे आणि प्रभावाचे जाळे चर्चेत आले. CBI चौकशी, विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली भीती, पालकांची चिंता... हे सर्व अत्यंत गंभीर आहे.

जर शिक्षण क्षेत्रातच प्रामाणिकपणा राहिला नाही...

तर गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांनी आयुष्यभर केलेल्या मेहनतीचे काय? आज विद्यार्थी रात्रभर अभ्यास करतो...आई-वडील कर्ज काढून क्लास लावतात...

आणि जर सिस्टमच पैशाने विकत घेतली जात असेल,

तर उद्याच्या पिढीचा काय?

भविष्यातील सामाजिक नुकसान किती मोठे असू शकते?

मेहनती विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास उडेल

पैशाने सर्व काही मिळते हा चुकीचा संदेश जाईल

प्रामाणिक विद्यार्थी नैराश्यात जातील

भ्रष्ट लोक डॉक्टर, अधिकारी, जबाबदार पदांवर पोहोचू शकतात.

शिक्षण व्यवस्था education system "स्पर्धा" compitation नसून "व्यवहार" बनेल

हा फक्त पेपर लीकचा paper leak प्रश्न नाही...

हा भारताच्या भविष्यातील गुणवत्तेचा प्रश्न आहे!

गरीब गरीबच रहाणार. प्रामाणिक विद्यार्थ्यांच्यात निराशावाद येणार. परीक्षा फक्त अभ्यास नसतात...

त्या मानसिक, आर्थिक आणि भावनिक युद्ध असतात.

विद्यार्थ्यांना नेमकं काय सांगायचं?

"मेहनत करा..." ?

"प्रामाणिक राहा..." ?

"स्वप्नांसाठी झुंजा..." ?

खाजगी शिकविण्या, शाळा- विद्यालये बंद होऊन सरकारी शाळांवर भर दिला पाहिजे. जे सद्या नेपाळमध्ये सुरू आहे.

शिक्षणात पारदर्शकता आली पाहिजे. प्रत्येकाच्या हाताला काम दिल पाहिजे. समान नागरी कायदा केला पाहिजे.गैरविचारास, गैरकृत्यास आळा बसेल.

सारांश

आजची शिक्षण व्यवस्था वेगाने बदलते आहे. ज्ञानविस्फोट झाल्याने मेंदू लहान पण अतिरिक्त ज्ञान भांडार. यात तो इतका गर्क आहे की मानवी नात्याकडे पहायला त्याला वेळच मिळेना झालाय. विचारशक्ती पूर्ण आय.टी.मय झालीय. नोकरदारांचा मेंदू, वेळ कंपनीच्या ताब्यात. बदल्यात भरमसाठ पॅकेज. बदल्यात चालणे, उठणे, इतरांशी बोलणे, एकत्रित जेवणे, कुटुंबाशी वार्तालाप, सुख- दुःख संवाद हरविलय. निसर्ग निर्मित खळखळाटापेक्षा संकुचित चकचकाट वाढत चाललाय. AI मुळे विचार निर्मिती लुप्त होतेय काय अशी भीती निर्माण वाटतेय.

निसर्ग निर्मित गोष्टी, शेती,बौध्दिक कौशल्याबरोबर शारीरिक कष्ट यावरती भर दिला पाहिजे.

जग जवळ आल्याने भौगोलिक अंतर कमी झालय पण भावनिक अंतर यात दरी निर्माण होऊ लागलीय.

"आपण हुशार मुलं घडवत आहोत की यांत्रिक माणसं?"

कारण भविष्य फक्त तंत्रज्ञानाने नाही, वायवहाराने नाही, सोनी नाही तर मूल्यांनी टिकतं.

नव्या युगाची पहाट सुरू होत असताना मानवी नाती विखरू लागलेत. समाधान, आनंद, तृप्तीची व्याख्या व्यावहारिक झालीय. खाण्यासाठी धन पाहिजे पण जगण्यासाठी संवाद, नाती,माणसे हवीतच.

धन नसल्यास अडचणी येतात.विद्या नसल्यास दिशा हरवते. नाती नसल्यास जगण्याची ऊब हरवते. आयुष्यात धन कमवा,विद्या मिळवा, पण नाती जपा. यासाठीच समतोल साधनारे मर्यादशील शालेय-सामाजिक- कौटुंबिक शिक्षण हवे. जगण्यासाठी बौध्दिक विकास पाहिजेच यासाठी डिजिटलायझेशन आवश्यक आहे . वंशपरंपरा चालविण्याची जबाबदारीही तितकीच महत्वाची आहे. यासाठीच भावनिक विकासही हवा. मन आहे तिथ मत आहे. हे व्यक्त करायला ऐकणाराही हवा.

!!विद्या धनं सर्वधनप्रधानम् !!

"विद्येचं धन हे सर्व धनांमध्ये श्रेष्ठ आहे."

हे मिळवत असताना. आपल्यातील जीवंतपणाही प्रवाही ठेवला पाहिजे.

सौ. विद्या प्रल्हाद पाटील
'अवनी', ज्योतिर्लिंग हायस्कूल समोर,
निगवे- दुमाला,
ता. करवीर, जि. कोल्हापूर .
मो. 9860715887

शिक्षण एक प्रक्रिया

शिक्षण ही मानवी जीवनातील सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. विकासाच्या मार्गावर मार्गक्रमण आहे. मानवी जीवनाची अत्यंत महत्वाची भूमिका आहे. शिक्षण हे विद्यादानाचे पवित्रवक्षेत्र आहे. जन्मा पासून मृत्यूपर्यंत चालणारी लांबलचक वाटचाल आहे. शिक्षणच जगण्यासाठीची लढाई आणि संघर्ष शिकविते. न्याय अन्यायाची जाणीव करून देते. मानवाला शहाणपण शिकविते. म्हणून शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणाने समाज घडतो, देश घडतो, विद्यार्थी घडतो.

जीवन शिक्षण वेगळे आणि शालेय शिक्षण वेगळे असते. जीवनातील अनुभवासाठी मानवाला जागतिक तत्वज्ञान, तंत्रज्ञान कौशल्य, रासायनिक अभिक्रिया, युगायुगाचा अभ्यास, कालगणनेचे मापन करण्यास गणिती शिक्षणाची गरज निर्माण झाली. त्यासाठी शाळा, विद्यालये, महाविद्यालये या मधून विविध शिक्षणाची सोय निर्माण झाली. आज जागतिक पातळीवर जो विकास दिसून येतोय तो शालेय शिक्षणा मुळेच! शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आणि त्याला सुविद्य बनविणे शासनाचे काम आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून शिक्षणाच्या अनेक योजना शासन राबवत आहे. प्रथम 1968 साली राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू झाले. यात सर्वांना समान शिक्षण, तीन भाषा सूत्र आणि विज्ञान शिक्षणावर भर असा विषय ठरविला. दुसरे वेळीराष्ट्रीय शिक्षण धोरण 1986 लागू केले. यात स्त्री शिक्षण, प्रौढ शिक्षण, ग्रामीण शिक्षण आणि तंत्रज्ञान वापरावर भर दिला होता. पुढे तिसरे वेळी म्हणजे सध्या राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 लागू केले गेले. यात 5+3+3+4 हा आकृतीबंध आखण्यात आला. कौशल्यावर आधारित शिक्षण, मातृभाषेत शिक्षण, डिजिटल शिक्षण, यावर भर देण्यात आला.

बदलत्या काळाप्रमाणे शिक्षणाची आणि अभ्यासक्रमाची धोरणे बदलत गेली. काळाची गरज लक्षात घेऊनच शिक्षण पद्धती राबविण्यात आली. पूर्वी गुरुकुल पद्धती होती. मुले शिस्त, संस्कार आणि जीवन कौशल्य शिकत होते. पाठांतरावर भर देण्यात येत होता. परीक्षा पद्धती वापरून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन होत होते. गाव, पाडे, वस्ती या भागात शिक्षण पोहोचले नव्हते. मातृभाषेतून शिक्षण देण्याची सोय नव्हती. पहाडी भागातील वस्तीतील मुलांना भाषेची अडचण निर्माण होत असल्या मुळे त्यांना शिक्षणाचा लाभ घेता येत नव्हता. ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण फार तर माध्यमिक शिक्षणाची सोय होती. उच्च शिक्षणासाठी तालुक्याच्या गावात किंवा जिल्ह्याच्या गावात जावे लागत होते. त्यामुळे उच्च शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचले नव्हते. मुलींना शिक्षण देण्याची मानसीकता आधीच्या लोकांची नव्हती. आज मात्र मुलगा मुलगी समान समजून सर्वांना शिक्षण प्रवाहात आणले गेले.

मुली उच्च शिक्षण घेऊ लागल्या. नोकरी व्यवसाय करून अर्थार्जन करू लागल्या. स्वावलंबी झाल्या. आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावू लागल्या. ही, स्त्री शिक्षणाला उत्तेजन दिल्याची पावतीच आहे.

आजच्या शिक्षण पद्धतीचे फायदे -

आज शिक्षण क्षेत्रात खूप मोठा बदल आढळून येतो. बहुतेक उच्च विद्यालयात माहिती आणि तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण देण्याची सोय झाली. आवडीच्या विषयांना प्राधान्य देऊन त्यातील कौशल्य आत्मसात करता येऊ लागले. कॉम्प्युटर, लॅपटॉप, स्मार्ट फोन आणि हायस्पीड इंटरनेट यांच्या माध्यमातून सगळ्या जगाचे ज्ञान विद्यार्थी हस्तगत करू लागले. मायक्रो लर्निंगमुळे विद्यार्थ्यांचा, एखादी गोष्ट शिकण्याचा वेग वाढला. नव्या पिढीला डिजिटल तंत्रज्ञान लवकर आत्मसात करता येते. म्हणूनच आजच्या स्मार्ट विद्यार्थ्यांना नोकरीच्या भरपूर संधी प्राप्त झाल्या. कोडिंग, ये आई, तंत्रज्ञान, चाट जीपीटी आणि गूगलवर शोधून आणखी काय काय अॅप वापरून मुले सगळी कामे सहज करीत आहेत. त्याचा तंत्रज्ञान शिक्षणाबद्दल आत्मविश्वास वाढला. कौशल्यावर आधारित प्रात्यक्षिके, संशोधन, प्रयोगशाळांची निर्मिती, नवीन शोधाचे सादरीकरण यामुळे मुलांच्या बौद्धिक क्षमता विकसित होत गेल्या. तांत्रिक कौशल्य वापरण्यासाठी विद्यार्थी इंटरनेटचा वापर करायला शिकले. कॉम्प्युटर शिक्षण आणि तंत्रज्ञान शोधामुळे विद्यार्थ्यांना कोणतीही माहिती सहज उपलब्ध होऊ लागली. एका ठिकाणी थांबून दूर दूर अंतरावर आपले तंत्रज्ञान पोहोचवू शकलो. कामात येणाऱ्या अडचणी एका ठिकाणी थांबून सोडवू लागलो. दुरूनच कामाच्या प्रकाराची देवाण घेवाण करता येऊ लागली. कार्यालयीन कामांची वर्क फ्रॉम होम यामुळे खूप सोय झाली. समाजात सर्वांच्या हातात स्मार्ट फोन असल्याने गुगल पे, घरची सगळी बिले भरणे, सगळे रिचार्ज मारणे आणि तत्सम कामे घरून करता येतात. ग्रामीण आणि शहरी भागात मोबाईल हातात आल्यामुळे ग्रामीण भागातील लोक मागे राहिले नाहीत. त्यांना शहरी विकासाचा कार्यक्रम घरातूनच पाहता येऊ लागला. ग्रामीण भाग शहरांचे सुधारित जीवन पाहून, त्याचा उपयोग, आपले जीवनमान उंचावण्यासाठी,

शहरी लोकांचे अनुकरण करण्यासाठी प्रयत्न करू लागले. आजच्या शिक्षण पद्धतीत पुस्तकांच्या माध्यमातून स्मार्ट तंत्रज्ञानाचा शिकून त्याचा उपयोग अधिक प्रमाणात केला जातो. हे आजच्या नवीन शिक्षण पद्धतीचे फायदेच आहेत.

नवीन शिक्षण पद्धतीचे तोटे –

आताच्या शिक्षण पद्धतीत गणित, विज्ञान या विषयांसोबत कला विभागातील सोपे विषय घेऊन शिकण्याची सुविधा निर्माण झाली आहे. त्यामुळे मुलांना काठिण्य पातळी अवगत करण्याची आणि अधिक परिश्रम करण्याची इच्छा राहत नाही. नवीन शिक्षण कौशल्य, प्रयोग, कला सादरीकरण, व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून दिले जाते. नवीन डिजिटल तंत्रज्ञान वापरण्यावर शिक्षणाचा भर आहे पण; हे सर्व करीत असताना सर्वच विद्यालयात प्रशस्त आणि सुसज्ज प्रयोगशाळा असतीलच असे नाही. प्रशिक्षित शिक्षक, इंटरनेट सुविधा, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब असतील की नाही हे सांगता येत नाही. या सर्व गोष्टींमुळे विद्यार्थी शिक्षण परिपूर्ण होणार नाही. शिक्षणाच्या प्रवाहात ते मागे पडतील. प्राचीन काळापासून जे ज्ञान आपण पुस्तकांच्या माध्यमातून घेत आलो, ते आपण पुस्तके वाचनाच्या आळसामुळे घेऊ शकणार नाही. मायक्रो लर्निंगमुळे विद्यार्थ्यांचा कल शॉर्टकट शिक्षणाकडे अधिक आहे. स्पर्धा वाढलेली आहे. दिव्यांग, आर्थिक दुर्बल घटक या शिक्षणापासून वंचित राहतील. शाळेत जाऊन शिकण्या ऐवजी ऑनलाईन शिक्षण, यू. ट्यूब वरून माहिती घेणे इकडे मुलांचे लक्ष आहे. अशी शिक्षण पद्धती सगळ्यांना साधता येईलच असे सांगता येत नाही. नवीन शिक्षण पद्धतीत हे आणि असेच काही तोटे आहेत. हे सर्व डोळ्या समोर ठेऊन शिक्षा पद्धतीत सुधारणा करण्याचे धोरण ठेवावे लागेल.

नवीन शिक्षण प्रभावी करण्यासाठी, शिक्षण पद्धती मधील त्रुटी काढून, सर्वांगीण, सर्वसमावेशक शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध व्हावे. म्हणजे सर्वांना शिक्षणाचा लाभ मिळेल.

विद्यार्थ्यांना न्याय मिळेल.....

सौ. विजया भांगे
पाथ्रोट, अमरावती
मो.8788417459

बदललेली शिक्षण

जुने संदर्भ सरले, आता नवे धडे गिरवू,
शिक्षणपद्धतीची नवी वीण आज विणून बघू.
केवळ नोकरीची शिडी नको, ध्यास ज्ञानाचा हवा,
नव्या धोरणांच्या अंमलात, नवा आत्मविश्वास हवा.

रट्टा मारण्याचे जुने दिवस आता संपले,
कौशल्याचे नवे प्रयोग वर्गात हळूहळू उमलले.
पण तंत्रज्ञानाच्या या गर्दीत, दरी साशंक वाटते,
ग्रामीण आणि शहरी भिंत, अजूनही का दुभंगते?

बदल हवा होता म्हणून, पाऊल आपण उचलले,
पण 'माणूस' घडवण्याचे सूत्र, कुठे थोडे विसरले?
साधनं बदलतील, पद्धतीही बदलत राहतील,
पण संस्कारांची शिदोरीच, उद्या खरी साथ देतील!

कु.कशमीरा उल्हास गुप्ते
डोंबिवली
+91 77100 95392

दोन पिढ्यांचा संवाद

गावातील जुन्या वाड्यात संध्याकाळची वेळ होती. बाहेर पाऊस रिमझिम पडत होता. घरात मात्र अभ्यासावरून नेहमीसारखी चर्चा रंगली होती.

दहावीमध्ये शिकणारा अथर्व मोबाईलवर काहीतरी पाहत बसला होता. त्याच्या हातात वही-पुस्तक नव्हते. हे पाहून वडील नारायणराव चिडले.

"अरे अथर्व, दिवसभर त्या मोबाईलमध्ये काय असतं? आमच्या वेळेला पुस्तक हातात घेतलं की तासन्‌तास उठायचो नाही. पाठांतर केलं, खडूफळ्यावर गणितं सोडवली, म्हणून आम्ही शिकलो."

अथर्व शांतपणे म्हणाला, "बाबा, मी खेळ खेळत नाहीये. उद्याच्या विज्ञान प्रोजेक्टसाठी AI वर माहिती शोधतोय. शिक्षकांनी ऑनलाइन सादरीकरण करायला सांगितलंय."

आई सुमनबाई मध्येच म्हणाल्या, "आमच्या वेळेला गुरुजी शिकवायचे तेच अंतिम असायचं. आता मोबाईल, कॉम्प्युटर, ऑनलाइन क्लास... हे सगळं आम्हाला कळत नाही. पण तुम्ही मुलं पुस्तकांपासून दूर जाताय, हीच भीती वाटते."

अथर्वने मोबाईल बाजूला ठेवला. "आई, माहिती मिळवण्याची पद्धत बदलली आहे. पण शिकणं थांबलेलं नाही."

नारायणराव हसले, "माहिती मिळवणं आणि शिक्षण यात फरक असतो रे! आम्ही पाठांतर केलं म्हणून स्मरणशक्ती वाढली. संस्कार मिळाले. शिक्षकांचा आदर शिकलो. आता मुलांना गुगल सगळं सांगतं. मग विचार करायची गरजच काय उरली?"

अथर्व काही क्षण शांत राहिला. मग म्हणाला, "बाबा, तुमच्या काळात माहिती कमी होती म्हणून ती लक्षात ठेवणं गरजेचं होतं. आता माहिती खूप आहे. त्यामुळे योग्य माहिती निवडणं, समजून घेणं आणि वापरणं महत्त्वाचं झालंय."

आईला प्रश्न पडला. "मग संस्कार कोण देणार? मोबाईल?"

त्या प्रश्नाने वातावरण क्षणभर गंभीर झाले.

अथर्वने आईचा हात हातात घेतला. "संस्कार मशीन देऊ शकत नाहीत आई. ते घरातूनच मिळतात. पण शिक्षणाची साधनं बदलली आहेत. आधी पाटी होती, मग वही आली, आता टॅब आला. बदल फक्त माध्यमांचा आहे."

नारायणराव विचारात पडले. त्यांना स्वतःचे शालेय दिवस आठवले. मातीचा सुगंध, गुरुजींची काठी, पाठांतर, शिस्त... आणि आता मुलांच्या हातात डिजिटल जग.

"पण या सगळ्या बदलात मुलांचं बालपण हरवत नाही ना?" त्यांनी हळू आवाजात विचारलं.

अथर्व म्हणाला, "हरवतं बाबा... जर आई-बाबा फक्त गुण विचारतील आणि संवाद नाही केला तर. आम्हाला तंत्रज्ञान हवंय, पण तुमचा अनुभवही हवा आहे."

त्या रात्री अथर्वने वडिलांना AI वरून बनवलेलं विज्ञानाचं सादरीकरण दाखवलं. त्यात चित्रं, व्हिडिओ आणि माहिती होती. नारायणराव आश्चर्यचकित झाले.

"हे सगळं तू केलंस?"

"हो. पण विषय समजावून घेताना तुमच्यासारखी चिकाटी लागलीच ना बाबा!"

नारायणरावांच्या चेहऱ्यावर समाधान उमटलं.

ते म्हणाले, "म्हणजे जुनी पद्धत पूर्ण चुकीची नाही आणि नवी पद्धतही वाईट नाही. दोन्हींचा मेळ घालावा लागेल."

आई हसत म्हणाल्या, "पुस्तकाचं ज्ञान आणि तंत्रज्ञानाची जोड... तेव्हाच खरं शिक्षण."

त्या दिवसानंतर घरात एक नवा नियम झाला.

अथर्व रोज काही वेळ पुस्तक वाचन करायचा, आजोबांकडून गोष्टी ऐकायचा आणि तंत्रज्ञानाचा उपयोग शिकण्यासाठी करायचा.

तर नारायणरावही मोबाईल आणि ऑनलाइन शिक्षण समजून घेण्याचा प्रयत्न करू लागले.

दोन पिढ्यांमधील अंतर पूर्ण संपलं नव्हतं, पण संवाद सुरू झाला होता.

कारण शेवटी — शिक्षणाची साधनं बदलतात, पण माणूस घडवण्याची गरज कधीच बदलत नाही.

अनघा कुलकर्णी
मो.9967360657

शिक्षणाची गंगा

नवीन शिक्षणपद्धती शास्त्रशुद्ध
असावी
जी विद्यार्थ्यांना सदैव साह्यभूत
व्हावी

नवीन शिक्षणपद्धती निरपेक्ष असावी
जी विद्यार्थ्यांना जीवनी मार्गदर्शक ठरावी

नवीन शिक्षणपद्धती आहे खूप चांगली
परि, तिच्या सेवा, पुर्ततेमध्ये आहेत त्रुटी

दाविली जाते विद्यार्थ्यांना जास्त गुणांची आस
परि, विद्यार्थ्यांना बसतो धन, शिक्षणाचा फास

कसा पुर्ण व्हावा त्यांचा सर्व शिक्षणाचा ध्यास
अन् कसा पुर्ण व्हावा त्यांचा शिक्षणाचा विकास

या पध्दतीतही केला जातो विद्यार्थ्यांत भेदाभेद
सांगा! मग, कशी यावी विद्यार्थी मनात उमेद!

शिक्षणपद्धती असावी निरंकुश, कुशाग्र बुध्दीची
जेणेकरून पुर्तता व्हावी त्यांच्या सर्व स्वप्नांची

शिक्षण नियंत्रक असावेत निस्पृह, सदाचारी
जे विद्यार्थ्यांसी उच्चशिक्षणाने सदैव उध्दारी

देवू नये त्यात भ्रष्टाचाराला कुणी कधी उभारी
नवीन शिक्षणाची गंगा यावी सकलांच्या दारी

– मधुकर निलेगावकर,
पुणे
मो.९४२१३७५६९१

खाली डोके वर पाय

फळा गेला खड्डू हरवला
झाले गुरुजी जुने पुराणे
ज्ञानाची गंगा आणली
ए.आय. या भगिरथाने

विश्रांती नको याला कधी
सदा तत्पर, विना कटकट
कोणतीही विचारा माहिती
ए.आय. सांगतो झटपट

कलेचा हा अधिपती
ज्ञानाचा हा सागर सात
घागर तुमची भरुन घ्या
करून तुम्ही हरेक बात

हे सगळे खरेच आहे
पुढे तुमचं होणार काय ?
बांधून ठेवा खुंटीला
खाली डोके वर पाय .

ॲड. विलास कांतिलाल मोरे
एरंडोल
मो. 7588007866

दोन मुलं, एक गाव

दोन मुलं, एक गाव रायगड जिल्ह्यातल्या वडगाव शिवारात दोन मुलं जन्मली — एकाच दिवशी, एकाच पेढाम्बे दवाखान्यात, शेजारच्या शेजारच्या खाटांवर.

पहिल्याचं नाव ठेवलं — यश.

दुसऱ्याचं — सुरेश.

नावांमध्येच भविष्य लिहिलेलं होतं जणू — एकाच्या नावात 'यश' होतं, दुसऱ्याच्या नावात 'सु' होतं — म्हणजे 'चांगलं' होतं. पण आयुष्य नेहमी नावाप्रमाणे चालत नाही, हे या दोघांनी पुढे सिद्ध केलं.

यशचे वडील — रमेशराव देशमुख. तालुक्याचे नामांकित वकील. घरात इंग्रजी वर्तमानपत्र, भिंतीवर शिवाजी महाराजांचा फोटो आणि त्याखाली एक फ्रेम केलेलं वाक्य — "Education is the most powerful weapon." — Nelson Mandela.

सुरेशचे वडील — विठ्ठल कांबळे. गावची अवजारे दुरुस्त करणारे कारागीर. घरात एक जुनी रेडिओ, भिंतीवर कुठल्याशा देवाचा कॅलेंडर आणि त्याखाली विठ्ठलरावांनी कोळशाने लिहिलेलं — "शिक."

Mandela च्या वाक्यापेक्षा हे एकच अक्षर जास्त खोल होतं — पण ते कुणाला कळलं नाही.

दोघेही एकाच शाळेत गेले — श्री. विद्यानंद प्राथमिक विद्यालय, वडगाव.

शाळेत एकूण तीन खोल्या होत्या — एक शिकवण्यासाठी, एक मुख्याध्यापकांच्या झोपण्यासाठी (ते नाकारायचे, पण सगळ्यांना माहीत होतं), आणि एक ज्यात काय आहे ते कुणालाच माहीत नव्हतं — कदाचित सरकारी योजनांच्या धुळखाल्या फायली असाव्यात.

शिक्षक होते — भाऊसाहेब तावडे.

भाऊसाहेब म्हणजे चालतं-बोलतं पाठ्यपुस्तक. ते जे शिकवायचे ते अक्षरशः पुस्तकातून उचललेलं असायचं — एकही शब्द इकडचा तिकडे नाही. एकदा एका मुलाने विचारलं, "सर, नदी का वाहते?" — भाऊसाहेबांनी पुस्तक उघडलं, पाहिलं, मिटलं आणि म्हणाले, "हे पाठ्यक्रमात नाही."

नदी का वाहते हे त्या वर्गाला कधीच कळलं नाही.

यश पहिल्या दिवसापासून पहिल्या बाकावर बसायचा — ताठ मान, नीट केस, गणवेश इस्त्री केलेला. सुरेश शेवटच्या बाकावर — केस विस्कटलेले, गणवेशाला कुठेतरी डाग, पण डोळ्यात एक वेगळीच चमक.

भाऊसाहेब यशला बघून हसायचे.

सुरेशला बघून कपाळावर आठ्या घालायचे.

वर्षे उलटली. दोघेही सातवीत आले.

यश — गुणवंत. प्रत्येक परीक्षेत नव्वदच्या वर. रात्री बारापर्यंत अभ्यास. सकाळी उठून पुन्हा उजळणी. त्याच्या वहीत एकही डाग नाही. प्रत्येक उत्तर पुस्तकातल्या भाषेत — एकही शब्द स्वतःचा नाही.

एकदा परीक्षेत प्रश्न आला — "पाण्याचे महत्त्व सांगा."

यशने लिहिलं — "पाणी हे जीवन आहे. पाण्याशिवाय मानव जगू शकत नाही. पाणी पिण्यासाठी, शेतीसाठी आणि उद्योगांसाठी उपयुक्त आहे."

पूर्ण गुण मिळाले.

सुरेशने लिहिलं — "आमच्या गावाच्या विहिरीला उन्हाळ्यात पाणी नसते. आई दोन किलोमीटर चालत जाते. उन्हात घाम गाळत पाणी आणते. मला वाटते पाणी म्हणजे आईचे कष्ट आहेत."

शिक्षकांनी लाल शाई काढली — "पाठ्यक्रमाबाहेरचे उत्तर. गुण नाही."

सुरेश नापास झाला.

पाणी मात्र आईच्या डोक्यावरच राहिले.

दहावीच्या परीक्षेत यशने ९२% मिळवले.

गावात साखर वाटली. रमेशरावांनी देवळात नारळ फोडला. शाळेत यशचा फोटो लावला — "आमचा गुणवंत."

भाऊसाहेबांनी श्रेय घेतले.

सुरेश ५५% वर अडकला.

विठ्ठलरावांनी कुठे साखर नाही वाटली, नारळ नाही फोडला. घरी आले, सुरेशच्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हणाले, "पुढे शीक. थांबू नकोस."

त्या दिवशी सुरेशला रडायला आले — पण ते अश्रू दुःखाचे नव्हते, कुठल्यातरी न कळलेल्या भावनेचे होते.

त्याच रात्री तो वडिलांच्या कारखान्यात गेला. एक तुटलेली मोटर समोर होती — गेले तीन महिने बंद. त्याने ती उघडली, आतले भाग पाहिले, डोक्याने विचार केला आणि एक जोडणी बदलली.

मोटर सुरू झाली.

विठ्ठलरावांनी मागून पाहिले — त्यांच्या डोळ्यांत पाणी आले. पण ते कुणाला दाखवले नाही.

यश पुण्याला निघाला — इंजिनिअरिंगसाठी.

रमेशरावांनी नवी कोरी बॅग घेतली. आईने डब्यात शिरा भरला. स्टेशनवर सगळे गाव आले निरोप द्यायला

— जणू यशने परीक्षा नाही, देश जिंकला होता!

यश बसमध्ये बसला, खिडकीतून हात हलवला आणि गावापासून दूर निघाला.

सुरेश स्टेशनवर थांबला होता निरोप द्यायला. बस दिसेनाशी झाल्यावर तो हळूच वळला आणि घरी आला.

त्याने त्याच रात्री एक निर्णय घेतला — आपल्याला जे येते ते जगाच्या कामाचे करायचे.

पुण्यात यशच्या नव्या आयुष्याला सुरुवात झाली.

Hostel, canteen, lectures, assignments — सगळं नवं होतं. पण यश तिथेही पहिल्या बाकावरच बसला — सवय होती ना!

इंजिनिअरिंगच्या पहिल्या वर्षी एक प्राध्यापक आले — डॉ. माधव जोशी. ते नव्या पद्धतीचे होते — NEP नुसार शिकवायचे. वर्गात येताना पुस्तक नसायचे, फक्त प्रश्न असायचे.

"सांगा — Bridge कसा बांधतात?"

यशने पटकन उत्तर दिले — "Sir, Concrete, Steel आणि Foundation च्या principles वापरून—"

डॉ. जोशींनी थांबवले. "ते Google वर आहे. तुम्ही सांगा — तुम्ही स्वतः कसा बांधाल? कुठून सुरुवात कराल? काय अडेल? कसे सोडवाल?"

यश गप्प.

वर्गात पहिल्यांदाच यश गप्प होता.

त्याने आयुष्यात कधी हा प्रश्न विचारलाच नव्हता स्वतःला. त्याला उत्तरे माहीत होती — पण प्रश्न विचारण्याची सवयच नव्हती.

त्या रात्री यशला पहिल्यांदा जाणवले — आपण खूप शिकलो, पण खूप कमी समजलो.

डॉ. जोशींचा तास संपताना ते नेहमी एक वाक्य सांगायचे — "माहिती कुणाकडेही असते. शहाणपण स्वतःच कमवावे लागते."

यश ते वाक्य वहीत लिहायचा — पण त्याचा अर्थ अजून कळला नव्हता.

इकडे वडगावात सुरेश थांबला नाही.

त्याने वडिलांकडून कारागिरी शिकली — पण त्यात स्वतःचे डोके घातले. एका जुन्या मोटरपंपाला नव्या पद्धतीने जोडणी केली — वीज कमी लागेल, पाणी जास्त येईल असे.

गावकरी हसले — "शाळेत नापास तो काय करणार?"

पण पंप सुरू झाला.

मग त्याने शेजारच्या शेतकऱ्याचा ट्रॅक्टर दुरुस्त केला — जो गेले सहा महिने बंद होता. मेकॅनिक म्हणाले होते, "नवा आणा." सुरेशने तीन दिवस बसून तो ठीक केला.

गावकरी थांबले — "हा मुलगा काहीतरी वेगळा आहे."

एकदा भाऊसाहेब तावडे बाजारात भेटले. सुरेशला बघून म्हणाले, "काय रे, मेकॅनिकच राहिलास?"

सुरेशने हसून म्हटले, "हो सर. पण मेकॅनिक नुसता नाही — मी उद्योजक आहे!"

भाऊसाहेब काही बोलले नाहीत. पण घरी जाताना त्यांना आतून काहीतरी टोचत राहिले.

यशने इंजिनिअरिंग पूर्ण केले — ७.८ CGPA. Campus Placement मध्ये एका मोठ्या IT कंपनीत निवड झाली. पगार चांगला. पुण्यातच घर.

पहिल्या दिवशी Office मध्ये गेला — मोठ्या इमारती, काचेचे दरवाजे, AC, cafeteria — सगळे स्वप्नासारखे होते.

Manager ने सांगितले — "तुमचे काम म्हणजे हा code daily update करायचा, हे reports तयार करायचे."

यशने विचारले — "Sir, हे कशासाठी होते?"

Manager ने आश्चर्याने बघितले — "तुमचे काम फक्त करायचे. कशासाठी हे विचारायचे नाही."

यश गप्प झाला. पुन्हा पहिल्या बाकावर बसल्यासारखे वाटले — फक्त प्रश्न विचारायचे नाहीत, उत्तरे द्यायची.

दिवसामागून दिवस गेले. महिन्यामागून महिने. वर्षामागून वर्षे.

रोज सकाळी उठायचे, तोच रस्ता, तेच office, तीच screen, तोच code.

एक दिवस रात्री यश आरशासमोर उभा राहिला. बराच वेळ स्वतःकडे बघत राहिला. मग हळूच विचारले — स्वतःलाच —

"यश... तू खूश आहेस का?"

आरशातल्या यशने उत्तर दिले नाही.

त्याच वर्षी सुरेशने वडगावात एक छोटी Workshop उघडली — "कांबळे ॲग्रो टेक."

शेतकऱ्यांची अवजारे दुरुस्त करणे, Solar Pump बसवणे, ठिबक सिंचनाचे काम — हे सगळे तो करायचा. पाच माणसे त्याच्याकडे काम करायची.

एकदा जिल्ह्याच्या कृषी अधिकाऱ्याने भेट दिली. Workshop बघून थक्क झाले.

"तुमचे शिक्षण किती?" त्यांनी विचारले.

"दहावी." सुरेश शांतपणे म्हणाला.

अधिकारी चमकले — "मग हे सगळे कुठून शिकलात?"

सुरेश हसला — "जगण्यातून, साहेब. जगण्यातून."

अधिकाऱ्यांनी त्याला जिल्हास्तरीय कृषी परिषदेत बोलण्यासाठी बोलावले.

त्या दिवशी सुरेश व्यासपीठावर उभा राहिला — खाली शेकडो शेतकरी, अधिकारी, पत्रकार. त्याने सुरुवात केली —

"मी दहावीत नापास झालो होतो. माझ्या उत्तरात पाणी म्हणजे आईचे कष्ट असे लिहिले होते — शिक्षकांनी गुण दिले नाहीत. पण त्याच कष्टांनी मला शिकवले की पाणी वाचवणे हे माझे काम आहे."

सभागृहात शांतता पसरली.

त्याच वर्षी दिवाळीला यश गावी आला.

दोघांची भेट झाली — चहाच्या टपरीवर. रात्रीचे दहा वाजले होते. बाहेर फटाक्यांचा आवाज होता. दिव्यांच्या माळा लागल्या होत्या.

यश म्हणाला, "काय रे, तू इथेच राहिलास?"

सुरेश म्हणाला, "हो. इथेच राहण्यात मजा आहे."

"पण career?"

"career म्हणजे काय रे यश्या? रोज सकाळी उठायची इच्छा होणे — ते career नाही का?"

यश गप्प झाला. चहाचा कप हातात गरम होता.

मग सुरेशने विचारले — "तू खूश आहेस का?"

यशने उत्तर द्यायला खूप वेळ लागला. खूप वेळ.

शेवटी म्हणाला — "सुरेश्या, मला माहीत नाही. खरंच माहीत नाही."

सुरेशने चहाचा घोट घेतला. शांतपणे म्हणाला — "ते माहीत नाही म्हणणे हेच तुझ्यातला सगळ्यात मोठा बदल आहे यश्या. पूर्वी तुला सगळे माहीत असायचे — पण ते खरे नसायचे!"

यश हसला — खूप दिवसांनी, मनापासून.

दुसऱ्या दिवशी यश एकटाच शाळेत गेला — जुन्या आठवणींनी ओढला गेला.

शाळा बदलली होती.

NEP नुसार नवी पद्धत सुरू झाली होती. एका वर्गात मुले project करत होती. एक मुलगी मातीचे मॉडेल बनवत होती — Solar System चे. एक मुलगा साध्या Scratch वर code लिहित होता. एक मुलगा चक्क तबला वाजवत होता — Music आणि Rhythm चा तास होता.

भाऊसाहेब तावडे निवृत्त झाले होते.

नवे शिक्षक होते — आकाश सरकार. तरुण, उत्साही. वर्गात आले की पहिले विचारायचे — "आज काय शिकायचे तुम्हाला?"

एक मुलगी म्हणाली, "सर, आभाळ निळे का असते?"

आकाश सर हसले — "चला, शोधूया!"

यश दाराशी उभा होता. त्याच्या डोळ्यांत काहीतरी ओले आले.

हे त्याच्या वेळी का नव्हते?

त्या प्रश्नाचे उत्तर कुणाकडे नव्हते — पण पुढच्या पिढीला ते मिळेल, या विचाराने मन हलके झाले.

रात्री यश परत जाताना सुरेशला भेटला — निरोप घ्यायला.

म्हणाला, "सुरेश्या, तू दहावीत कमी गुण मिळवलेस — पण तू खरा यशस्वी झालास. मी 'यश' नावाने जन्मलो — पण अजून शोधतोय."

सुरेश हसला. खांद्यावर हात टाकला.

"अरे, शोधणे बंद झाले की माणूस थांबतो. तू अजून शोधतोयस — म्हणजे तू अजून जगतोयस!"

बस निघाली. यश खिडकीतून बाहेर बघत होता.

गावाचे दिवे हळूहळू मागे गेले.

त्याने मोबाईल काढला आणि Boss ला message केला —

"Sir, मला एक महिन्याची

सुट्टी हवी आहे. काहीतरी नवे शिकायचे आहे — पुस्तकाबाहेरचे."

उत्तराची वाट न बघता त्याने मोबाईल खिशात टाकला.

खिडकीतून वारा आत आला — थंड, मोकळा, गावाचा वास घेऊन.

यशने डोळे मिटले.

यश परत गावी आला.

सुरेशच्या Workshop मध्ये रोज जायचा — हातात रिंच घ्यायचा, मोटर उघडायचा, अवजारे जोडायचा. पहिल्या दिवशी हात थरथरले — इतके वर्षे फक्त keyboard वर बोटे चालवलेली.

एकदा एक जोडणी चुकली — मोटर सुरू झाली नाही.

यश वैतागला. सुरेश शांतपणाने म्हणाला, "चूक झाली? मग परत कर."

"पण—"

"यश्या, इथे लाल शाईने गुण कापायला कुणी नाही. चूक म्हणजे शिकण्याची संधी — भाऊसाहेब नाहीत इथे!"

दोघेही हसले.

यशने परत केले. या वेळी मोटर सुरू झाली.

त्या एका क्षणात यशला कळले — चुकणे म्हणजे हरणे नाही. चुकणे म्हणजे पुढे जाणे.

हे त्याला बारा वर्षांच्या शिक्षणाने कधी शिकवले नव्हते.

एक दिवस भाऊसाहेब तावडे Workshop जवळून जात होते.

आत डोकावले — यश आणि सुरेश एकत्र काम करत होते. हसत होते. काहीतरी बनवत होते.

भाऊसाहेब थांबले.

यशने बघितले — "या ना सर, आत या!"

भाऊसाहेब आत आले. बसले. चहा आला.

बराच वेळ शांतता.

मग भाऊसाहेब हळूच म्हणाले, "यश्या, सुरेश्या — मी चुकलो का रे?"

दोघेही चमकले.

"सुरेशला मी नेहमी कमी लेखले. त्याच्या उत्तरांना गुण दिले नाहीत. पण आज बघतो — त्याची ती उत्तर खरी होती ."

सुरेश उठला. भाऊसाहेबांच्या जवळ जाऊन बसला .

"सर, तुम्ही चुकला नाहीत. व्यवस्था चुकली होती. तुम्ही त्या व्यवस्थेचा भाग होतात — एवढेच."

भाऊसाहेबांच्या डोळ्यांत पाणी आले.

त्या दिवशी तिघेही खूप वेळ बसले — चहा, गप्पा आणि एक वेगळीच शांतता.

शेवट — एक प्रश्न, एक उत्तर

महिना संपला. यश परत जायला निघाला.

या वेळी बॅग वेगळी होती — हलकी. मनावरचे ओझे उतरले होते.

स्टेशनवर सुरेश सोडायला आला.

यश म्हणाला, "सुरेश्या, मी ठरवलेय — नोकरी सोडणार नाही अजून. पण आत बदलेन. रोज एक प्रश्न विचारेन — स्वतःला."

"कोणता प्रश्न?"

"हे मी का करतोय?"

सुरेश हसला — "हा एक प्रश्न पुरे आहे यश्या. हा एक प्रश्न माणसाला आयुष्यभर जिवंत ठेवतो."

बस आली.

यश चढला. खिडकीतून बाहेर बघितले.

सुरेश प्लॅटफॉर्मवर उभा होता — हात हलवत.

बस निघाली.

यशने वहीत लिहिले — डॉ. जोशींचे ते वाक्य, जे त्यांनी खूप वर्षांपूर्वी लिहिले होते पण कधी समजले नव्हते —

"माहिती कुणाकडेही असते. शहाणपण स्वतःच कमवावे लागते."

या वेळी त्याने ते वाचले — आणि हसला.

कारण आता ते समजले होते.

बाहेर संध्याकाळ होती.

आकाश केशरी झाले होते.

कुठेतरी एक मोटर सुरू झाल्याचा आवाज आला —

सुरेशने दुरुस्त केलेली, स्वतःच्या डोक्याने.

आणि कुठेतरी एक screen उघडली —

यशने लिहायला सुरुवात केली — नवीन code नाही,

स्वतःसाठी एक नवीन प्रश्न.

"शिक्षण म्हणजे डोक्यात माहिती भरणे नाही —

शिक्षण म्हणजे मनात प्रश्न जागवणे."

आणि तो प्रश्न जेव्हा स्वतःलाच विचारतो —

तेव्हा खरे शिक्षण सुरू होते.

प्रणित थळे.
मो. 86555 20643

दोन दशकांतील बदल

भारतातील शिक्षणपद्धतीत गेल्या दोन दशकांत एक विचित्र प्रवृत्ती दिसून येते – दहावी व बारावीच्या निकालांमध्ये मिळणाऱ्या मार्कांची टक्केवारी सातत्याने वाढत चालली आहे. एकेकाळी ६० टक्के म्हणजे 'प्रथम श्रेणी' आदराचा विषय होता, ७५ टक्क्यांवर शिक्षणक्षेत्रात डोक्यावर उचलले जायचे. आज मात्र ९० टक्क्यांनाही 'सामान्य' गणले जाऊ लागले आहे. विद्यार्थ्यांना 'भरमसाट मार्क' देण्यामागे शैक्षणिक मूल्यमापनातील सुधारणा आहे की जाणीवपूर्वक केलेला फसवेपणा? मला तर खात्रीपूर्वक हे एक स्कॅम वाटू लागले आहे. दहावी-बारावीतील 'अति उच्च मार्क' ही निव्वळ योगायोग असलेली सुधारणा आहे की उच्चशिक्षणाच्या बाजारपेठेला कस्टमर पुरवण्याची फक्टरी की एक प्रकारचा गरजेपोटीचा 'व्यवहार'?

गेल्या दहा-पंधरा वर्षात अनेक राज्य बोर्ड तसेच CBSE, ICSE मध्ये विद्यार्थ्यांची सरासरी टक्केवारी ८५-९० च्या घरात गेली आहे. २०२३ मध्ये झालेल्या CBSE च्या निकालानुसार ९० टक्क्यांपेक्षा अधिक मार्क मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या हजारोनी होती. पुणे, मुंबई, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणच्या शाळांनी १०० टक्के निकालाची बढाई मारली. पालक सांगतात, "माझ्या मुलाला ९६ टक्के मिळाले!" पण जरा खोलात जाऊन विचारले तर – मुलाच्या वाचन, लेखन, गणित किंवा विज्ञानातील प्रत्यक्ष ज्ञानाबाबतीत त्याच क्रमवारीत तो ९६ टक्क्यांना पात्र आहे का? बहुतेक वेळा उत्तर 'नाही' असे मिळेल.

ही वाढ केवळ विद्यार्थी अधिक सक्षम झाल्याने झाली नाही, तर परीक्षेचे प्रश्नपत्रिका सोपी करणे, मूल्यमापनात उदारता (liberal marking), सतत मूल्यमापनात (internal assessment) सर्वांना पूर्ण गुण देणे, रट्टा लावण्यासाठी मार्गदर्शिका उपलब्ध करणे – यामुळे हे शक्य झाले. अनेक शिक्षक मान्य करतात की, "बोर्डाने आम्हाला शिफारस केली आहे की विद्यार्थ्यांचे मार्क कमी करू नयेत, कारण त्याचे वाईट प्रतिबिंब आमच्या शाळेवर पडेल."

समजा एखादा व्यापारी कमी दर्जाच्या वस्तूला महागडे लेबल लावून विकतो, तर तो स्कॅम असतो. इथेही तसेच घडते. 'ज्ञान' या वस्तूची परीक्षा घेतली जाते, पण प्रत्यक्षात दिले जातात 'फुगवलेले मार्क'. मुलाला असे वाटते की त्याला विषय येतो, पण प्रत्यक्षात तो अनेक मूलभूत संकल्पनांपासून अनभिज्ञ असतो. मग जेव्हा तो उच्च शिक्षणासाठी कॉलेजात जातो (अभियांत्रिकी, वाणिज्य, विज्ञान), तेव्हा त्याला कळते की 'माझी पारख झालीच नव्हती'. अशा विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये रीमेडियल क्लासेस घ्याव्या लागतात. कित्येक नामांकित कॉलेजांना प्रथम वर्षात 'ब्रिज कोर्स' सुरु करावा लागतो. ही एक प्रकारे फसवणूकच आहे – पालक, विद्यार्थी, समाज यांची. परंतु याला 'ब्लॅक अँड व्हाइट' स्कॅम म्हणण्यापेक्षा, ही एक संरचनात्मक बनावट व्यवस्था (structural fraud) आ हे , जिथे सगळे सहभागी एकमेकांना साथ देतात.

"१२ नंतरच्या एज्युकेशन मार्केट ला कस्टमर हवे आहेत." भारतात उच्चशिक्षणाचे खाजगीकरण झपाट्याने झाले. दरवर्षी हजारो खाजगी अभियांत्रिकी, मॅनेजमेंट, मेडिकल, पॅरामेडिकल, सायन्स, कॉमर्स कॉलेजे उघडतात. प्रत्येक कॉलेजला ६० ते १२० सीटा असतात, एका राज्यात अशी ५०० कॉलेजे असली तर ३० हजार विद्यार्थी प्रवेशासाठी हवेत. हे विद्यार्थी कोठून येणार?

दहावी-बारावीचे बोर्ड मर्जीने असे मार्क देतात की कोणताही विद्यार्थी 'कमी टक्केवारी' च्या चिंतेशिवाय कॉलेजात प्रवेश मिळवू शकेल. जर बोर्डाने २५ टक्के विद्यार्थ्यांना ५०% च्या खाली मार्क दिले, तर ते विद्यार्थी कॉलेजला जाणार नाहीत. त्यामुळे कॉलेजांचे 'बिझनेस मॉडेल' कोलमडेल.

शिवाय, प्रवेश करताना अनेक प्राईवेट कॉलेजे थेट ८५-९०% पेक्षा कमी मार्कांवर प्रवेश देत नाहीत. म्हणजे प्रथम बोर्डाने मार्क फुगवायचे, मग कॉलेजांनी ते उच्च कट-ऑफ ठरवून 'आम्ही निवडक आहोत' दाखवायचे, आणि विद्यार्थ्यांनी महागडी फी भरायची. ही एक गोलबेलच आहे. यामुळे शिक्षण हा व्यवसाय झाला, आणि विद्यार्थी हा 'ग्राहक' बनला, ज्याला ९०% मार्कांची खरेदीपट्टी दिली जाते.

"आमचा १००% निकाल, ९५ विद्यार्थी ९०% पेक्षा अधिक" अशा जाहिरातीने शाळांना पुढील वर्षी फी वाढवता येते, नवीन विद्यार्थी मिळतात.पालकांना लाडके मूल 'टॉपर' म्हणून दाखवायचे असते. समाजात 'माझ्या मुलाला ९०% आले' याला मान असतो. पालक स्वत:च आपल्या मुलाच्या वास्तव क्षमतेकडे दुर्लक्ष करत आहेत.

बोर्ड 'उत्तीर्ण टक्केवारी' वाढवून आपली कार्यक्षमता सिद्ध करू इच्छितात. राजकीय नेत्यांना नको की राज्यातील विद्यार्थी 'अपयशी' ठरावेत. त्यामुळे मार्क देण्यात औदार्य.

वर सांगितल्याप्रमाणे कॉलेज कंपन्यांना फी मागण्यासाठी ग्राहक (विद्यार्थी) हवेत.

९०% मार्क मिळवण्यासाठी कोचिंगची गरज आहे, हा भ्रम पसरवून स्वत:चा व्यवसाय फुलवतात.

दहावी-बारावीची परीक्षा संपताच प्रत्येक परीक्षाकेंद्राबाहेर कोचिंग क्लासेस 'शिष्यवृत्ती परीक्षा'चे आमिष दाखवतात. ही परीक्षा नेमकी कोणत्या निकषांवर घेतली जाते, हे कोणालाच ठाऊक नसते. प्रश्नपत्रिका जणू 'ऑल इज वेल' असते – मनमानी गुण दिले जातात. मग सुरू होतो पालकांच्या खिशाचा 'सर्व्हे'. कोणाकडे किती पैसे आहेत, कोण कर्ज काढू शकेल, याची बारकाईने तपासणी केली जाते. त्यानुसार एखाद्याला २०% तर कोणाला ५०% अशी 'शिष्यवृत्ती' जाहीर केली जाते. ही शिष्यवृत्ती प्रत्यक्ष गुणवत्तेवर नसून ती पूर्णपणे विपणनाचे हत्यार असते. त्यामागे एकच ध्येय असते – विद्यार्थ्याला आपल्या कोचिंगच्या जाळ्यात ओढून घेणे. यासाठी पालकांच्या मनात भीती बियाण्यासारखी पेरली जाते: "तुमच्या मुलाला ८०% आलेत, पण स्पर्धा परीक्षेत कुणीही विचारणार नाही. आमच्याकडे नाही आलात तर मुलाचे भविष्य संकटात." हा प्रत्यक्ष 'डर का धंदा' आहे – जिथे गुणवत्तेपेक्षा पालकांची 'गिल्ट आणि फीअर' हीच खरी विक्री होते. शिष्यवृत्तीच्या नावाखाली प्रत्यक्षात विद्यार्थी आणि पालक यांच्यावर एक 'सायकोलॉजिकल ट्रॅप' घातला जातो. एकदा त्या जाळ्यात अडकल्यावर, मूळ शिष्यवृत्तीची टक्केवारी कधीच खऱ्या अर्थाने लागू होत नाही, कारण कोचिंग क्लासेस फी वसुलीचे नवे नवे मार्ग काढतात. थोडक्यात, परीक्षाकेंद्रावर झालेली ही 'शिष्यवृत्ती परीक्षा' म्हणजे भीतीचे भांडवल करणारा एक घाऊक व्यवसाय आहे.

अशा सगळ्यांच्या हितसंबंधातून ही 'मार्क्सची महागाई' टिकून आहे.

वरवर पाहता सगळे आनंदी दिसतात – विद्यार्थी प्रमोशन झाल्याचा, पालक बढाईचा. पण खरे नुकसान खूप मोठे आहे.

९२% मार्क असणारा विद्यार्थी जर एखादे व्यावहारिक प्रश्न सोडवू शकत नाही, महाविद्यालयातील पहिल्या वर्षाच्या परीक्षेत तो कोलमडतो.

जेव्हा सगळ्यांचेच ९०% वर मार्क असतात, तेव्हा '९२%' ला काही विशेष मूल्य राहात नाही. उलट, ८५% मिळविणारा विद्यार्थी 'नापास' म्हणवायला जातो. प्रत्यक्षात त्याचे ज्ञान फार कमी अंतराचे असते, पण मार्कमधील फरक मानसिक ताण निर्माण करतो.

जगातील अनेक विद्यापीठे (जसे की US, UK, Germany) यांना कळते की भारतातील ९०% म्हणजे इतर देशांतील ६०-७०%च्या समतुल्य आहे. ते मार्कांना फारसे महत्त्व देत नाहीत, आणि प्रवेश चाचण्या कठोर करतात. यामुळे सातत्याने चांगले मार्क मिळवणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर कमी लेखले जाते.

मार्क हे ज्ञानाचे प्रतिनिधी आहेत, पण ते विकृत झाल्यावर संपूर्ण परीक्षापद्धतीची प्रतिष्ठा घसरते. विद्यार्थी मानू लागतात की 'रट्टा मारला तर मार्क मिळतात', खरे आकलन नको.

कोणतीही सुधारणा केवळ बोर्डाच्या 'उदारते'ने होणार नाही. थोडे कठोर उपाय हवेत.जसे JEE, NEET, CLAT यांनी काही प्रमाणात न्याय आणला आहे, तसे सर्व क्षेत्रांत प्रवेश चाचण्या अनिवार्य कराव्यात. मार्क फुगले तरी प्रवेश चाचणी 'रिअल स्किल' तपासू शकते.

फक्त वर्णनात्मक प्रश्नांसोबत वस्तुनिष्ठ प्रश्न, प्रकल्प, प्रात्यक्षिके यांचा समावेश वाढवावा. पाठ्यक्रम अवास्तव रट्टा कमी करून विश्लेषणात्मक क्षमता वाढवण्यावर भर द्यावा.

बोर्डाने स्पष्ट नियम बनवावेत की 'श्रेणी A' साठी फक्त २५% विद्यार्थीच पात्र. अगदी गणितीय स्टॅटिस्टिकल स्केलिंग वापरून मार्क वाढवता येऊ नयेत.

पालकांना समजावून सांगावे की '९०% म्हणजे सर्वोत्कृष्ट नव्हे', ज्ञानाला मार्कांपेक्षा अधिक महत्त्व आहे.

शाळांना '१००% निकाल' याची जाहिरात करण्यास बंदी घालावी. मार्कांचा दबा कमी व्हावा.

'स्कॅम' ही संज्ञा अतिशयोक्ती वाटू शकते परंतु यथार्थ आहे. जेव्हा शैक्षणिक मूल्यमापनाच्या नावाखाली फुगवलेले मार्क दिले जातात, जेणेकरून उच्चशिक्षणाचा बाजार चालू राहील, तेव्हा तो एक प्रकारचा गुंडाळलेला व्यवहारच असतो. मार्क हे विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे प्रवेशपत्र असते. जर टिकिट खोटी असेल, तर प्रवास अडचणीचा ठरतो.

आपण मानसिक आरामासाठी आणि थोड्या व्यावसायिक फायद्यासाठी मार्क फुगवत आहोत; पण यामुळे तयार होतो तो एक 'डिग्रीधारक पण अकुशल' समाज. भारताला आज कौशल्य नसलेले 'बेरोजगार टक्केवारीचे शिखर' नको, तर प्रत्यक्ष योग्यता असलेले तरुण हवेत. दहावी-बारावी बोर्डांनी आरशात पाहून स्वतःलाच विचारले पाहिजे – आपण खरोखर गुणवत्तेला प्रोत्साहन देतो, की एक 'मार्क्सची अर्थव्यवस्था' चालवतो?

विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी या 'गोड भ्रमाला' बळी पडू नये. असे न करता, कमी टक्केवारीत खरी क्षमता असलेल्या विद्यार्थ्याला प्रोत्साहन द्यावे. शेवटी, खरे शिक्षण हे मार्कांच्या बेरजेने नव्हे, तर आयुष्याची समीकरणे सोडवण्याच्या क्षमतेने ओळखले जाते.

आमीन सय्यद.
सावनेर नागपूर
मो : 8484943535

शिक्षण पध्दती विषमता जोपासणारी?

आपल्या देशात स्वातंत्र्यानंतर शिक्षणात आमूलाग्र बदल झाले आहेत. शिक्षणाने आधुनिक रूप घेतले आहे. सध्याच्या काळात ई- शिक्षण लोकप्रिय झाले आहे. यात शिक्षक जगभरातील कानाकोपऱ्यात विद्यार्थ्यांना शिकवू शकतात. विद्यार्थी फळ्यासमोर न बसता घर बसल्या कॅम्पूटर किंवा लॅपटॉप वरून शिक्षकांच्या बरोबर संवाद साधून शिक्षण घेवू शकतो. आज शाळा कॉलेज स्पर्धा परीक्षांची तयारी घरीच राहून शिक्षण घेत आहेत. यात येण्या जाण्याचा वेळ व प्रवास खर्च वाचतो. विदेशी शिक्षण घेणं सोपं झालं आहे.

हल्ली १०वी १२वी च्या मुलांचा ग्रुप बनवून ऑनलाईन विद्यार्थ्यांना त्या त्या विषयांचे शिक्षण दिले जाते. पुर्वी पेक्षा गाव खेड्यात शिक्षण सुधारले आहे. पुस्तक उपलब्ध नसली तरी ऑनलाईन पुस्तकं वाचता येतात. सेमी इंग्लिश विषय शाळेत असल्यामुळे मुलं अगोदर पेक्षा आता इंग्रजी चांगल्या प्रकारे शिकत आहेत. असं असले तरी ऑनलाईन शिक्षण पध्दती मुळे

विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीची कमतरता निर्माण होते. ऑनलाईन शिक्षणाला विद्यार्थी गांभीर्याने घेतीलच असं नाही. तसेच आपल्या गाव खेड्यात इंटरनेट उपलब्ध नाही त्यामुळे या विद्यार्थ्यांना खूप अडचणी येतात. व्हिडिओ थांबणे, आवाज ऐकायला न येणे तसेच गावात वारंवार लाईट जाते. अशावेळी गाव खेड्यात पारंपरिक शिक्षण पध्दतीच योग्य आहे.

पूर्वी फक्त SSC बोर्डातून बहुसंख्येने परिक्षा द्यायचे. नंतरच्या काळात CBSC, ICSC बोर्ड शाळा सुरू झाल्या.इथूनच शिक्षणाचे जोरदार बाजारीकरण सुरू झाले. गावोगावी मोठ्या इंग्रजी शाळा सुरू झाल्या. श्रीमंतांची मुलं या शाळेत शिकू लागली.आपसूकच मध्यम वर्गीय पण आपल्या मुलांना इंग्रजी शाळेत पाठवू लागला परिणामी मराठी शाळेचा पट रोडावला. खाजगी शाळांची चांदी झाली. शिक्षणाचं खाजगीकरण झाले. परिणामी सरकारी मराठी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत.

अजून एक बदलेली शिक्षण पध्दती म्हणजे शाळा कॉलेजातील शिक्षणाला महत्त्व न देता भरमसाट फी भरून खाजगी शिकवणी वर्गात

पालक मुलांना पाठवतात.

सध्या नीट पेपरफुटी प्रकरण गाजत आहे. लाखो मुलांना पुन्हा नीटची परीक्षा देण्याची पाळी आली आहे. नवीन शिक्षण पध्दतीत धनदांडग्याची मुलं लाखो रूपये भरून डॉक्टर होत आहेत. बालवाडी पासूनच लाखो रूपये उच्च शिक्षणापर्यंत करोडो रुपये खर्च करतात. पुर्वी पेक्षा डॉक्टर, इंजिनिअर वगैरे झटपट होत आहेत ते शहरी भागात, ग्रामीण भागात गरीब शेतकरी भरमसाट फी कसा भरेल ?

तर भारतात जात व्यवस्था आणि शैक्षणिक असमानता पाहता दलित, आदिवासी, ओबीसी मुले पुर्वी पासून गुणवत्ता पूर्ण शिक्षणापासून वंचित राहिले आहेत कारण ग्रामीण भागातील हा वर्ग शैक्षणिक सोयी सुविधा पासून वंचित राहिला आहे आणि आता बदलत्या शिक्षण पध्दतीत या मुलांना "नीट" ची परीक्षा देऊन गुणवत्ता सिद्ध करता येईल कां? हा प्रश्नच आहे.

विषमता जोपासणारी आपली शैक्षणिक व्यवस्था झाली आहे. मुलीची जात म्हणून बहुतेक वेळा मुलींना शिक्षणासाठी दूरवर पाठवलं जात नाही. तसेच शिक्षणाचे बाजारीकरण व खाजगीकरणाने सार्वजनिक शिक्षण व्यवस्था खिळखिळी झाली आहे. यामुळे कॉपी,नीट पेपरफुटी, डॉक्टर सुध्दा आपल्या मुलाला भ्रष्ट मार्गाने डॉक्टर करावयास निघालेत पुढं जाऊन तोही भ्रष्टाचारीच होणार. ह्या नवीन शिक्षण पध्दतीने सामाजिक अधोगती होत आहे.

१० वी १२वी बोर्ड किंवा नंतर नीट परीक्षा यात अपयश आल्या नंतर कितीतरी विद्यार्थी आत्महत्ये सारखं टोकाचं पाऊल उचलतात. वर्षभराची मेहनत आणि पालकांनी लाखो रूपये फी भरलेली असते. अपेक्षित यश मिळत नाही. स्वप्नांचा चुराडा होतो.

सरकारी शाळेतील आणि एकुणच शाळा कॉलेजातील शैक्षणिक दर्जा सुधारेल, तेव्हाच ग्रामीण व गरीब घरातील मुलांना उच्च शिक्षण शक्य होईल आणि हे कोचिंग क्लासेस बंद होतील. केवळ मूठभर लोकांच्या कडे ज्ञानाची आणि सत्तेची सूत्रे असणे हानीकारक आहे. प्रगतीचा मार्ग केवळ श्रीमंतांसाठी गरीबांच्या शैक्षणिक वाटा बंद होणार असतील तर अशा शिक्षण पध्दतीत बदल होणे गरजेचे आहे.

शैक्षणिक सुधारणेच्या नावाखाली जर मानसिक

खच्चीकरण होत असेल तर शैक्षणिक व्यवस्था काय कामाची आहे. आज शिक्षण व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा खूप गाजावाजा आहे. एआय, डिजिटल इंडिया, स्मार्ट मुल्यांकन असं बरंच काही आधुनिक शिक्षण प्रणाली आकर्षक शब्दांनी भरून गेली आहे पण यातील तांत्रिक चुका, बेफिकीरी निष्काळजीपणा यामुळे विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या निकालावर परिणाम होत असेल मुलांचे करीअर बरबाद होत असेल तर अशा शैक्षणिक धोरणांची गरज काय आहे ? नवीन शैक्षणिक धोरणा पेक्षा संवेदनशील शिक्षण व्यवस्थेची सध्या गरज आहे. शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी हे गिनीपिक आहेत का? हा प्रश्न पडतो.

- **किशोरी शंकर पाटील**
विरार
मो. 8779164660

इंग्रजी शाळा

आजच्या काळात मराठी माध्यम कोणालाच नकोय,
प्रत्येक पालकाला आता फक्त इंग्रजी माध्यम हवेय.

मोठमोठे इंग्रजी शब्द मुलं आता सहज बोलतात,
पण मराठीचे साधे शब्द बोलायला ती चुकतात.

मुलं इंग्रजीत बोलतात तेव्हा कौतुकाचा पूर येतो,
पण होमवर्क समजून घेताना पालकांचा मात्र घाम निघतो!

घास भरवतानाही डोळे मुलांचे मोबाईलच्या स्क्रीनवर असतात,
कार्टूनशिवाय जेवण नसेल तर मात्र घरात मोठे तांडव करतात!

शुभंकरोती, श्लोक व पाढे म्हणणे आता झाले जुने,
मोबाईलवरच्या 'यूट्यूब'पुढे सगळेच पडतात उणे!

हल्ली पुस्तकांपेक्षा मोबाईलच मुलांच्या हातात दिसतो,
वही-पेनाचा वापर आता शाळेत खूपच कमी होतो.

शाळेचा गृहपाठ असो की मॅडमची दिलेली सूचना,
मोबाईलच्या स्क्रीनवरच कळते शाळेची सर्व योजना.

इंग्रजी माध्यम अन् मोबाईल ही आज काळाची गरज झाली,
पण मुलांच्या या अभ्यासात पालकांची मोठी कसरत सुरू झाली!

ज्योती प्रशांत सिनफळ
पत्ता – चंद्रमा डी, फ्लॅट नंबर- २०५.
डि. एस. के. विश्व धायरी पुणे
मो. ७३५०९ ८९३५९

वर्ष 11 वे

व्यक्तिमत्व विकास

मुलांचे संगोपन आणि संस्कार

विशेष अंक 2026

CHILD CARE

* संपादक *

श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

वर्ष 11 वे

व्यक्तिमत्व विकास

विशेष अंक 2026

सोशल मिडिया शाप की वरदान

* संपादक *

श्री. मंगेश विठ्ठल कोळी.

वर्ष 11 वे
व्यक्तिमत्व विकास
विशेष अंक 2026
महिला दिन
विशेष अंक
जागतिक
म
हि
ला
दि
न
* संपादक *
श्री. मंगेश विठ्ठल कोळी.